चित्रवार्ता पुस्तक
पुरवणीसह

साप्ताहिक

# माणूस

१९ एप्रिल ७५
एक रूपया





आज देखील ब्लॅक
पँथरसारख्या
क्रांतीशी निकटचा संबंध
राखणाऱ्या गटांमध्ये
क्रांती कशी घडते
याचा वस्तुपाठ
म्हणून हा चित्रपट अमेरिकेत
दाखवला जातो.....
आहे काय
असं या चित्रपटामध्ये ?


बॅटल ऑफ आल्जियर्स




# मुक्काम मुंबई



बॉम्बे हाय उद्‌घाटन समारंभ
इंदिरा गांधी 'सागर सम्राटावर'




उद्‌घाटनानंतर




मुंबईच्या पत्रकारांतर्फे मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांचा सत्कार.
अध्यक्ष श्री. कोलपे भाषण करताना . . . .


# रणजी करंडक
# मुंबई



गावसकरचा प्रसन्नाला जोरदार चौकार !
दुसऱ्या हाताने खेळून नाबाद ९६ धावा काढताना गावसकरच्या झुंजार वृत्तीचे दर्शन झाले.



सोळकरने चंद्रशेखरला सीमापार केले........



..... पण मग त्याचा त्रिफळा चंद्रशेखरने असा उडवला. दोन्ही डावात मिळून सोळकरने १३ धावा जमविल्या. पण कर्नाटकाचे चार बळी घेवून हे अपयश धुवून काढलं.



अजित पै प्रसन्नाच्या चेंडूला
सीमारेषा दाखवत आहे.
धडाकेबाज खेळ करूनही
विश्वचषक स्पर्धेसाठी चालू
असलेल्या चाचणी सामन्यात
त्याची निवड होवू शकली नाही.



शतक पुरे झाल्यावर
विश्वनाथचे अभिनंदन करून
मंडळी परतली.
अभिनंदनाच्या या आगळ्या
पद्धतीमुळेच
दोन महिन्यापूर्वी
याच मैदानावर
जीवघेणी दंगल उसळली होती.



अशोक मनकड :

कर्णधारपद जरी दैवयोगाने
मिळालं असलं तरी
आपल्या पहिल्याच प्रयत्नात
रणजी करंडक मिळविल्याची
नोंद अखेरपर्यंत रहाणारच!

# रणजी करंडक सामन्याच्या निमित्ताने ....

मुकुन्द मणूरकर

नाणं वाजवून बघायचं. खणखणीत वाजलं तरच खिशात टाकायचं, हे व्यवहारात ठीक. पण क्रीडाक्षेत्रात कौतुकाचा विषय ठरवितानासुद्धा आपले क्रीडाशौकीन हाच निर्णय वापरतात.

एकाहत्तर साली वेस्टइंडिज आणि इंग्लंड यांना त्यांच्याच मातीत खडे चारून परत आलेल्या अजित वाडेकरच्या क्रिकेट संघाचे स्वागत करताना या क्रीडाशौकिनांना स्वर्ग दोन बोटे उरला होता. त्यांच्या वाटेवर पायघड्या पसरताना 'क्रिकेट हाच खरा आपला राष्ट्रीय खेळ' असे ते बिनदिक्कत म्हणू लागले.

मागील वर्षी इंग्लंडकडून चारीमुंड्या चीत होऊन परत आलेल्या त्याच वाडेकरच्या त्याच क्रिकेट संघावर दगडांचा व लाखोल्यांचा वर्षाव केला तो याच क्रीडाशौकिनांनी ! 'पुरे झालं आता क्रिकेट' असं म्हणताना त्यांच्या जिभेला आता तिखट धार आली होती.

विजयानं बेहोष आणि पराभवानं बेभान होण्याइतके आपण खरोखरच मनस्वी आहोत का ?

संदर्भावरून उत्तर शोधायचे तर होकारार्थी उत्तर येईल. तसं नसतं तर गेले जवळ जवळ तपभर हॉकीतील पराभवाने अपमानित झालेल्या, आणि ते कमी पडले म्हणून की काय, हॉकी संघटनेतील गलिच्छ राजकारणाने उबग आलेल्या क्रीडारसिकांना, परवा विश्वचषक हॉकीत भारतानं मानाचं पान मिळवलं, तेव्हा आनंदाचं उधाण आलंच नसतं ! हॉकीपटूंना कुठे ठेवू न् कुठे नको असं झालं त्यांना. स्वागत करण्यात जनता आणि सरकार यांची चढाओढ लागली.

हॉकी स्टीक्सच्या कमानी उभारल्या जाऊ लागल्या !

नाणं खणखणीत वाजलं तर त्याची आरती करायची. नाही वाजलं तर फेकून द्यायचं, नव्हे—पायदळी तुडवायचं ! ◻

हे सर्व आत्ता काढण्याचे कारण म्हणजे हॉकीपटूंच्या स्वागताची जी लाट उसळली त्यात एप्रिलच्या रणरणत्या उन्हात खेळला गेलेला रणजी करंडक क्रिकेटचा अंतिम सामना पार धुऊन निघाला.

खरं तर रणजी करंडकाचा अंतिम सामना म्हणजे भारतीय क्रिकेटमधील सर्वांत महत्त्वाचा, मानाचा सामना. पण परवा तो खेळला आणि गाजवला गेला एखाद्या फालतू सामन्याप्रमाणे ! अंतिम सामना इतक्या निरुत्साही पद्धतीने यापूर्वी कधी खेळला गेला नसेल. अर्थात हॉकीला आलेली तात्कालिक लोकप्रियता हे याचे एक कारण असले तरी एकमेव कारण नव्हे. कडकडीत उन्हाळा, परीक्षांचे दिवस आणि नुकताच होऊन गेलेला क्रिकेटचा जोरदार हंगाम याही गोष्टी या सामन्याकडे दुर्लक्ष करण्यास कारणीभूत ठरल्या.

पण त्याचबरोबर काही जमेच्याही गोष्टी होत्या. हातातून निसटलेला रणजी करंडक मुंबईला पुन्हा हस्तगत करायचा होता. प्रतिस्पर्धी कर्नाटकाचा संघ काही असातसा नव्हता. तुल्यबळच होता. शिवाय विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड पंधरा दिवसांवर येऊन ठेपली होती.

रंगतदार सामन्यासाठी अशी पार्श्वभूमी तयार असतानाही सामन्यात रंगत कधी आली नाहीच नाही, पण काही उत्साहवर्धक निर्णयही बाहेर पडले नाहीत.

पाच दिवसांचा हा सामना चौथ्या दिवशीच संपला व गेल्या वर्षी कर्नाटकात राहिलेला हा करंडक अशोक मनकडच्या नेतृत्वाच्या साक्षीने पुन्हा एकदा मुंबईत आला. ◻

मनकडला कर्णधारपद मिळालं काहीशा दैवयोगानेच. यंदाच्या मोसमात सुरुवातीला अजित वाडेकरच मुंबईचा कर्णधार होता. एक सामना झाल्यानंतर वेस्टइंडिज दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर वाडेकर स्वखुषीने (!) निवृत्त झाला. त्यावेळी दुलीप करंडकासाठी पश्चिम विभागाच्या कर्णधारपदी कुणाची नेमणूक करावी हा प्रश्न निर्माण झाला. या जागेवर सुनील गावसकरची नेमणूक होण्याची बरीच शक्यता होती. पण नेमकं त्याच वेळी त्याचे शुभमंगल झाले व तो मधुचंद्राला पळाला. आणि अनायासे अशोक मनकडच्या गळ्यात नेतृत्वाची माळ पडली. आता पश्चिम विभागाचे नेतृत्व मिळाल्यानंतर मुंबई संघाचेही नेतृत्व त्यालाच देण्याची नैतिक जबाबदारी मुंबई क्रिकेट असोसिएशनवर पडली. 'नैतिक' म्हणण्याचे कारण म्हणजे पूर्वी वाडेकरच्या अनुपस्थितीत मुंबई संघाचे नेतृत्व केले ते गावसकरने, मनकडने नव्हे ! यापुढचा गुंता म्हणजे वेस्टइंडिजविरुद्ध पहिल्या सामन्यात पतौडी जायबंदी झाल्यावर दुसऱ्या सामन्यासाठी भारताचा कर्णधार म्हणून सुनील गावसकरची निवड झाली. (अर्थात तोही ऐनवेळी जखमी झाल्यामुळे त्याला हा मान भूषविता आला नाही, ही गोष्ट वेगळी.) पण मुंबईची मात्र केविलवाणी स्थिती झाली. कारण इकडे मनकडला नेतृत्व देऊन ते बसले होते आणि त्याच्या हातून ते काढून घ्यावे असे विशेष काही वावगे त्याने केले नव्हते.

आणि आता तर आपल्या पहिल्याच प्रयत्नात मुंबईला करंडक पुन्हा मिळवून

पृष्ठ ७ वर

# माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १९ एप्रिल | अंक : सेहेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किमत : एक रुपया |


# मोरारजींचे उपोषण आणि बिहार चळवळ

उत्तरेकडे, दिल्लीत, खुद्द बिहारमध्ये जयप्रकाशांची चळवळ अधिकाधिक उथळ होत चालली आहे की काय, अशी शंका येते.

मोरारजी देसाई यांचे उपोषण हा या उथळपणाचा एक नमुना.

गुजराथमध्ये दुष्काळ आहे. भ्रष्टाचार-भाववाढ हे प्रश्न आहेतच. यासाठी मोरारजींचे उपोषण असते तर त्याला व्यापक सहानुभूती लाभली असती.

पण मोरारजींचे उपोषण यासाठी नव्हते. गुजराथमध्ये निवडणुका लवकर घ्या, आणिबाणी रद्द करा या त्यांच्या मागण्या होत्या.

खरोखरच या आजच्या निकडीच्या गरजा आहेत कां ? अगदी गुजराथ पुरते बोलायचे झाले तरी निवडणुकीसाठी तेथील जनता अगदी आसुसलेली आहे काय ? का निवडक राजकीय शक्तींना वा व्यक्तींनाच जाणवणारी ही निकड आहे ?

आणिबाणी रद्द व्हावी या मागणीतही काही गैर नाही.

पण या दोन्ही मागण्यांचा जनतेच्या आजच्या हालअपेष्टांशी तसा निकटचा संबंध नाही. त्यामुळे लोकांच्या जिव्हाळ्याच्या या मागण्या ठरत नाहीत.

मोरारजींच्या उपोषणाकडे म्हणूनच केवळ राजकीय डावपेचाचा एक भाग म्हणून पाहणे भाग पडते.

त्यादृष्टीने मोरारजींनी वेळ चांगली निवडली हे मान्य केले पाहिजे.

धारियांचा स्फोट शांत होतो न होतो, तोच मोरारजींनी उपोषणाला सुरूवात केली. धारियांच्या वेळेपेक्षा यावेळी इंदिराजी थोड्या जास्त पेचात आल्या. कारण प्रश्न मोरारजींच्या प्राणाशी खेळण्याचा होता. आणि कितीही बदनाम झालेली व्यक्ती असली तरी मोरारजींना गुजराथच्या व एकूण देशाच्या राजकारणातही काही विशिष्ट स्थान अजूनही आहे. त्यांचे प्राण धोक्यात येणे ही बाईंना न परवडण्यासारखी गोष्ट होती. म्हणून त्यांनी झटपट तडजोड करून टाकली.

जयप्रकाशांनी आपल्या चळवळीचा रोख इकडे वळवावा असे या उपोषण प्रकरणात काही नव्हते. हा बडयांचा खेळ होता व बडयांनाच तो खेळू द्यायला हवा होता. जयप्रकाशांनी लहान माणसांना जागे केलेले आहे. आता या बडयांच्या खेळात गरजेपेक्षा जास्त लक्ष घालून, उगाच लुडबूड करून त्यांनी या लहान माणसाला विसरू नये, अर्ध्या वाटेतच त्याचा एकदा धरलेला हात सोडून देऊ नये. केवळ बिहारमध्ये जरी जयप्रकाशांनी या लहान माणसाला उभे केले, संघटित केले, तेथील राजकारणावर–अर्थकारणावर या लहान माणसाचा प्रभाव पडू लागला तरी ती एक फार मोठी कामगिरी ठरेल. हे ठोस व मुख्य महत्त्वाचे काम सोडून जयप्रकाश उगाच दिल्लीच्या आसपास रेंगाळत राहिलेले आहेत. कुणी तरी त्यांना सांगितले पाहिजे––त्यांनी बिहारमध्येच तळ ठोकून संघटनात्मक कामाकडे अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे म्हणून. आता खोल कामाची अवस्था आहे, अपेक्षा आहे. व्यापक फैलाव पुरेसा होऊन गेलेला आहे.

खोल काम म्हणजे ग्रामीण व शहरी भागांत जनता सरकारांचे तळ उभारणे, या तळांचे एकमेकांशी नाते जोडणे, लोकांना कारभाराचे, अनुशासनाने प्रत्यक्ष शिक्षण देणे, आपले भवितव्य आपण घडवीत आहोत असा अनुभव त्यांना प्राप्त करून देणे.

जयप्रकाशांचे एक ज्येष्ठ सहकारी, बिहार आंदोलनाचे एक प्रथमपासूनचे समर्थक व प्रमुख संघटक प्रा. ठाकुरदास बंग यांचे नुकतेच एक पत्र माणूस संपादकांना आलेले आहे. त्यात त्यांनी लिहिलेले आहे––

बिहार आंदोलनाच्या समर्थनासाठी मी या भागात ( कोल्हापूर ) ३ दिवसापासून भ्रमंतीवर आहे. काल सांगलीत ' माणूस ' चा २३ मार्चचा अंक पाहिला. ' साम्यवादी पर्याय नको असेल तर ' हा आपला लेख वाचला. मनस्वी आवडला. झकास वठला आहे. तुमचे प्रारंभीचे चळवळीचे विश्लेपण अनुपम आहे.......

आता तपशीलातील दोन तीन मुद्यांबाबत लिहितो. आर्थिक प्रोग्राम अलीकडच्या काळात मांडला गेला आहे. बेघरांना गावात घरासाठी जमीन देणाऱ्या कायद्याची जनता सरकारने अंमलबजावणी करणे, सीलिंग कायद्याची गावच्या पातळीवर de facto चौकशी, ग्रामसभा भरवून, करून, अंमलबजावणी करून भूमिहीनांना जमीन वाटणे या कार्यक्रमांना जनता सरकार अग्रक्रम देईल असे ठरले आहे

निकटच्या भविष्यात याची अंमलबजावणी अनेक खेड्यातून झालेली आपणास दिसेल.

RSS ने आपले कार्यक्रम नवीन संदर्भात तपासावेत. RSS व सर्वोदयवाद्यांनी जवळ यावे. नित्य संघर्ष व शुद्धिकरणाची प्रक्रिया निरंतर सुरू ठेवावी--आदि मांडणी योग्य आहे. '

माणूस संपादकांनी प्रा. वंग यांना पत्रोत्तरी लिहिले--

जनता सरकार हेच जयप्रकाशांच्या चळवळीचे आता खरे मर्मस्थान आहे. क्रांतीपूर्वकालात रशिया-चीनमध्ये सोव्हिएट्सने जी कामगिरी बजावली ती कामगिरी आपल्याकडे ही जनता सरकारे बजावू शकतील. म्हणून त्यांच्या स्थापनेकडे व कारभाराकडे अधिक लक्ष पुरवायला हवे आहे.........

जिथे, ज्या भागात, ज्या राज्यात ही स्थापनेचीही वेळ अद्याप आलेली नाही तिथेही यादृष्टीने वाटचाल व्हायला हवी आहे. पर्यायी सत्तांचे असे स्वायत्त तळ उभारले गेल्याशिवाय चालू कोंडी फुटणार नाही, नवी वाटही दिसणार नाही. संपूर्ण क्रांती अभिप्रेत असणाऱ्यांना या पद्धतीने आपल्या पक्षांची, संघटनांची पुनर्बांधणी करावी लागणार आहे. या ठोस कामाऐवजी मोरारजींच्या उपोषणासारख्या वरवरच्या उपायांच्या मलमपट्ट्या करण्यात विरोधी पक्ष, संघटना, जयप्रकाशासारखे संपूर्ण क्रांतीचे उद्गाते कितीकाळ खर्च करणार आहेत ? इंदिराजींच्या सत्तेला एक बारिकसा शह म्हणून फार तर संपूर्ण क्रांतीवादी शक्तींनी मोरारजींच्या उपोषणाला पाठिंबा देणे, काही लाक्षणिक कृती करणे समजू शकते. पण यापेक्षा अधिक महत्त्व अशा कार्यक्रमांना दिले जाऊ नये. उत्तम प्रशासक असले तरी मोरारजी स्वत:ही एक हुकुमशाही प्रवृत्तीचे राज्यकर्तेच आहेत. जुन्या मुंबई राज्यात त्यांनी विरोधी शक्तींचे केलेले शिरकाण विसरले जाऊ नये. या मोरारजींनी बाईच्या हुकुमशाहीविरुद्ध आवाज उठवावा हा एक विनोदच आहे. संपूर्ण क्रांतीवाद्यांच्या दृष्टीने इंदिराजी आणि मोरारजी, यात तसा काही फारसा फरक नाही. एक सत्तेवर, दुसरा सत्तेबाहेर. सत्तामुक्त कुणीच नाही. मग संपूर्ण क्रांतीवाद्यांनी अशा डावपेचात, क्षुद्र लढाईत स्वत:ला फार अडकवून घेण्यात काय अर्थ आहे ? पुढील पाच सात वर्षे तरी दिल्ली वर्ज समजून काम केले तर जयप्रकाश चळवळीला भवितव्य आहे. नाही तर जे मिळाले आहे तेही यश निसटून जाईल, पुन्हा पाटी कोरी दिसेल. ' चलो दिल्ली ' हा अगदी शेवटच्या घटकेला दिला जायला हवा असा मंत्र आहे. आज दिल्लीतून बाहेर पडायची वेळ आहे. कारण दिल्लीचा सूर्य अजून मध्यान्ही आहे. अजून काहीकाळ तो तेथेच राहणारही आहे. तोवर वनवासात, विजनवासात, गिरिकंदरात नवी, छोटी लोकराज्ये स्थापन करणे, चालवणे, हाच एकमात्र क्रांतिकारक कार्यक्रम ठरू शकतो. जयप्रकाशांनी या कार्यक्रमाकडे अधिक लक्ष पुरवायला हवे. मोरारजीछाप कार्यक्रम हे फालतू वेळ दवडणे आहे. □

---

## रणजी करंडक सामन्याच्या निमित्तानें : पृष्ठ ५ वरून

देण्यात तो यशस्वी ठरला. पण या एवढ्याच गोष्टीने त्याचे नेतृत्व उजळवून टाकणाऱ्या मंडळींनी मग सुधीर नाईकाचाही विसर पाडून घेऊ नये. तीन वर्षांपूर्वी मुंबईचे रथी-महारथी परदेशच्या दौऱ्यावर गेले असताना आपल्या दुय्यम सहकाऱ्यांच्या मदतीने महाराष्ट्राशी प्रखर झुंज देऊन सुधीर नाईकने मुंबईला करंडक मिळवून दिला होता. त्यावेळच्या सुधीर नाईकच्या नेतृत्वाची तुलना अशोक मनकडशी करून पाहावी.

अशोक मनकडला कर्णधारपद देऊन सुनील गावसकरला भारताचे नेतृत्व मिळण्यात काही अडचणी उत्पन्न झाल्यास त्याची जबाबदारी मुंबईच्या निवडसमितीवर आणि विशेषत: पॉली उम्रीगरवर येऊन पडेल. अंतर्गत सामन्यात कुठल्याही संघाचे नेतृत्व न करता भारताचे नेतृत्व मिळू शकते हे पतौडीच्या बाबतीत खरे ठरले तरी तो न्याय इतरांना मिळणार नाही, याची जाणीव मुंबईने ठेवलेली बरी.

पतौडीचं चालून गेलं याचं कारण तो पडला राजा ! सुनील गावसकर खेळामधला असला तरी खराखुरा राजा नव्हे !

भारतीय संघाच्या कर्णधारपदी नेमणूक करताना कोणते निकष लावले जातात--म्हणजेच थोडक्यात कोणतेही निकष लावले जात नाहीत हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

जून महिन्यात इंग्लंडला होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत भारताच्या कर्णधारपदी व्यंकटराघवनची निवड झाली तेव्हा दिसून आली निवडसमितीच्या सभासदांची ' एकमता 'ने होणारी विसंगती ! ज्या ' एकमता 'ने त्यांनी आत्ता व्यंकटराघवनला नेतृत्व बहाल केले त्याच एकमताने त्यांनी परवा प्रथम पतौडीला व नंतर गावसकरलाही नेतृत्व देऊन पाहिले, इतकेच नव्हे तर त्या ' एकमता 'नेच त्यांनी व्यंकटराघवनला भारतीय संघाबाहेर फेकूनही दिले ! दोन महिन्यापूर्वी वेस्टइंडिज विरुद्धच्या सामन्यात वानखेडे स्टेडियमवर जो व्यंकटराघवन ' राखीव ' खेळाडू म्हणून वावरला, तोच व्यंकटराघवन मागील रविवारी त्याच मैदानावर भारताचा कर्णधार म्हणून रुबाबाने चाचणी सामन्यात उतरला. आपल्या दैवाला आणि निवडसमितीच्या सदस्यांनाही खदखदा हसला असेल तो त्यावेळी !

अर्थात ' इन्स्टन्ट क्रिकेट ' स्पर्धेसाठी निवडलेले आपण ' इन्स्टन्ट कॅप्टन ' आहोत, याची खूणगाठही त्याने मनात बांधली असेलच !

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या बहुतेक संघांनी आपापले संघ जाहीर केले असताना भारतीय संघ निवडण्यासाठी अजून ' चांचणी ' सामनेच चालू आहेत. अर्थात एवढ्यावरून कुणी आपल्या यशाविषयी साशंक बनू नये. कारण भारतीय क्रीडाक्षेत्राला या वर्षी बरे दिवस आलेले आहेत. या वर्षीचा एक जानेवारी उजाडला तो भारतीय संघाला वेस्टइंडिज विरुद्ध विजयी करण्याच्या ईर्येने ! नंतर मग पुढचाही सामना भारताने खिशात टाकला. त्यानंतर परवा अकरा वर्षानंतर भारतीय हॉकीला विश्वविजेतेपद मिळाले.

कुणी सांगावे, क्रिकेटमधील दुसरं विश्वविजेतेपदही पंचाहत्तर साल आपल्याला मिळवून देईल.

निदान तशी इच्छा करायला तरी काय हरकत आहे ?

□

# आंतरराष्ट्रीय महिला वर्ष !

## वसुमती ! विजया देशमुख

पुष्कळ दिवस मनात होतं. तिला भेटावं, विचारावं; बस्स एवढंच. पण धीर झाला नाही. वाटायचं काय करू शकतो आपण ? म्हणू शकतो आपण की ' चल वसुमती, तुझी चार मुलं आणि तू यांच्यासाठी या भिंतीचा आसरा आहे. त्यांना भरवण्यासाठी, शिकविण्यासाठी, तुझे हात पुरेसे समर्थ बनविण्यासाठी हे तुला काम. तुझ्यात ताकद असेपर्यंत हे तुझं आहे. एवढं तरी मला तुझ्याकरता करता यायला पाहिजे होतं. उपकार म्हणून नव्हे, सहानुभूतीपोटी तर अजीबात नव्हे. कारण मुळात कुणी कुणाची सहानुभूती स्वीकारण्याइतकं दुबळं असूच नये आणि तसं मी तुझ्यासाठी काही करू शकत नाही. म्हणूनच तुझ्या दारात उभे राहण्याचा मला काही एक अधिकार नव्हता; आणि मी आलेही नव्हते. पण अचानक कलकत्याच्या इंग्रजी पेपरची एक महिला वार्ताहर मुंबईहून सांगलीला खास याचकरता आली आणि तिच्या निमित्ताने बेजबाबदारपणे दुसऱ्याच्या सुखदुःखावर स्वतःची करमणूक करून घेणाऱ्या गर्दीत मीही सामील झाले. कुणी प्रसिद्धीसाठी, कुणी सहानुभूती दाखवून स्वतःच्या मनाच्या औदार्याचं प्रदर्शन करण्यासाठी तुझ्या भोवती जमले होते. कुणा कुणाला काय काय मिळवायचं असतं नाही !

आणि त्या दिवशी तू दिसलीस. नंतर दोन–चार दिवस दिसतच राहिलीस. काळपट लाल साडी, पांढऱ्या काठाची पट्टी डोक्यावरून दोन्ही कानामागे घेतलेली आणि पदराखालचं ते केशविरहित ओकं डोकं, कपाळावर नाराजीच्या आठ्या. छोटेसेच, स्वच्छ काळेभोर डोळे. गालाची हाडं बरीच वर आलेली. ' माहीत आहे तुम्ही माझं काय कल्याण करणार आहात ते ?' हा भाव चेहऱ्यावर. काहीतरी निश्चय केलेला आहे वाटावं असे निग्रही ओठ. मला खरंच तुला काही विचारायचं नव्हतं. विचारावं लागलं ते दुभाषी म्हणूनच आणि तुलाही या पोकळ सहानुभूतीची निरर्थकता जाणवली असावी. चार मुले व तुझं भवितव्य यांच्या काळजीने, जबाबदारीने तू खचून गेली असादीस. विचार करायचाही वैताग आला असावा तुला. तस छत्तीस वर्षे हे नीरस, निरिच्छ होण्याचं वयही नाही. पण तू स्वेच्छेने केशवपन करून घेतलं म्हणालीस. खोटंच बोललीस निश्चितच. स्वखुषीने तू हे केलं नाहीस. नाही. तू तसं म्हणाली नाहीस, म्हणणार नाहीस पण मला माहीत आहे. माणसाला जे जे जाणवतं ना, ते सत्यच असतं.

आणि मला माहीत आहे तू तसं का म्हणालीस ते. जे व्हायचे ते होऊन गेलं होतं. समाजाने, लोकांनी तुला सहानुभूतीच दिली. तुझ्यावर उपकार करायचं ठरवलं. तिथं कुठंही कर्तव्य दिसलं नाही तुला. आणि सामाजिक कर्तव्य तरी काय ? आपली जबाबदारी दुसऱ्यावर झटकून मोकळे व्हायची वृत्ती. तुझी जवळची माणसं, तू राहतेस ते वातावरण निष्प्रेम आहे. तरी स्वीकारण्यायोग्य आहे. तुझ्याबद्दल नाही पण तुझ्या चार मुलांबद्दलची कर्तव्यभावना साहजिकपणेच त्यांच्याठायी आहे. ' धर्मासाठी माणूस आहे; माणसासाठी धर्म नाही ' अशी माणुसकीशून्य दृष्टी असलेले तुझे सासरे ! मुलाच्या दुःखाने खचलेली, कष्टी झालेली तुझी सासू आढळली नाही. मग दीनदुबळ्या सुनेला पोटाशी धरणारी, दिलासा धीर देणारी...छे ! पण तसं असतं तर हे रामायण घडतंच का ? पण हे असं असलं तरी तुला सध्या तिथं राहण्याशिवाय पर्याय नाही. कर्तव्यभावना जागृत नसलेला समाज आणि स्वतःभोवतीतून बाहेर पडू न शकणारी माणसं तुझ्यासाठी काही करू शकणार नाहीत. केलं तरी ते टिकाऊ असणार नाही. म्हणूनच तुझी दुबळी सोशिकताच अधिक समर्थ आहे.

आम्ही निघालो, वाटलं काहीतरी सांगायचं राहिलंय. कोणत्यातरी अपराधाची जबाबदारी आपल्यावरही आहे. नेमकी काय ते कळत नाही. अस्वस्थ जाणीव. उंबरठा ओलांडताना पाऊलं उगीचच अडखळतं. दारावर तुझा मोठा मुलगा उभा असतो. तुझ्या सासुबाई सांगतात, ' नमस्कार कर यांना !' आणि तो पायावर डोकं ठेवतो. आता मात्र अगदीच भरून येतं. चारचौघांचं अस्तित्व जाणवत असून देखील डोळे पाणावतात. वाटतं, या मुलातच ते सामर्थ्य असेल. हा आज ना उद्या जरूर सांगेल, ' आईग, तू असं करू नको ग आता. ' आणि ते छोटे स्वच्छ निर्विकार डोळे भरून वाहू लागतील. त्या कोवळ्या हाताच्या मिठीतच. ते सामर्थ्य तिच्या कवेत येईल. ◻

## जहर ! तीर्थराज दिवेकर

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष परवाच संपले.  
काय घडले त्यात कळलेच नाही.  
पण त्यापूर्वी मुंबईच्या पालिकेत भव्य घडले.  
अंदाजे दोन अडीच महिन्यांपूर्वीची गोष्ट.  
महानगरपालिका एका ठरावात मग्न झाली.  
महापौर ' बोमन बोहराम ' सत्तास्थानी होतेच.  
ठराव मंजूर करायचा होता.

' दर क्षणाला पसरणारी लोकवस्ती व त्यातील गलिच्छ वस्त्या. त्यातून वेश्यांसाठी आरोग्यदायी वातावरण कसे तयार करता येईल ?'

नाजूक बाब. हळूवाररीत्या हात घालून सुरू झाली.

'भाई सिंगारे' या ठरावाचे प्रणेते होते.

'गलिच्छ वातावरणाने गुदमरून जाणाऱ्या व त्यातच आयुष्य गमविणाऱ्या दुबळ्या जिवांसाठी ती कणव होती.'

अचानक चर्चेचा नूर पालटला.

कोणीतरी सत्य सांगू लागले.

आणि महापौर गालात हसले.

त्यांचे हसणे सारखे वाढतच होते.

सोबत असंख्य नगरसेवकांची दाद होतीच.

सभा 'महिफिलीत' थोडी अधिक रंगली.

पण समोरच्या बाकावर बसणाऱ्या एकीला हे सहन झाले नाही.

तिच्या कपाळावर आठ्या चढल्या.

काहींच्या नाकपुड्या कमालीच्या वाढल्या.

महिफिलीतील हसणे त्यांना आवडले नाही.

त्या तडक उठल्या व सभागृहाबाहेर चालत्या झाल्या.

जातेवेळी 'माझ्याने हे सारे ऐकवत नाही,'

एवढ्याच त्या उद्गारल्या.

त्या काँग्रेस नगरसेविका 'श्रीमती पार्वती परिहार' होत्या. आणि चर्चेचा नूर पालटविणारे नगरसेवक श्री. पटेल होते. त्यांनी समाजसेवेची कळकळ असणाऱ्यांना सांगितले—

'मुंबईतील पंचवीस टक्के वेश्या नगरसेवक आणि आमदार—खासदारांसाठी राखून ठेवण्यात येतात.'

कटू सत्य नगरसेविकेला रुचले नाही.

सेवकांचा ठराव त्यांच्या मनात उतरला नाही.

कोण जाणे काय घडले.

पण घडले मात्र एवढे.

समाजाची गरज भागविणाऱ्या शोषित आणि दुबळ्या जीवांना आरोग्यदायी वातावरणात जगता यावे म्हणून तो ठराव होता.

त्यावेळी माझे मुंबईला येणे घडलेही नव्हते, पण साहिरचे 'चकले' हा काव्यसंग्रह माझ्या कानावरून गेला होता.

आणि गुरुदत्तच्या प्यासाने मला तर वेडच लावले. साहिरचे काव्य आणि गुरुदत्तचे निर्देशन. यांचा संयुक्त मिलाफ प्यासात पाहताना असे वाटे आपण जणू मुंबईला आहो.

पायात असणाऱ्या घुंघरूची छनछन, तबल्याच्या वाद्यांची धनधन, आणि औषधाला पैसे नाहीत म्हणून खोकल्यांची ठणठण— या वेश्याजीवनाच्या संपूर्ण चित्रणाने मन भारावले. साहिर मुंबईला कधी आली हे माहीत नाही. पण स्वातंत्र्य मिळून अठ्ठावीस वर्षे झालीत एवढे मात्र माहीत आहे.

आणि 'श्रीमती पार्वती परिहार' डोळ्यासमोर उभ्या राहिल्या.

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करताना या दुबळ्या जीवांवर कधी लक्ष गेले ?

माझ्या अंगाला एकदाच सिगरेटचा चटका लागला तेव्हा मी तडफडलो.

येथे दर क्षणाला चटके बसतात. तरी त्या जगतात.

जहर पिऊन जिवंत राहणाऱ्या.

तरीही तुम्ही उठून जाता ?

कदाचित अत्रूचा अर्थ माहीत नसावा.

मुंबईतील फॉकलंड रोडला रडायला देखील सवड नाही. तुम्ही तो एकदा पायाखाली घाला.

तेथील दुबळे जीव डोळ्यातून वदतात,

जहर मिलता रहा<br>
जहर पिते रहे ।<br>
रोज मरते रहे<br>
रोज जीते रहे ।

कोणीतरी ओरडतो—त्याला समाजसेवेची कळकळ वाटली.

हे पिढ्यान् पिढ्यांचे दुखणे आहे.

त्याला आम्ही समग्रांनी हातभार लावला पाहिजे.

कोणी म्हणतो, ती समाजाची गरज भागविते.

मी परवा मुंबईच्या मोहनगरीकडे लक्ष घातले.

प्रमोद नवलकरांनी दिलेले दोन फोन नंबर घुमविले, तेव्हा खरे वाटले. येथे संध्यासमयी ऑफिस सोडून काही मुली पार्ट टाईम म्हणून शील विकायला येतात.

जीव गदगदला.

पुनः साहिर आठवला —

'ये बिबी भी माँ है, बहन भी है इनकी—

जिन्हे हिंदपर नाज है— वो कहाँ है ।

पिढ्यांचे दुखणे ना ?

अनेकांनी हे लिहिले आहे. खूप व्यथा झाल्या.

कृतीला एकही सिद्ध नाही.

मीही त्यापैकी एक. पांढरपेशा ना !

या समाजव्यवस्थेने मला नागवले आहे.

या शासनव्यवस्थेने माझे आर्थिक दारिद्र्य देशोधडीला घालविले आहे. मलाही बोलवत नाही.

माझी जात गुणकर्मावर आधारित आहे.

कोणाला ती जन्मसिद्ध वाटते.

मी भारतीय आहे ना ?

म्हणून तर मुंबईच्या दहाव्या माळ्यावर गुलाबी रात्र अशी हसते.

गुंग असणारे मंद सूर 'पात्रा' (PATRA) च्या सेंटचा घमघमाट माजवीत आपल्याच नादात झोकांडे खात तापणाऱ्या ओठावर ओठ टेकीत तर्रर्रऽऽ असतात.

खालच्यांनी वरच्यांची सेवा करायची असते ना ?

म्हणून तर हे सगळे असे आहे.

तेथे साहिरच्या 'चकलेला' कोण विचारतो ?

मुंबईच्या पालिकेला त्याचे काय ?

माझ्या पायात काटा रुतला आहे ना ? मलाच तो काढायचा आहे. येथे पार्वतीताई आल्या काय किंवा लीलीताई पंड्या आल्या काय, सर्व सारखेच.

माझा जीव गुदमरतो आहे... □

मुक्काम पुणे

# प्राध्यापक जिंकले-प्राध्यापक हरले

प्रकाश जोशी

Tan $\theta \times$ Cos $\theta$ = Exam.
Where Q → infinity
∴ Exams > infinity.

हे कोडं पडलं होतं अनेक विद्यार्थ्यांना. त्यातील एकाने परीक्षेच्या अनिश्चित वातावरणात जांभया देत कागदावर उतरवलं. परीक्षा केव्हा होणार हे त्याने प्राध्यापकांना विचारलं, कॉलेजातील हेड-क्लार्कला विचारलं, प्राचार्यांकडे गेला, विद्यापीठात चक्कर टाकली, वर्तमानपत्राचे दार ठोठावून पाहिलं, पण सगळीकडे त्याला उत्तर एकच मिळालं–

' काहीच सांगता येत नाही. '

पण आढेवेढे घेत, काथ्याकुट करीत प्राध्यापकांनी एकदाचा परीक्षेवरील आपला बहिष्कार उठविला नि तमाम पालकवर्गाने, सिन्सिअर विद्यार्थ्यांनी व कात्रीत सापडलेल्या कुलगुरूंनी समाधानाचे श्वास टाकले. स्टडीरूमचे दिवे पुन्हा एकदा नियमितपणे रात्र जागवू लागले.

बहिष्कार उठला. पण लढचात जिंकले कोण ? माघार कोणाची ? आंदोलनात प्राध्यापकांनी मिळवलं तरी काय ?

उद्या महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या आंदोलनाचे मूल्यमापन करताना अनेक गोष्टींचा विचार करावा लागेल. अनेक घटकांचा या संदर्भात निकष लावावा लागेल. केवळ वजाबाकी-बेरीज करून भागण्यासारखे नाही. कारण या आंदोलनाचे तात्कालीन व त्याचप्रमाणे दूरगामी परिणाम होणार आहेत. या आंदोलनाच्या चढत्या व पडत्या काळात समाजातील कोणते घटक कसे वागले याचाही विचार अवश्य व्हायला हवा.

ज्या मागण्यांसाठी प्राध्यापकांनी आंदोलन सुरू केले, त्यांतील बहुतेक मागण्या शासनाने मान्य केल्या आहेत. अर्थात परीक्षेवरील बहिष्कारासारखं प्रभावी अस्त्र आंदोलनात वापरलं म्हणूनच शासनाने या मागण्यांचा विचार केला. त्यातील काही पूर्णपणे तर काही तत्त्वतः मान्य केल्या, याबाबत शंका नाही. अर्थात शासन त्याचा इन्कार करणारच.

मग प्राध्यापक हरले तरी कोठे ? आंदोलन कितपत ताणून धरावं हे त्यांना कळले नाही. त्यांचे नेतृत्व मोक्याच्या क्षणी अपुरे पडले.

अभिमन्यूप्रमाणे ते चक्रव्यूहाचा भेद करून त्यात शिरले खरे, पण कोठे थांबावं हे त्यांना कळलेच नाही. ते इतके आत गेले की परतण्याची वेळ आता टळली आहे, हे त्यांच्या फार उशीरा लक्षात आलं आणि जिंकलेल्या बाजीवर पाणी फिरलं.

जनमत किती झटक्यात बदलू शकतं, ते किती प्रभावी असू शकतं, हे आंदोलनाच्या नशेतील प्राध्यापकांच्या नेत्यांना समजू शकले नाही. शासनाने मागण्या मान्य केल्यानंतर त्याबाबत झटपट विचार करून परीक्षेवरील बहिष्कार उठविण्याबाबत निर्णय घेण्यास केलेली दिरंगाई प्राध्यापकांना फारच महाग पडली. शासनाने मागण्या मान्य केलेल्या असताना प्राध्यापकांचा बहिष्कार का चालू आहे हे कोणालाही न कळल्यामुळे प्राध्यापकांनी आडमुठे धोरण स्वीकारल्याची खात्री होऊन पालकवर्ग, विद्यार्थी, विद्यार्थी संघटना व समाजातील इतर घटक एका क्षणात प्राध्यापकांच्या विरुद्ध गेले. त्याच्याच भरीला प्राध्यापकांच्या निरनिराळ्या संघटनांतील फाटाफूट, अनेक परस्पर-विरोधी विधाने यामुळे प्राध्यापकांनी समाजाची सहानुभूती गमविली. समाजाच्या पाठिंब्याशिवाय कोणतेच आंदोलन यशस्वी होणे शक्य नाही, याचाही धडा त्यांना मिळाला.

महाराष्ट्र शासनाने प्राध्यापकांच्या मागण्या बहुतांशी मान्य केल्या. पण त्या सरळपणे केल्या असे दिसून येत नाही.

प्राध्यापकांच्या मागण्यांबाबत निश्चित निर्णय घेण्यात शासनाने अक्षम्य दिरंगाई केली व त्याचे परिणाम परीक्षा बऱ्याच पुढे ढकलण्यात झाले. ३० तारखेला शिक्षणमंत्री प्रभा राव यांनी प्राध्यापकांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. त्यात निश्चित कोणतेही आश्वासन दिले नाही. मागण्याबाबत निर्णय घेतले नाहीत. या चर्चेतसुद्धा अनेक मुद्दे अस्पष्ट राहिले.

त्यातील एकच बोलके उदाहरण. डेमॉन्स्ट्रेटर्सच्या पदोन्नतीला विद्यापीठाने मान्यता दिल्यावर शासन त्याला मान्यता देईल असे चर्चेत शिक्षणमंत्री प्रभा राव यांनी सांगितले. चर्चा संपविताना प्राध्यापकांनी खात्री करून घेण्यासाठी त्याबाबत विचारले असता शिक्षणखात्याचे चिटणीस श्री. मोघे यांचे नमुनेदार उत्तर–' डेमॉन्स्ट्रेटरच्या पदोन्नतीला शासन मान्यता देईल. पण जिथे व्हेकन्सी असेल तिथे. '

आता व्हेकन्सीचा प्रश्न येतो कोठे ? पण चर्चा सगळी अशी मोघमच. त्याची जबाबदारी शासन व प्राध्यापक प्रतिनिधींचीच.

त्याच दरम्यान मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण व शिक्षणमंत्री प्रभा राव यांनी शिक्षक आमदारांशी (ग. प्र. प्रधान, मा. पं. मंगुडकर व इतर) प्राध्यापकांच्या मागण्यांबाबत चर्चा केली. यु. जी. सी.ची वेतनश्रेणी प्राध्यापकांना लागू करू नये असे मुख्यमंत्र्याचे मत दिसले, तर त्या लागू कराव्यात असे शिक्षणमंत्र्यांचे मत दिसले. या गोंधळातच शिक्षणमंत्री ३१ मार्चला विधिमंडळात कोणतेच निवेदन करू शकल्या नाहीत व प्राध्यापकांनी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला.

आंदोलन तीव्र करण्याची घोषणा करून प्राध्यापकांनी मुंबईतच दोन दिवसांचे अधिवेशन घेतले. याच अधिवेशनात महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील सर्व प्राध्यापक संघटनांनी आंदोलनाचे धोरण ठरविण्यासाठी एक कृतीसमिती स्थापन करण्यात आली. परीक्षेवरील बहिष्काराबाबत व शासनाशी वाटाघाटी करण्याचे सर्व अधिकार या कृतिसमितीला देण्यात आले.

चार दिवस सस्पेन्समध्येच गेले व यु. जी. सी.ची वेतनश्रेणी स्वीकारल्याची घोषणा शिक्षणमंत्री श्रीमती प्रभा राव यांनी विधिमंडळात केली. नेमका त्याच वेळी मी पुक्टोच्या अध्यक्षा प्रा. सौ. नलिनी तारळेकर यांच्या घरी गप्पा मारत बसलो होतो. 'शासनाने यु. जी. सी.च्या वेतनश्रेणीबरोबर शैक्षणिक पात्रतेची जी अट लावली आहे, ती आम्हाला मान्य नाही. आम्ही तसे स्पष्टपणे शिक्षणमंत्र्यांना सांगितले होते. शैक्षणिक पात्रतेच्या अटीप्रमाणे फक्त ५ टक्के प्राध्यापकांना फायदा होईल.'

'तुम्हाला यु. जी. सी.ची वेतनश्रेणी पाहिजे, पण शैक्षणिक पात्रता नको हे कसे काय?' माझा प्रश्न.

'यु. जी. सी.ची वेतनश्रेणी लागू करताना कोणत्याही शैक्षणिक पात्रतेच्या अटी घालण्यात आलेल्या नाहीत. प्राध्यापकांची निवड करण्यासाठी जी क्वालिफिकेशन्सची अट यु. जी. सी. ने मान्य केली आहे तीच महाराष्ट्र शासनाने वेतनश्रेणी लागू करताना अट म्हणून वापरली आहे. अर्थात ही अट आम्हाला मान्य नसल्यामुळे आमचे आंदोलन चालूच राहील.' शिक्षणमंत्र्यांचे निवेदन पूर्ण वाचण्याच्या पूर्वी घाईघाईने मतप्रदर्शन करण्यात तारळेकरबाईंनी फार घाई केली.

'पण विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे काय?'

'त्याबाबत आम्हाला काळजी नाही. विद्यार्थी आमच्या मागे आहेत'

पण त्यांचा अंदाज चुकला. दोन दिवसांतच वारं फिरलं. त्याचा वेग कोणालाच कळला नाही. यु. जी. सी. ची वेतनश्रेणी पाहिजे, पण शैक्षणिक अर्हता (प्राध्यापकांचा शब्द) नको, ट्रेझरीतून पगार पाहिजे, पण त्यात टेक्निकल डिफिकल्टिज आहेत, रिट्रेंचमेंटबाबत काय, या सर्व तपशीलवार गोंधळात शासनाचे म्हणणे काय, प्राध्यापकांचे म्हणणे काय हे नेमके कोणालाच उमगत नव्हते. शिक्षणमंत्र्यांनी जाहीर केलेल्या निवेदनात सुद्धा अनेक मोघम विधाने होती.

पण त्याबाबत खुलासा करून घेणे, काय पदरात पडलंय ते ठरविणे व परीक्षेवरील बहिष्काराबाबत निर्णय घेऊन मोकळे होणे प्राध्यापकांना शक्य होते. पण त्यांची कृतिसमिती, निरनिराळ्या संघटना यांच्या गोंधळात कोणीच काही हालचाल केली नाही व प्राध्यापकविरोधी वातावरण हळूहळू तापत गेले.

प्राध्यापकांत फूट पडणार हेही तेव्हाच स्पष्ट झालं. त्याच दिवशी कुलगुरू देवदत्त दाभोळकर यांना भेटलो. ते आपले सचित चेहऱ्याने आपल्या कचेरीत बसलेले होते काही बोलण्याच्या मूडमध्ये नव्हतेच. या आंदोलनाच्या काळात फारच कमी बोलायचं असं त्यांनी ठरविलेलं असावं. एखादा निःस्पृह लढाऊ वृत्तीचा माणूस एखाद्या सत्तेच्या स्थानावर आरूढ झाला की त्याचा कोंडमारा होतो. शिक्षणमंत्र्यांचं निवेदन व प्राध्यापकांचा आंदोलन चालू ठेवण्याचा निर्णय असल्याचे त्यांना सांगितले. ते फक्त बरं म्हणाले. म्हटलं तुम्ही काय करणार आहात? कशाबद्दल? परीक्षेबाबत. ते आताच कसं काय सांगणार? परीस्थितीवर अवलंबून राहील. विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्याचे धोरण राहील.

'विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्राध्यापकांनी परीक्षेचे पेपर्स काढून ठेवावेत. त्यांचे आंदोलन संपल्यावर लवकरात लवकर परीक्षा घेता येतील. जर प्राध्यापकांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मी उपोषण करीन, वेळ पडल्यास राजीनामा देईन.'

विद्यार्थ्यांबाबतची कळकळ जाणवत होती. 'पण याचा अर्थ प्राध्यापकांच्या सर्व मागण्या मला मान्य आहेत असं नव्हे.' कुलगुरु शब्द पाळत नाहीत, खोटे बोलतात असा सौ. तारळेकर यांचा दावा. मग कुलगुरूंचे प्रयत्न निष्फळ न ठरले तरच नवल.

तणाव वाढत गेला. गोंधळात भर पडत गेली. अनेक परस्पर विरोधी पत्रके निघाली. पालक मंडळी वैतागली. विद्यार्थी संघटना जाग्या झाल्या. शिक्षणमंत्र्यांच्या निवेदनानंतर प्रकरणाला थोडासा राजकीय वास येऊ लागला. युथ कॉंग्रेस, एन. एस. यु. आय. सारख्या संघटनांनी बहिष्कार मागे घ्या अशी मागणी केली तर पुणे विद्यापीठ विद्यार्थी संघ पतितपावन संघटनेने बहिष्काराला पाठिंबा दिला. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा थोडा काळ बौद्धिक गोंधळ झाला व शेवटी बहिष्कार विरोधी धोरण स्वीकारण्यात आले.

पहिली दुहीची ठिणगी पुण्यात पडली. पुण्यातील प्राध्यापक फितूर झाले, असे मुंबई-नागपूरकडची मंडळी म्हणू लागली. यु जी. सी. शैक्षणिक पात्रतेबरोबरच विद्यापीठाची शैक्षणिक पात्रता असणाऱ्यांना यु. जी. सी. वेतनश्रेणी मिळेल असे प्रभा राव यांनी ८ एप्रिलला जाहीर करताच आंदोलनाच्या फुग्यातील हवा गेली. केवळ बहुमताच्या दबावाने ज्यांनी आंदोलनात भाग घेतला ते पटापट बहिष्कार विरोधी कोलांटया उड्या मारू लागले.

त्यांच्यापुढे काही प्रलोभनेही दाखविण्यात आल्यामुळे त्यांचे विद्यार्थिप्रेम उफाळून आले.


प्रसिद्ध झाले : पाहा, सवलतीत घ्या.

**व्हिएतनाममध्ये**

**उसळलेल्या युद्धाची सचित्र कहाणी**

**व्हिएतनाम : अर्थ आणि अनर्थ**

लेखक : रा. म. शास्त्री (वि. ग. कानिटकर)

**व्हिएतनाममधील प्रदीर्घ लढ्याचे समग्र दर्शन घडवणारे पहिलेच पुस्तक. पृष्ठे ४५२ + ३२**

मूल्य तीस रुपये. सवलतीचे मूल्य : रुपये वीस फक्त.

ट ख. १ रुपया. V. P. ने किंवा M. O. ने मागवा.

**सरिता प्रकाशन**

**'वरदा' सेनापती बापटपथ, पुणे १६.**

पुटाचे विद्यार्थिप्रेम उफाळून आले. आबासाहेब गरवारे कॉलेज. ८ एप्रिलच्या सायंकाळी ६ वाजता भरलेली 'पुटा'ची सभा प्राध्यापकांच्या इतिहासात नोंदवून ठेवावी अशी झाली. शब्दच्छल करीत प्राध्यापक मुद्यावरून गुद्यावर कसे येतात, घसा फोडून कसे ओरडू शकतात, एकमेकाला शारीरिक बळाने खाली कसे बसवू शकतात, वर्गात स्टेजवर पुढच्या बाकावर, मागच्या बाकावर व वर्गाबाहेर हुँदोसधुल्ला कसा माजवू शकतात, याचे सुंदर प्रात्यक्षिक पाहायला मिळाले. आजपर्यंत झेड. पी. च्या सभा पाहिल्यात, कॉर्पोरेशनमधला धांगडधिंगा पाहिलाच, पण 'पुटा'च्या सभेसारखी सभा मात्र प्रथमच पाहिली. अनेक विद्यार्थ्यांनी पाहिली. शेवटी प्राध्यापकांना शांत राहण्याचे आवाहन एका विद्यार्थी-नेत्याला करावे लागले. तरी गोंधळ वाढलाच. मासळीबाजार बरा म्हणावा अशी स्थिती.

सभागृहाचे एक चित्र. स्टेजवर सभेचे अध्यक्ष भाऊसाहेब पटवर्धन कपाळाला हात लावून बसलेले, शेजारी दोघे–चौघे तावातावात ओरडताहेत. अध्यक्षांकडे पाठ करून दोन प्राध्यापक बाकावर उभे राहून घसा फोडून घोषणा देत आहेत, काही हातघाईवर आलेत, काही बाहेर उभे आहेत, काही बसले आहेत, काही उठताहेत तर काही उगाचच धावाधाव करताहेत. त्यात विद्यार्थ्यांची भर. गोंधळ वाढतोच आहे.

आता हा गोंधळ का वाढला. पुटाने सभा घेतली. डॉ. वि. रा. करंदीकरांनी ठराव मांडला–पुटाच्या सदस्यांनी परीक्षेवरील बहिष्कार मागे घ्यावा. डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी 'वीथ प्रोटेस्ट' अशी उपसूचना केली; ती फेटाळून लावण्यात आली. ते चिडले. पण करतात काय ? मध्येच एकजण उठले. आधी आमच्या शंकांना उत्तरे द्या. 'तुम्ही बसा हो, नाहीतर बाहेर जाऊन या.' एक पिचका आवाज. दोन्ही गट संतप्त.

बहिष्कारवादी गटाचे प्रा. दा. रा. गोळे उठतात. आधी अखिल प्राध्यापकांची कृतिसमिती व तिचा मी सदस्य असल्याचे सांगतात. 'अहो, आता कुठे चूल पेटली आहे. पोळी थोडी कच्ची आहे, ती पूर्ण भाजून घेऊ दे, मग बघू. ज्यांनी चूल पेटविलीच नाही ते चूल विझवा असं म्हणताहेत. पण मी तुम्हाला आवाहन करतो, बहिष्कार मागे घेण्याचा ठराव फेटाळून लावा व पुटाच्या पदाधिकाऱ्यांनाही खाली खेचा.' प्रचंड टाळ्या. बाकांचा जमीनदोस्त आवाज घुमतो. प्रा. गोळ्यांच्या डोळ्यात टाळ्या व शनिवारवाड्याचा जोष चढलेला दिसतो. 'अहो, युद्ध जिंकतो सेनापती आणि हे बाजारबुणगे मागे पळत येतात.'

बाजारबुणगे कोण ? आम्ही ? प्राध्यापक संतापतात. प्रचंड गोंधळाला सुरुवात होते.

'पुण्याचे नेतृत्व बाहेरून यावे याची मला खंत वाटते. पुणेकरांच्या बुद्धीचे दिवाळे निघालेले नाही. आमचे निर्णय आम्ही घेऊ शकतो.' असे जाता जाता डॉ. मुजुमदार आपली पोटदुखी बोलून दाखवितात. परत एकदा गोंधळ.

अनेक विद्यार्थी आत घुसतात. 'परीक्षा रद्द करा', 'बहिष्कार मागे घ्या', 'बहिष्कार चालू ठेवा', अशा अनेक घोषणा हॉलमध्ये घुमतात बहिष्कार मागे घेण्याच्या ठरावावर मतदान घ्यायचे कसे ? कोणालाच काही सूचत नाही. कोणीतरी सुचवतं अध्यक्षांना, म्हणावं सभेच्या आचारसंहितेचे नियम पाठ करून या. सभेत सभासद कोण, बाहेरचा कोण, विद्यार्थी कोण याचा पत्ता नसतो. शेवटी ठरतं–'बहिष्कार मागे प्राध्यापक' डाव्या हाताला व 'बहिष्कार चालू प्राध्यापक' उजव्या हाताला.. इतका वेळ घोळ चालू असतो की कोण कुठल्या बाजूला हेच कळत नाही. सारखे जागा बदलणे चालू असते. रँडम मोशनचे एक सुरेख प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना बघायला मिळते.

कोणताही निर्णय न घेता सभा बरखास्त होते. बाहेर विद्यार्थी ओरडत असतात–'गोळे सर बाहेर या.' त्यांना पुटाच्या कार्यकर्त्यांनी सांगितलेले असते, आम्ही बहिष्कार मागे घेतोय पण ते पुक्टाचे लोक व गोळे सर आम्हाला विरोध करीत आहेत. विद्यार्थी घोषणा द्यायला तयारच असतात.

महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या कृतिसमितीने बहिष्कार उठविण्याबाबतचा निर्णय घेण्यास उशीर केला, याबद्दल वाद नाही. पण बहिष्कार मागे घेण्याचा निर्णय घेण्यासाठी घाईघाईने सभा बोलावून समस्त प्राध्यापक मंडळींच्या नावाला बट्टा लावण्याचे 'पुटा'ला खरोखरीच कारण होते काय ? दोन दिवसांनंतर कृतिसमिती निर्णय घेणारच होती. बहिष्कार मागे घेण्यात येईल, याबाबत कोणालाच शंका नव्हती. आपले स्थान टिकविण्यासाठी, विद्यार्थ्यांत सहानुभूती निर्माण करण्यासाठीच पुटाची ही पळपुटी धडपड असावी. विद्यार्थ्यांच्या दडपणाखाली आठ तारखेला स. प. महाविद्यालयात पुक्टाची सभा होऊ शकली नाही. विद्यार्थ्यांनी पुक्टाच्या अध्यक्षा प्रा. सौ. तारळेकर यांना घेराओ घालून असंख्य प्रश्न विचारले. त्यांचं उत्तर एकच, 'मी बहिष्काराबाबत आज काही सांगू शकत नाही. उद्या कृतिसमिती निर्णय घेईल.' परंतु याच धोरणामुळे गोंधळ व गैरसमज वाढण्यास मदत झाली, हे प्राध्यापकांचे नेते सोयीस्करपणे विसरले.

प्राध्यापकांची कृतिसमिती व शिक्षणमंत्र्यात झालेल्या चर्चेत समेट होऊन, परीक्षेवरील बहिष्कार उठला. या चर्चेत जे फेरफार करण्यात आले ते यापूर्वी केव्हाच करता आले असते. पण त्यासाठी शासन व प्राध्यापकांनी कोणतीच पावले उचलली नाहीत. प्राध्यापकांचे राज्यपातळीवरील हे पहिलेवहिलेच आंदोलन होते, हे लक्षात ठेवूनसुद्धा आंदोलन केव्हा मागे घ्यावे, हे त्यांना समजले नाही व विनाकारण समाजाची सहानुभूती गमावली, असंच म्हणावं लागेल.

आंदोलन आता संपले आहे. परीक्षा नव्या वेळापत्रकाप्रमाणे होतील. पण या काळातील प्राध्यापक संघटनांचे काय ? त्या पुढे टिकणार आहेत की नाहीत ? वाढणार आहेत की नाहीत ? आपल्या आर्थिक मागण्यांसाठी ते जसे लढले तसेच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध लढावे, शैक्षणिक क्षेत्रातील क्रांतीसाठी विधायक पावले टाकावीत व आपल्या संघटनेची शक्ती विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठीही वापरावी, अशी अपेक्षा समाजाने केल्यास ते वावगे ठरणार नाही. □ □

# विद्यार्थिनींचे वासंतिक वर्ग

**मे–जून १९७५**

विद्यार्थी साहाय्यक समिती व इनव्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे गेल्या तीन वर्षांच्या काळात महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी नऊ वर्ग घेण्यात आले. हे वर्ग उन्हाळी व हिवाळी सुट्यांमधून असत.

वर्गांच्या अभ्याक्रमाचे सूत्र व्यक्तिमत्व विकास हे होते. महाविद्यालयीन शिक्षणास पूरक असा अभ्यासक्रम वर्गांच्या दोन-तीन आठवड्यांच्या काळात आखलेला असतो. विविध व उपयुक्त विषयांवर तज्ञांकडून मार्गदर्शन, सामाजिक काम करणाऱ्या संस्थांचा परिचय, नित्य जीवनातील गोष्टींची प्रात्यक्षिके, व्यायाम, खेळ, छंदशिक्षण, मनोरंजन यावर आधारित असा वर्गाचा दिनक्रम असतो.

यंदाच्या उन्हाळ्याच्या सुटीत असे दोन वर्ग आयोजित केले आहेत. मुलींच्या शिक्षणाबाबत गेली नव्वद वर्षे अभिमानास्पद कामगिरी केलेली पुण्यातील हुजुरपागेची, हिज हायनेस चिंतामणराव पटवर्धन शाळा आणि इनव्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे पहिला वर्ग **ता. २ ते १६ मे** या काळात घेतला जाईल. १० वी व ११ वीच्या परिक्षांना यंदा बसलेल्या विद्यार्थिनींना या वर्गात प्रवेश मिळेल.

दुसरा वर्ग ता. २५ मे ते ७ जून या काळात विद्यार्थी साहाय्यक समिती आणि इनव्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी भवनमध्ये घेतला जाईल. महाविद्यालयीन शिक्षणक्रम चालू असलेल्या विद्यार्थिनींना या वर्गात प्रवेश मिळेल.

प्रत्येक वर्गासाठी भोजन व निवास प्रित्यर्थ ५० रु. शुल्क असेल. छंदवर्गांच्या साहित्यासाठी सुमारे १५ रु. इतका खर्च येईल. सामान्य आर्थिक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थिनींना या दरात जरुर ती सर्व सवलत मिळेल. वर्गांचे काळात रहाणे–जेवणे, अभ्यास व अन्य कार्यक्रम वर उल्लेखिलेल्या संस्थांच्या वसतिगृहात असतील

**ता. २ ते १६ मे या काळातील वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शालेय विद्यार्थिनींनी अर्ज भरून पाठवण्याची शेवटची तारीख २० एप्रिल आहे.**

**ता. २५ मे ते ७ जून या काळातील वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी अर्ज भरुन पाठवण्याची शेवटची तारीख १५ मे ही आहे.**

अर्ज पोस्टाने मागविल्यास पत्रासोबत ५० पैशांची तिकीटे पाठवावीत.

अर्ज मागविण्याचा पत्ता : श्रीमती निर्मला पुरंदरे, संचालिका,
विद्यार्थी साहाय्यक समितीचे विद्यार्थिनीगृह
११३७/१३ मॉडेल कॉलनी, पोलिस मैदानाजवळ,
फर्ग्युसन कॉलेज रस्ता, म्हसोबा गेटामागील गल्ली, पुणे १६.

भेटण्याची वेळ : वरील पत्त्यावर. रविवार सोडून रोज
सायंकाळी ५ ते ७.

# सोलकढी

## 'नाट्य–धं (मं) दार'ची १० वर्षे

मराठी नाटकांना सध्या, म्हणजे गेली पंधरा-वीस वर्षे, वाईट दिवस आले आहेत. नटनट्यांना आपमालकीच्या वातानुकूलित मोटारगाड्यांतून हिंडता येत नाही; नाटककारांना स्वतःचे एखादे हेलिकॉप्टर परवडत नाही; समीक्षकांना निःशुल्क सन्मानिकांशिवाय नाटक पाहणे शक्य होत नाही; नाटक मंडळ्यांना आणि त्यांच्या सूत्रधारांना कर्जकर्दमातून डोके वर काढणे जमत नाही. परंतु मराठी जनतेला दुर्मिळ असा कलेचा आनंद द्यायचा वसा एकदा घेतल्यानंतर उततामातता येत नाहीः नाटक मंडळींचा खेळ चालूच ठेवावा लागतो. असा खेळ चालू ठेवणाऱ्यांमध्ये 'नाट्य–मंदार' या संस्थेचा उल्लेख ढळढळीत केला पाहिजे.

'नाट्य–मंदार' संस्थेला दहा वर्षे पुरी झाली. त्या शुभनिमित्ताने संस्थेने एक देखणा वर्धापनदिन–नाट्यमहोत्सव साजरा केला. नाट्यमहोत्सवाच्या नेत्रविस्फारक आणि नेत्रखेचक जाहिराती तमाम सगळ्या वृत्तपत्रांतून झळकल्या. त्यातल्या एका जाहिरातीत, संस्थेने आतापर्यंत केलेल्या कलासेवेचा जमाखर्च, 'गुढ्यातोरणे भव्य यशाची' अशा नावाने, पाहायला मिळाला. तेव्हा अभिमानाने ऊर भरून येऊन बनियन आता टरकतो की काय अशी अवस्था आली. गेल्या दहा वर्षांत 'नाट्य–मदार'ने तब्बल सतरा नाटके रसिकनेत्री रुजू केली. या नाटकांच्या प्रयोगांची प्रत्येकी संख्या जाहिरातीत दिली असला तरी त्यांची एकूण बेरीज दिली नव्हती. ती किती भरते याबद्दल आमच्या मित्रमंडळीत प्रामाणिक मतभेद झाले. शेवटी मतभेदांचा समन्वय घालून 'नाट्य-मंदार'ने गेल्या दहा वर्षांत सुमारे दोन हजार एकशे अकरा प्रयोग केले, अशा ढोबळ निर्णयाप्रत मी येऊन पोचलो. सतरा नाटकांपैकी नऊ नाटकांचे शंभरावर (एकूण प्रयोगसंख्या: अठराशे अठरा.) प्रयोग 'नाट्य-मंदार'ने केले आहेत. ते मोजताना या संस्थेचे नाव खरे म्हणजे 'नाट्य–मंदार' असायला हवे होते, असे माझ्या बेहिशेबी मनात येऊन गेले हे कबूल केले पाहिजे. (शेम शेम! शेम शेम!!) अर्थात नाव बदलले म्हणून नाटकमंडळीची आर्थिक स्थिती बदलेल, असे थोडेच आहे? असो.

'नाट्य–मंदार'च्या उभ्याआडव्या कर्तृत्वाचे श्रेय संस्थेचे सूत्रधार, अथवा अधिक सोपा आणि समर्पक शब्द वापरायचा तर सर्वेसर्वा, राजाराम शिंदे यांना आहे. या माणसाबद्दल अनेक अफवा नाट्यवर्तुळात पिंगण घालत असतात, त्यावरून हा मोठा माणूस आहे, अशी पक्की खूणगाठ मी बांधली आहे. (माझ्याबद्दलसुद्धा बऱ्याच अफवा लोकात आहेत, असे ऐकतो.) त्यांनी म्हणे नाटकांच्या प्राप्तीतून एक बस घेतली; कचेरीसाठी व तालमीसाठी भलीमोठी, आलिशान जागा घेतली; आपल्या गावाला शाळा काढली, देऊळ बांधले, पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली; 'भल्याकाका' आणि 'माता द्रौपदी' ही अ-धंदार नाटके करायची हौस केली.

या गोष्टींवर, प्रयत्न करूनही, विश्वास ठेवणे मला अवघड झाले आहे. कारण त्यामुळे ही नाटक मंडळी फायद्यात चालते, असे भलतेच काही तरी मानावे लागेल. एकवेळ, जनताकी संपत्ती असलेली भारतीय रेल्वे कार्यक्षमतेने चालेल; पण मराठी नाटकांची व्यावसायिक मंडळी फायद्यात चालू शकत नाही. फायद्यात ती बंद पडते; ती तोट्यातच चालते. आणि ज्याअर्थी 'नाट्य–मंदार' अकरा वर्षे चालते आहे त्याअर्थी ती तोट्यातच असायला हवी. आता सूत्रधार राजाराम शिंदे यांनी मागे उल्लेखलेल्या ज्या पैशाच्या गोष्टी केल्या त्यातल्या पैशाचे उगमस्थान शोधणे तसे अवघड नाहीः उदाहरणार्थ, जे हलवले की टपटप पैसे पडतात असे पैशाचे एखादे झाड त्यांच्याकडे असू शकेल. किंवा दिवा घासल्यावर येणारा अरबी कथेतला राक्षस त्यांना पैसे देत असेल, किंवा त्यांनी बाजारातून आणलेल्या भल्यामोठ्या तुडुंब बरक्या फणसात सगळे आपले सोन्याचे गरे नि सोन्याच्या आठिळ्या निघाल्या असतील. शक्यतेच्या कोटीतल्या असल्यामुळे या गोष्टींवर माझा विश्वास बसतो; पण महाराष्ट्रातली नाटक मंडळी फायद्यात चालणे, ही शक्यतेच्या कोटीतली गोष्ट आहे काय?

अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत 'नाट्य–धं (मं)दार'ने दहा वर्षांची चाल पुरी करून अकराव्या वर्षात पदार्पण केले, याबद्दल तिचे आणि सूत्रधार राजाराम शिंदे यांचे आम्ही खणखणीत अभिनंदन करतो. ◻

## ◻ 'मौज प्रकाशन : २३१' अर्थात 'सात सक्कं त्रेचाळीस'

'मौज प्रकाशन' या संस्थेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. गेली दोन तपे ही संस्था निवडक निवडक अ-पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करून राहिली आहे. आत्तापर्यंत सुमारे दोनशेचाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी मराठी भाषिकांच्या साहित्यिक अभिरुचीचे संगोपन केले आहे, अशी ग्वाही 'मौजे'ची पुस्तके वाचणारे कलमी वाचक जशी देतील, तशी ती न वाचणारे रायवळ वाचकसुद्धा देतील, असा माझा विश्वास आहे. लहान–मोठी, जुन्या लेखकांची–नव्या लेखकांची, ललित–अललित, स्वतंत्र, भाषांतरित, खपणारी–बिनखपणारी, वाचनीय–अवाचनीय, कळणारी–न कळणारी...अशी कित्तीतरी वेग्वेगळ्या प्रकारची पुस्तके 'मौजे'ने मराठी वाचकांना दिली. ही पुस्तके वेग्वेगळ्या प्रकारची असली तरी काही गोष्टी त्यांना समान आहेत. त्यांची छपाई आणि बांधणी सुबक असते; किंमत जीवनावश्यक पदार्थांइतकीच असते; आणि मुख्य म्हणजे त्यांच्याबद्दल उडतपगडेउटंगटवळं बोलणे अशक्यप्राय असते.

मी जात्याच गंभीर प्रकृतीचा आणि जिवाच्य धारणी असल्यामुळे माझ्याकडून चुकूनसुद्धा तसा प्रमाद घडत नाही. पण परवा माझ्या एका अगंभीर आणि अधारणी (मरा लेको) मित्राने तसा प्रमाद केला. त्याने 'मौज' प्रकाशित नवी कादंबरी ('सात सक्कं त्रेचाळीस' – लेखक : किरण नगरकर) हपापून वाचली. बरे, वाचली तर

वाचली; आता तिच्याबद्दल, ज्यांनी ती वाचलेली नाही, अशा बहुसंख्य सुदैवी सज्जनांच्या घोळक्यात बोलावे की नाही? तर हे चिरंजीव, ती कादंबरी वाचलेल्या, इतकेच नव्हे तर बहुत आवडलेल्या मौजी भाईंच्या कोंडाळ्यात कादंबरीच्या आणि लेखकाच्या नावावरून ('किरण नाव आणि सूर्याचा आव') काहीतरी थातुरथिल्लर भकले. त्यावेळी मौजी भाईंनी त्याच्याकडे ज्या तुच्छतेने पाहिले तिचे वर्णन वा अभिनय नाही होऊ शकत.

मग हळूच चोरीलपीने मी 'सात सक्कं त्रेचाळीस' वाचून काढली. काम साधेसोपे नव्हते. यथास्थित नेट लावावा लागला. इतके करून कादंबरी कळली कशी ती नाहीच. पण कळलेल्या पुस्तकावर न कळेल असे आणि न कळलेल्या पुस्तकावर कळेल असे बोलणे, माझ्या अंगभूत अभ्यासप्राप्त व व्यवसायसिद्ध चातुर्यामुळे, मला इतर अनेक चतुराननांपेक्षा जरा जास्त सोपे जाते. 'सात सक्कं त्रेचाळीस' या कादंबरीच्या बाबतीत एक सोय होती. प्रकाशकांनी, दूरदृष्टीने, कादंबरी समजायला मदत करणारी, काही मान्यवर जाणकारांनी केलेली, कादंबरीची स्वरूपवर्णने मुखमलपृष्ठांवर छापली आहेत. त्यातले एक मान्यवर जाणकार आहेत प्रा. मेघश्याम पुडलिक रेगे. ते म्हणतात, 'ही एक वेगळ्या प्रकारची कादंबरी आहे. तिच्यात कथानकाचे सूत्र नाही. ती एका व्यक्तीच्या जीवनाची कहाणीही नाही. तिच्यातले सूत्र म्हणजे एक विशिष्ट दृष्टिकोण. प्राणी म्हणून, एक देहपिंड म्हणून जगत राहणे हे माणसाचे अटळ भागधेय आहे. सभोग, शारीरिक व्याधी आणि वेदना ह्यांच्या अनुभवांतून या अवस्थेचा उत्कट प्रत्यय येतो. ती सहन करण्यावाचून इलाज नाही. अखेरीस प्रत्येक क्षणी नेकीने जगणे एवढेच माणसाच्या हाती असते. नेकीने म्हणजे माणसाच्या या समग्र परिस्थितीचे भान सतत मनाच्या केंद्रस्थानी ठेवून. या कादंबरीची भाषा या जगण्याच्या रीतीचाच भाग आहे. ती चोख आणि उघडी आहे. ती काही झाकत नाही, काही सुशोभित करत नाही.' काही कळले का? निदान माझे तरी असे झाले की कादंबरी समजायला मदत करणारे हे वर्णन समजायला मदत होईल म्हणून ही कादंबरी मी वाचली! त्यात पुन्हा घंघोटाळा असा की, 'या कादंबरीत कथानकाचे सूत्र नाही. ती एका व्यक्तीच्या जीवनाची कहाणीही नाही.' असे मे. पुं. रेगे जितक्या अधिकारवाणीने सांगतात, तितक्याच अधिकारवाणीने भाऊ पाध्ये म्हणतात: 'कुशंकची ही स्टोरी.' आता बोला? रा. भा. पाटणकर या दुसऱ्या प्राध्यापकाला कादंबरीत वेगळ्या जातीचा विनोद आढळला. त्या विनोदाचे वेगळेपण समजावून सांगताना प्राध्यापकमजकूर म्हणतात, 'जीवनातील अतिभौतिकीय असंबद्धता आणि मृत्यूचे सावट यांच्यातून तो निर्माण झालेला आहे. त्याला कारुण्याची, शोकात्मतेची झाक आहे, पण तरीही तो आपल्याला भावविवशतेपासून सावरतो. काहीशी भयाण व काहीशी विनोदी अशी असंबद्धता हाच जीवनाचा खरा पाया आहे, हे या कादंबरीचे एक जीवनभाष्य असू शकेल.'

या वीसपंचवीस ओळींतले मुद्दे खुळखुळावून 'सात सक्कं त्रेचाळीस' ही ग्रेट कादंबरी आहे असे बोलता येते. ऐकणाऱ्याला तर एवढेही बोलता येत नसल्यामुळे ते ऐकून त्याच्या श्रुती धन्य होतात. या कादंबरीबद्दल वेगळे काही बोलणे सुचत नसल्यामुळे असेल, पण तिच्यावर प्रसिद्ध होऊन तीन महिने झाले तरी, कोठे 'विस्तृत आणि मर्मग्राही' परीक्षण काही आले नाही. त्यामुळे ती भलतीच ग्रेट आहे असा बभ्रा सगळीकडे होऊ लागला आहे, काहींना ती कळली नाही. (आणि शिवाय ती 'मौजे'ने प्रकाशित केली आहे), हे तिच्या ग्रेटनेसचे दोन सज्जड व वस्तुनिष्ठ पुरावे वाटतात. काहींना या कादंबरीतली पात्रांची आणि स्थळांची नावे, वातावरण, अधलीमधली वर्णने, अचानक उचकी लागल्यासारखे येणारे तत्त्वज्ञान अथवा जीवनभाष्य, आगळ्याउगळ्या प्रतिमा, फ्लॅशबॅक–जंपकट्स आणि एकूण व्यामिश्र विस्कळितपणा हे सारे लकबुबी वाटले. आता ज्या मद्दड वाचकांना दिखाऊ लकबी आणि स्वाभाविक विभ्रम यातला फरक जाणवत नाही त्यांना काय आणि कसे आणि किती आणि कुठे आणि केव्हा सांगायचे?

अशाच एका मद्दड वाचकाने या कादंबरीच्या 'सात सक्कं त्रेचाळीस' या नावाबद्दल, 'कसले खापरखुंटे नाव?' असा उद्धट प्रश्न, साक्षात मी तिथे मौजूद असताना केला. त्या मतिमद्द्ड वाचकाला तो हिशेब समजावून सांगण्याचे माझे कर्तव्य मी तत्परतेने पार पाडले हे सांगायला नकोच. (माझी कर्तव्यदक्षता सर्वांनाच ठाऊक आहे.) मी म्हटले, बाबारे, त्याचे असे आहे. तुझ्यामाझ्यासारखी निशंक माणसे पाढेघोकीच्या निर्जीवपणे, निःशंकपणे जीवन जगत असतात. आपला जीवनाचा ठेका ठरलेला असतो. त्यानुसार 'सात सक्कं' याचे उत्तर 'बेचाळीस' कसे नेमके येते. परंतु मे. पुं. रेग्यांच्या अर्थाने नेकीचे जीवन जगणाऱ्या किरण नगरकरांच्या कादंबरीतल्या ननायकाचे तसे नाही. त्याचे नावच मुळी कुशंक. तो निःशंक सरधोपटपणे नाही जगू शकत. त्याचा पाढा चुकतो; कारण तो घोकून घटवलेला नसतो. त्यामुळे 'सात सक्कं' याचे त्याचे उत्तर 'त्रेचाळीस' येऊ शकते. ते त्यालाही तसे चूक वाटते. पण किरकोळ चूक. अवघ्या एका अंकाची. आपल्याला मात्र जीवनाचा ठरलेला ठेका बिथरवणारी ती चूक फार भयावह वाटते. ...'सात सक्कं त्रेचाळीस' ही अशी पाढेघोकीचा ठेका चुकलेल्या माणसाची कहाणी आहे. मात्र केवळ त्याची एकट्याची नव्हे; त्याच्याबरोबरच 'सात सक्कं– बेचाळीस' असे उत्तर सवयीच्या ठेक्याबरहुकुम बरोब्बर देणाऱ्या तुझ्यामाझ्यासारख्या पठिक नव्व्याण्णव हजार नऊशे नव्व्याण्णवांची समझे?

कोणतीही गोष्ट समजावून सांगायचे कसब मला असे काही साधले आहे की, कधी कधी माझे मलाच त्याचे अचंबी–आश्चर्य वाटते. यावेळी असेच झाले. माझ्या स्पष्टीकरणामुळे मित्रवर्य समाधान पावले. म्हणाले, 'कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीत, रेगे–पाध्ये–पाटणकरांच्या बरोबर 'अनंतराव' तुमचेही स्पष्टीकरण मुखमलपृष्ठावर द्यायला हवे.

एकवीस रुपये फक्त किंमतीच्या या अपरीक्षित कादंबरीची दुसरी आवृत्ती लवकरात लवकर निघो आणि आम्हाला त्या मान्यवर जाणकारांबरोबर मिरवायची बेहतरीन संधी लाभो, अशी श्रीचरणांशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतो.

–अनंतराव

# बिहार
## नेता निवडीचे राजकारण
### वा. दा. रानडे

बिहारमध्ये गफूर यांच्या जागी डॉ. जगन्नाथ मिश्र यांना विधिमंडळ काँग्रेस पक्षाने आपला नवा नेता निवडले आणि त्यांचे मंत्रिमंडळहि अधिकारावर आले. या बदलाने बिहारच्या परिस्थितीत काही फरक पडणार आहे का ? तेथील निकडीचे प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे का ? आणि राज्याला अधिक स्थिरता लाभणार आहे का ? हे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

गफूरना मुख्यमंत्रिपदावरून दूर करण्याची मागणी अनेक महिने करण्यात येत होती, पण वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी ती मान्य केली नाही ती मुख्यतः दोन कारणांमुळे. ही मागणी मान्य केल्यास जयप्रकाशांच्या आंदोलनाचा तो विजय समजला जाईल असे त्यांना वाटत होते. वास्तविक केवळ मुख्यमंत्री बदलल्याने आमचे समाधान होणार नाही, विधानसभाच बरखास्त करण्यात आली पाहिजे, हे जयप्रकाशांनी अनेकदा स्पष्ट केलेले आहे. आज मुख्यमंत्री बदलला. काही दिवसांनी विधानसभा बरखास्तीचीही मागणी मान्य होईल असा समज लोकांमध्ये निर्माण होण्याची शक्यता होती. सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना काँग्रेसबद्दल अशी प्रतिमा निर्माण होऊ द्यावयाची नव्हती. कोणाच्या दडपणाखाली आम्ही मुख्यमंत्री बदलणार नाही व विधानसभाही बरखास्त करणार नाही. आम्हाला योग्य वाटेल तेव्हां याबाबतीत निर्णय घेतला जाईल असे काँग्रेस नेते सांगत होते. याचा अर्थ जनतेची मागणी म्हणून नव्हे तर पक्षाच्या सोयीनुसार या गोष्टी करावयाचे त्यांनी ठरविले होते.

गफूरच्या जागी दुसरा नेता कोण निवडावयाचा याचा निर्णय घेणे कठीण जात होते. नेतृत्व बदल लांबणीवर पडण्याचे हेही एक महत्त्वाचे कारण होते. १९७२ च्या विधानसभा निवडणुकांनंतर राज्यांवर आपल्या कलाने चालणारे मुख्यमंत्री लादण्याचे धोरण पंतप्रधान इंदिरा गांधींनी अवलंबिले होते. त्यानुसार गुजरातेत घनःश्याम ओझा, बिहारमध्ये केदार पांडे आणि कर्नाटकात देवराज अरस यांना मुख्यमंत्री निवडण्यात आले. या राज्यातील काँग्रेस आमदारांना ही निवड पसंत नव्हती, पण पंतप्रधानांना उघड विरोध कसा करावयाचा म्हणून त्यांनी वरील नेत्यांची पक्षसभेत एकमताने निवड केली. पण हे एकमत म्हणजे देखावा होता. या एकीच्या देखाव्याआड दडलेल्या मतभेदांनी व गटबाजीने लौकरच डोके वर काढले. नेतृत्वबदलाची मागणी होऊ लागली व या मागणी भोवतीच सारे राजकारण घोटाळू लागल्याने वरिष्ठ काँग्रेस नेत्यांना ही मागणी मान्य करणे भाग पडले. गुजरातेत ओझांच्या जागी चिमणभाई आले. पण कारभारात काहीही सुधारणा न झाल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. त्यांची विधानसभा बरखास्तीची मागणी सरकारला अखेर मान्य करणे भाग पडले. बिहारमध्ये केदार पांडे यांच्या जागी गफूरना नेते निवडले. बिहारमधील काँग्रेस राजकारणावर माजी केंद्रीय रेल्वेमंत्री कै. ललित नारायण मिश्र यांच्या गटाची जबरदस्त पकड आहे. मिश्रा गटाचा पाठिंबा नसलेली व्यक्ती तेथे मुख्यमंत्रिपदावर फार काळ राहू शकत नाही. या गटाला पांडे नको होते, तसेच गफूरही नको होते. पण तडजोड म्हणून काही काळ गफूर यांचे नेतृत्व त्यांनी मान्य केले. गफूर एकवीस महिने अधिकारावर होते. १९६७ पासून बिहारमध्ये जे अस्थिर मंत्रिमंडळाचे पर्व सुरू झाले त्यात गफूरच सर्वांत अधिककाळ मुख्यमंत्रिपदावर होते. या पदावर ते एवढा काळ राहू शकले ते त्यांच्या कर्तृत्वामुळे किंवा कार्यक्षमतेमुळे नव्हे तर वर उल्लेखलेल्या दोन कारणांमुळे. गफूरना हलविण्याची मागणी करण्यासाठी मिश्र यांच्या गटाच्या आमदारांनी दिल्लीस अनेकदा वाऱ्या केल्या, पण दरवेळी त्यांना सबुरीचा सल्ला देण्यात आला. ललित नारायण मिश्र यांच्या खुनानंतर मिश्र गटाची पकड आता सैल होईल असा वरिष्ठ काँग्रेस नेत्यांचा अंदाज होता, पण तो चुकीचा ठरला. महाराष्ट्रात नाईक यांना घालविण्यासाठी शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, रजनी पटेल, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष सावंत हे निरनिराळ्या गटाचे नेते एकत्र आले, त्याप्रमाणे बिहारमध्ये गफूरना घालविण्यासाठी केदार पांडे व जगन्नाथ मिश्र यांचे गट तात्पुरते एकत्र आले.

गफूरना हलविण्यास वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी मान्यता देताच पांडे व जगन्नाथ मिश्रा यांची एकजूट भंगली. नेतेपदासाठी आपण उभे राहणार असल्याचे दोघांनीही जाहीर केले. नेता-निवडीबाबत केंद्रीय नेते कोणताही हस्तक्षेप करणार नाहीत किंवा आदेश देणार नाहीत. याबाबतीत हवा तो निर्णय घेण्याची आमदारांना पूर्ण मोकळीक राहील, असे दिल्लीहून जाहीर करण्यात आले. पण हा देखावा होता. डॉ. जगन्नाथ मिश्र यांना नेता निवडायचे, हा निर्णय दिल्लीतील काँग्रेसश्रेष्ठींनी आधीच घेतलेला होता. आमदारांवर आम्ही नेता लादतो आहोत, असा समज होऊ नये म्हणून आमदारांना याबाबतीत पूर्ण मोकळीक असल्याचे जाहीर करण्यात आले, पण दिल्लीचा निर्णय गुप्त राहिला नाही. जगन्नाथ मिश्र नेते व्हावेत अशी पंतप्रधानांची इच्छा आहे, असे केंद्रीय मंत्रिमंडळातील एक उपमंत्री सिद्धेश्वर प्रसाद यांनी सांगितले. नेतानिवडीत केंद्रीय नेत्यांना हस्तक्षेप करायचा नव्हता तर मग सिद्धेश्वरप्रसाद असे निवेदन कसे करू शकतात ? आणि निर्णय घेण्याची पूर्ण मोकळीक आमदारांना आहे, या म्हणण्याला तरी काय अर्थ राहिला ? सिद्धेश्वरप्रसाद यांच्या निवेदनाचा दिल्लीतील नेत्यांना अपेक्षित असलेला परिणाम झाला. जगन्नाथ मिश्र नेता व्हावेत अशी पंतप्रधानांची इच्छा असेल तर मी उमेदवारी मागे घेतो, असे सांगून केदार पांडे यांनी उमेदवारी मागे घेतली व जगन्नाथ मिश्र यांची एकमताने नेतेपदी निवड झाली. केदार पांडे पूर्वी मुख्यमंत्री होते, मिश्रा गटाच्या बहुसंख्य आमदारांना त्यांचे नेतृत्व मान्य नसल्यामुळे तर पांडे यांच्या जागी गफूर यांची निवड झाली होती. तेव्हा पांडे यांची पुनः नेतेपदी निवड होण्याची शक्यता नव्हतीच, पण निवडणूक लढविण्याची मोकळीकही त्यांना मिळाली नाही. दडपणाखाली त्यांनी माघार घेतली, हे उघड आहे.

केवळ मुख्यमंत्री बदलल्याने बिहारच्या

पृष्ठ २९ वर

# ग्रामीण रशिया

दि. वि. गोखले

रशियात शेतकरी-कामकऱ्यांनी कम्युनिस्ट नंदनवन निर्माण केल्याला जवळपास ६० वर्षे होत आली. या नंदनवनात ग्रामीण भाग कशा अवस्थेत आहे ?

पहिली गोष्ट म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागात चालू असलेले प्रचंड स्थलांतर. १९६० ते ७० या दशकात प्रतिवर्षी सरासरी १५ लक्ष खेडूत शहरी भागात कायम वस्तीसाठी गेले. ७१ सालापासून हा आकडा सरासरी १९ लक्षापर्यंत वाढला आहे. या स्थलांतरितात बहुसंख्य मंडळी अर्थात तरुणच असतात.

याचा परिणाम शेती उत्पादनावर झाला नाही तरच नवल. या स्थलांतराचा अभ्यास करणाऱ्या एका रशियन महिलेने म्हटले आहे : ग्रामीण तरुणांपैकी जे चलाख व हिंमतबाज असतात ते खेडी सोडून जातात. त्यामुळे म्हाताऱ्या, अकुशल व उत्पादनक्षमता कमी असलेल्यांच्या हाती शेती जाते ! म्हणजे हे आपल्या कोकणासारखंच झालं की !

अनेक खेड्यात असेही आढळून आले आहे की, पुरुषवर्ग जवळपासच्या कारखान्यात काम पत्करतो व सामुदायिक शेतीवर स्त्रियाच शिल्लक उरतात. त्या सामुदायिक शेतीत मन घालण्याऐवजी आपल्या खाजगी प्लॉटमध्ये भाजीपाला पिकविण्यात अधिक वेळ खर्च करतात.

रशियन खेडूतांना शहराबद्दल एवढं आकर्षण का ? खेड्याबाबत सरकारची सर्वंकष अनास्था हे याचे प्रमुख कारण. शेती-कामगारांना शहरी औद्योगिक कामगारांच्या तुलनेने पगार तर कमी मिळतोच, पण औद्योगिक कामगारांना वैद्यकीय मदत, स्वस्त जेवण, करमणुकीची साधने आदी ज्या सोयी मिळतात, त्यातले काहीच शेती-कामगारांच्या वाट्याला येत नाही. त्यांच्या पगाराचे प्रमाण औद्योगिक कामगारांच्या ७५ टक्के आहे.

शिक्षणाच्या सोयी ग्रामीण भागात कमालीच्या निकृष्ट आहेत. बऱ्हंश खेड्यात भारतातल्याप्रमाणेच एकशिक्षकी शाळा आहेत. या शिक्षकाला तीन इयत्तांना शिकवावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हातीं भोपळाच पडतो, अशी सोव्हिएत शिक्षणतज्ज्ञांची तक्रार आहे.

खड्यात जायला शिक्षक (रशियात प्राथमिक व कनिष्ट माध्यमिक शिक्षण महिलांच्याच हाती आहे) नाखुष असतात. ज्या तरुणींची खेड्यात नेमणूक होण्याचा संभव असतो, त्या ही नेमणूक टाळण्यासाठी शहरी तरुणाशी विवाह जुळविण्याची खटपट करतात, तर तरुण पुरुष शिक्षकांना असह्य डोकेदुखीपासून हृद्रोगापर्यंतचे विविध आजार अकस्मात उद्भवू लागतात.

शिक्षणाची अशी परवड होत असल्यामुळे अनेक ग्रामीण पालक शहरात कामधंदा शोधतात. मुलांचे शिक्षण चांगले व्हावे हा हेतू. महत्वाकांक्षी ग्रामीण तरुणही शिक्षणासाठीच खेडी सोडतात. शेती संस्थांतील विद्यार्थ्यांची परिस्थिती तर आपल्याकडल्याप्रमाणेच आहे. शेती-पदवीधर प्रत्यक्ष शेतावर काम करायला नाखुष असतात. लेखनिक व सल्लागार तंत्रज्ञ म्हणून शहरात काम करणेच ते पसंत करतात.

पश्चिम युरोपात जाऊन आलेल्यांचा अनुभव असा आहे की, तेथील खेडी फारच रम्य असतात. सर्व सुखसोयी तेथे उपलब्ध आहेतच, पण शहरात नसलेली शांतता तेथे असते. आगगाड्या व बसेसनी सर्व खेडी शहरांशी जोडलेली आहेत; शिवाय अनेक खेडुतांकडे स्वतःच्या मोटारी आहेत. रशियातील खेडी मात्र भारतीय खेड्यांप्रमाणे सामान्यसुद्धा सोयी नसलेली आहेत. सर्व खेड्यात आता वीज पोहोचली आहे, पण नळाचे पाणी मिळणाऱ्या खेड्यांचे प्रमाण २३ टक्के, तर स्वयंपाकासाठी ज्यांना गॅस मिळतो अशांचे प्रमाण केवळ १८ टक्के आहे.

गृहोपयोगी मालाच्या बाबतीत तर भारतीय खेडी बरी म्हणावी लागतील. बहुतेक दुकानात अनेक वस्तू नसतातच. जीवनावश्यक मालाची टंचाईही मोठ्या प्रमाणावर आढळते.

आता वैद्यकीय सेवा ! ज्या जॉर्जियन रिपब्लिकमध्ये डॉक्टरांची संख्या मोठी आहे असे मानले जाते, तेथे दोन वर्षांपूर्वी केलेल्या पाहणीत, २५ ग्रामीण इस्पितळात व १२७ प्रथमोपचार केंद्रात एकही डॉक्टर आढळत नाही !


शेवटी करमणूक. इझवेस्तिया पत्राच्या संपादकांना एका खेड्यातील युवकांकडून आलेले हे पत्र पहा.

संपादक महाशय : मोकळा वेळ आम्ही कसा घालवावा याबाबत सल्ला दिल्यास उपकृत होऊ. आमच्या गावात काहीच मजा नाही. नदी खूपच लांब आहे नि खेळाच्या सोयीही उपलब्ध नाहीत, गावातील क्लबात कधीतरी चित्रपट दाखविले जातात. पण चित्रपट दाखविणारा शुद्धीवर असला तरीही आम्हाला प्रेक्षक मानायला तो तयार नसतो !

इझवेस्तियाच्या संपादकांनी यावर आपल्या प्रतिनिधीला या खेड्यात रवाना केले. त्याला तेथे काय आढळले ? तो म्हणतो : पत्रात उल्लेखिलेला क्लब म्हणजे गावच्या मध्यभागी असलेली एक गलिच्छ, मोडकळीला आलेली इमारत. तेथे करमणुकीच्या कसल्याच सोयी नसल्यामुळे स्थानिक मुले-मुली अतिरिक्त मद्यपान करतात वा गुंडगिरीच्या मागे लागतात. स्थानिक दुकानात विक्रीसाठी पुस्तके नाहीत व फिरते ग्रंथालय क्वचितच इकडे फिरकते. स्थानिक शाळेत गायन व नाट्य यांचे गट आहेत. पण त्यांचे कार्य वर्षातले फारच थोडे दिवस चालते !

वरील सर्व माहिती गेल्या २–३ वर्षांत रशियन वृत्तपत्रातच प्रसिद्धी आली असल्यामुळे ती खरी असावी. कम्युनिस्ट वृत्तपत्रे खोटे कसे छापतील ?

संपादक महाशय, तुमच्या ''ग्रामायन' संस्थेचे काम रशियातही सुरू करावे लागणार काय ? ☐



# प्रकरण तेरा : पुन्हा एकदा फ्रेंच गियाना

सुरुंग उडवून लावण्याची कल्पना जोसेफ देगाजवळ बोलून झाल्यावर दुपारी पाचच्या सुमारास मी चर्चमध्ये गेलो. 'मला फक्त एकट्याला प्रार्थना करायची आहे,' मी म्हणालो. नंतर डॉन ग्रेगरिओला भेटण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावर तो थोड्या वेळातच तिथे आला.

'आता एक आठवड्यानंतर तू दूर जाणार आहेस.'

'म्हणून तर मी तुम्हाला बोलावलं. माझे पंधरा हजार पेसो तुमच्याजवळ आहेत. मी इथून निघण्यापूर्वी ते माझ्या मित्राला द्यायचे आहेत, म्हणजे तो माझ्या कुटुंबाकडे ते रवाना करील. त्यातले तीन हजार तुम्ही घ्यावेत अशी माझी इच्छा आहे– अगदी मनापासून. तुम्ही सैनिकांच्या वाईट वागणुकीपासून माझा सतत बचाव केलेला आहे. पैसे मला आज मिळाले तर फार बरं होईल. एका कागदात गुंडाळून ते मला द्या, म्हणजे येत्या गुरुवारी तसेच मित्राच्या ताब्यात देता येतील.'

'ठीक आहे.'

थोड्याच वेळात तो परत आला. बारा हजार पेसोच्या अर्ध्या फाडलेल्या नोटा त्यानं मला परत केल्या. तीन हजार त्यानं ठेवून घेतले.

मी पाब्लोला बोलावणं पाठवलं. तो एक बलदंड कोलंबियन कैदी होता. मला पाठीवर घेऊन तुरुंगाच्या भिंतीपासून टॅक्सीपर्यंत वीस ते तीस यार्ड अंतर त्याला व्यवस्थित काटता येईल की नाही हे मी त्याला विचारलं. माझे पाय अजूनही सुधारले नव्हते. टॅक्सी गाठायचाच फक्त प्रश्न होता. त्यानं कामगिरी स्वीकारली. हे तर पक्कं झालं. जोसेफची मदत गृहीत धरूनच मी हालचाल करीत होतो.

# पॅपिलॉन



मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

---

बारान् किल्ला तुरुंग सुसज्ज आणि मोठा होता. देगाचा भाऊ जोसेफ पॅपिलॉनला भेटला. या जोसेफची त्याला खूपच मदत झाली. निरीक्षणात काही वेळ घालवल्यावर सुटकेच्या धडपडीला पुन्हा सुरवात झाली. पहिली चर्चमधे गोंधळ उडवून पसार होण्याची योजना अयशस्वी झाली, इतकंच नाही तर अंधार कोठडी गाठावी लागली. अशाच आणखी दोन योजनाही बारगळल्या. शेवटचा एकच प्रयत्न करण्याचं पॅपिलॉननं ठरवलं. डायनामाईटनं तुरुंगाची भिंतच उडवून लावणे. आधीच्या प्रयत्नात भिंतीवरून तीस फूट खाली उडी मारल्यामुळे पॅपिलॉन आणि जोन्सचे पाय मोडले होते. तरीही स्वस्थ न बसता जोसेफच्या साहाय्यानं त्यांनी सर्व पूर्वतयारी केली. या वेळी यशाची खात्री होती. आणि अखेर तो दिवस उगवला . . . . . . . .

---

सोमवारी अगदी सकाळी स्नानगृहात जाऊन बसलो. मागच्या पलायन प्रयत्नाच्या वेळी ज्या सार्जंटला तीन हजार चारले होते त्याला मॅच्युरेटकरवी निरोप पाठवला. याच इसमानं मला शेवटच्या खेपेला खूप झोडपलं होतं.

'सार्जंट लोपेझ, मला तुझ्याशी थोडं बोलायचंय्.'

'कशाबद्दल ?'

'मला एक वेगवान असं थ्रीस्पीड ड्रिल हवं आहे– दोन हजार पेसोपर्यंत. शिवाय सहा खिळे; दोन पाव इंची, दोन अर्धा आणि दोन पाऊण इंची.'

'हे सगळं आणून देण्याइतके पैसे माझ्याकडे नाहीत.'

'त्याची आवश्यकता नाही, हे पाचशे पेसो ठेव.'

'उद्या पहारे बदलायच्या वेळी– दुपारी एक वाजता– या वस्तू तुला मिळतील. तोपर्यंत दोन हजार पेसो तयार ठेव.'

मंगळवारी एक वाजता एका मोकळ्या डब्यातून 'माल' ताब्यात आला. पाब्लोनं 'तो' दडवून ठेवला.

गुरुवारी, २६ तारखेला जोसेफचा पत्ताच नाही. भेटीची वेळ संपता संपता मला बोलावणं आलं. चेहेऱ्याला सुरकुत्या पडलेला एक म्हातारा फ्रेंच इसम आला होता. जोसेफचा निरोप त्यानं दिला.

'तू जे मागितलं होतंस ते या ब्रेडमध्ये घातलेलं आहे.'

'हे टॅक्सीकरता दोन हजार पेसो. रोजचे पाचशे याप्रमाणे.'

'ड्रायव्हर म्हातारा आहे, पण महातयार आहे. तो असल्यामुळे तुला काळजीच नको. अच्छा.'

'अच्छा.'

ब्रेडकडे लक्ष वेधलं जाऊ नये म्हणून एका कागदाच्या पिशवीतून सिगारेट्स, काड्यापेट्या, लोणी, सॉस इ. वस्तूही त्यानं दिल्या होत्या. तपासणीच्या वेळी दारातल्या पहारेकऱ्याला मी एक सिगारेटचं पाकीट देऊ केलं. पिशवीत सापडलेला बीफचा तुकडाही त्याला दिला. तो म्हणाला, 'तो ब्रेडचा तुकडाही थोडासा दे की.'

माझी छाती धडधडू लागली. 'नाही. तू आपला ब्रेड विकत आण. हे घे पाच पेसो– हा ब्रेड आम्हा सहाजणांनाच आधी कमी पडणार आहे.'

कसाबसा तिथून सटकलो, वेगानं दूर निघून गेलो. आमच्या पायाखालची वाळूच सरकली होती, भीतीनं घाम फुटला होता.

'दारूकाम उद्याला करू या. सगळी व्यवस्था झाली बरं का,

पाब्लो. छोटचा टॉवरखाली आपण भोक पाडलं पाहिजे, त्यामुळे वरच्या रक्षकाला आपली हालचाल दिसणार नाही.'

'त्याचाही मी विचार केलाय. उद्या सकाळी दहा वाजता त्या भागात सावली असेल. धातुकाम करणाऱ्या एका माणसाला आपण तांब्याचा पत्रा तिथे ठोकायला लावू. दोन जण मिळाले तर उत्तमच. त्यांना पाचशे पेसो मी देईन. या कामासाठी तशी दोन माणसं शोधून काढ.'

दोन कैदी ताबडतोब तयार झाले. 'माझे दोन मित्र सतत पत्रा ठोकत असतील. ड्रिलचा आवाज गार्डच्या अजिबात लक्षात येणार नाही. पण तुला तिथे जवळपासच तयार राहायला पाहिजे. मी सुद्धा तयार राहीनच.'

एक तासात भिंतीमध्ये भोक तयार झालं. ठोकण्याचा आवाज आणि ड्रिलमध्ये सोडलेलं तेल या दोन गोष्टीमुळे वरच्या गार्डला संशय येण्यासारखं काहीच वाटलं नाही. सुटलो एकदाचे. भोकामध्ये डायनामाईटची कांडी बसवली; डिटोनेटर आणि नऊ इंची फ्यूज याही गोष्टी नीट अडकवल्या. राहिलेल्या भोकात माती ठासून भरली. मागे येऊन आम्ही उभे राहिलो. सर्व काही अपेक्षेप्रमाणे घडलं तर भिंतीत मोठं भकदाड पडणार होतं. गार्ड टॉवरसह खाली येणार होता आणि पाब्लोच्या पाठीवरून मी टॅक्सीपर्यंत जाणार होतो. बाकीचे कैदी त्यांना जमेल त्या पद्धतीनं पसार होणार होते. जोन्स आणि मॅच्युरेटसाठी आम्ही टॅक्सीत थोडा वेळ वाट पाहणार होतो.

फ्यूज पेटवण्यापूर्वी पाब्लो तिथे असलेल्या कोलंबियन कैद्यांना उद्देशून म्हणाला, 'तुमच्यापैकी कोणाला पळ काढायचा असेल तर तयारीत राहा. काही क्षणातच भिंतीला मोठं भगदाड पडणार आहे.'

'वा, वा. आपण जवळ आहोत. पोलीस गोळ्या झाडत मागे लागले तर अगदी पाठीमागच्या कैद्यांना त्या खाव्या लागतील.'

फ्यूज पेटवण्यात आला. सबंध शहराला दणाणून सोडणारा आवाज ऐकू आला. छोटा टॉवर आणि वरचा गार्ड खाली आले. भिंतीला मोठमोठ्या चिरा आणि भोकं पडली होती. त्यातून बाहेरचा रस्ताही दिसत होता, पण माणूस जाण्याएवढं भोक एकही नव्हतं. पाहिजे तसं भगदाड पडलंच नाही. त्या क्षणी हरल्याचं मान्य केलं. हा दुर्दैवी पराभव होता. गियानाला परत जाणंच माझ्या नशिबात होतं.

या स्फोटानंतर अवर्णनीय असा गोंधळ उडाला. पन्नासएक पोलीस पटांगणात धावत आले. डॉनला हे कृत्य कोणाचं होतं ते नक्की ठाऊक होतं. तो मनात म्हणाला असणार, पॅपिलॉन, ही तुझी अखेरची संधी नक्कीच.'

कमांडर तर संतापानं बेभान झाला. मः आधीच पायामुळे अधू झालो असल्यानं मला ठोकून काढायची आज्ञाही त्याला देता येईना. इतर कोणाला निष्कारण त्रास होऊ नये म्हणून मी सांगून टाकलं की हे कृत्य फक्त मी एकट्यानंच केलं होतं, अगदी एकट्यानं. पडलेल्या भिंतीसमोर सहा, पटांगणात सहा आणि बाहेर रस्त्यावर सहा असे वॉर्डर्स सशस्त्र पहारा देऊ लागले. भिंत पुन्हा संपूर्णपणे दुरुस्त होई-पर्यंत डोळ्यात तेल घालून पहारा चालू होता. टॉवरसह खाली आलेल्या गार्डला किरकोळ दुखापतीपलीकडे काही झालं नाही, भाग्यवान बेटा.

## फ्रेंच गियानाकडे

तीन दिवस लोटले. ३० ऑक्टोबरची सकाळ. अकरा वाजता शुभ्र पोशाखातील बारा फ्रेंच वॉर्डर्स आम्हाला ताब्यात घेण्यासाठी आले. नावाप्रमाणे आमची तपासणी करून आम्ही तेच असल्याची त्यांनी खात्री करून घेतली. त्यांनी आमची शरीराची मापं, हाताचे ठसे, फोटो इ. गोष्टी बरोबर आणल्या होत्या. एका फ्रेंच वकिलानं आमचा ताबा मिळाल्याचं लिहून दिलं. आमच्याशी त्यांची मित्रत्वाची वागणूक पाहून कोलंबियन पोलीस चकितच झाले. कैद्यांशी गप्पागोष्टी आणि विनोद? पथकाचा मुख्य मेजर बोराल यानं माझी आस्थेवाईकपणे चौकशी केली. माझ्या पायांवर जहाजामध्ये योग्य ते उपचार करण्याचं आश्वासन त्यानं दिलं.

त्या जुनाट जहाजावरचा आमचा प्रवास अगदी वाईट झाला. एक तर उष्म्यामुळे जीव जात होता. आणि दोन दोन कैद्यांच्या पायाला साखळदंड अडकवल्यामुळे विचित्र परिस्थिती झाली होती. अगदी जुन्या रानटी पद्धतीची आठवण होत होती. मुद्दाम उल्लेख करावा असा फक्त एकच प्रसंग वाटेत घडला. त्रिनिदादला जहाजानं मुक्काम केल्यावर तिथल्या एका इंग्लिश अधिकाऱ्यानं आमच्या पायातील साखळ्या काढून टाकायला लावल्या. जहाजाच्या बोर्डावर माणसं साखळदंडांनी बांधणं नियमाविरुद्ध होतं. या संधीचा फायदा घेऊन मी जवळच्या दुसऱ्या इंग्लिश अधिकाऱ्याच्या तोंडात भडकवली. हेतू हा की मला अटक करून किनाऱ्यावर उतरवावं. पण तो अधिकारी म्हणाला, 'तू आत्ता केलेल्या गंभीर गुन्ह्याबद्दल मी तुला अजीबात अटक करणार नाही. गियानाला परत गेल्यावर तुम्हाला जास्तीत जास्त त्रासदायक शिक्षा भोगावी लागणार आहेच.'

छे! काहीच उपयोग झाला नाही. आता जन्मठेप भोगल्याखेरीज दुसरा पर्याय नाही. निदान परत एकदा तिथे जाणं नशिबी आलं. सुटकेचे प्रयत्न ओघानंच आले. गेल्या अकरा महिन्यांतील सुखद स्मृती अटकेचं दुःख सुसह्य करीत होत्या. स्वतंत्र जीवन जगायला मिळावं म्हणून केलेले मनःपूर्वक प्रयत्न व्यर्थ ठरले होते. पण मी ठिकठिकाणी अनुभवलेले अविस्मरणीय क्षण आयुष्यभर साथ करणार होते—मनोधैर्य टिकवणार होते.

या त्रिनिदादच्या बंदरापासून थोड्या मैलांवरच प्रेमळ बोव्हन कुटुंब राहत होतं. क्युराकाओच्याही जवळूनच जहाज गेलं. तिथला उदार अंतःकरणाचा तो बिशप. आम्ही गोआजिरा वस्तीपासूनही थोड्याच अंतरावरून गेलो असणार. तिथेच मला शुद्ध आणि सात्त्विक प्रेम मिळालं; नैसर्गिक, जिवापाड प्रेम. माझ्या समजुतदार इंडियन बायका. मनश्चक्षूंसमोर माझी मुलं दिसू लागली.

आणि नंतर पिजन बेटावरचे ते महारोगी! भयानक रोगानं पछाडलेले कुप्रसिद्ध गुन्हेगार, पण त्यांच्याही अंतःकरणात भरलेलं ते औदार्य. आम्हाला मिळालेली अनमोल मदत.

शिवाय बेल्जियन वकिलाचं सौजन्य : आणि जोसेफ देगा, नव्याने ओळख होऊनही मला मदत करायचा धोका त्यानं पत्करला! गियानाहून पळ काढताना झालेले कष्ट सार्थकी लागले, त्यामुळेच अशा चांगल्या माणसांची गाठ पडू शकली. अपयश मिळूनही माझा विजय झाला असंच म्हणावं लागेल. माझं अंतःकरण त्यामुळे श्रीमंत झालं, चांगल्या लोकांशी मैत्री झाली.

नाही, मला तिळमात्रही दुःख झालेलं नाही.

ही पहा मारोनी नदी आणि तिचं चिखल मिसळलेलं पाणी. आम्ही 'माना'च्या डेकवर उभे होतो. तळपत्या सूर्यामुळे जमीन भाजून निघत होती; तरी सकाळचे फक्त नऊ वाजले होते. नदीचं मुख पुन्हा एकदा दिसलं. जिथून आम्ही वेगानं बाहेर पडलो, तिथून आता सावकाश आत शिरत होतो. माझे मित्र गप्प बसून होते. ठिकाण जवळ आल्यामुळे वॉर्डर्स खुषीत आले. सफरीमध्ये समुद्र तसा खवळलेलाच होता. सुखरूप परत आल्यामुळे त्यांना आनंद होणं साहजिक होतं.

### १६ नोव्हेंबर १९३४

आम्हाला बघण्यासाठी किनाऱ्यावर मोठी जत्राच भरली होती. सगळ्यांचे चेहेरे कुतूहलानं ओसंडलेले होते. तो रविवार असल्यामुळे गर्दी जास्त होती. माझ्या कानावर आवाज पडत होते, 'तो जखमी झालेला आहे ना, तो पॅपिलॉन. तो बघ जोन्स आणि त्याच्यामागे मॅच्युरेट...' इत्यादी.

तुरुंगाच्या आत मधल्या मोकळ्या जागेमध्ये सहाशे कैद्यांना ओळीत उभं केलं होतं. प्रत्येक ओळीसमोर वॉर्डर्स होते. पहिला ओळखीचा चेहेरा दिसला सिएराचा. तो उघडपणे रडत होता, अश्रू झाकण्याचे यत्किंचितही प्रयत्न करीत नव्हता. रुग्णालयाच्या एका खिडकीतून तो माझ्याकडे पाहत होता. आम्हाला थांबवण्यात आलं. गव्हर्नरनं मेगॅफोन उचलला. 'पाहिलंत, कैदी लोकांनो; पळून जाणं कसं व्यर्थ आहे ते. प्रत्येक देश तुम्हाला अटक करून असंच फ्रान्सच्या ताब्यात परत देतो. तुमचं आगमन कोणालाही आवडत नाही. त्यापेक्षा इथेच शांतपणे राहून व्यवस्थितपणे वागणं तुमच्या हिताचं नाही का? या पाच जणांपुढे आता काय वाढून ठेवलेलं आहे याची तुम्हाला कल्पना असेलच. सेंट जोसेफ बेटावर दीर्घ मुदतीचा एकांतवास आणि राहिलेलं आयुष्य इतर जन्मठेपेच्या बेटांवर घालवणे. पळून जाऊन त्यांच्या शेवटी हेच पदरात पडलं. मला वाटतं. तुमच्या सगळं लक्षात येतंय्. वॉर्डर्स, या लोकांना शिक्षा-कोठडीत न्या पाहू.'

काही मिनिटांतच आम्हाला खास कोठडीत एकीकडं टाकण्यात आलं. इथे कडक सुरक्षा-व्यवस्था होती. तिथे पोचताक्षणीच मी माझ्या पायांवर उपचार व्हावेत अशी विनंती केली. ते अजूनही दुखत होते आणि सूज अद्याप ओसरली नव्हती. जोन्सनं सांगितलं की, त्याच्या पायाचं प्लॅस्टर खुपत होतं. आमचा प्रयत्न हाच होता... आम्हाला त्यांनी रुग्णालयात पाठवावं. सिएरा वॉर्डरसह हजर झाला.

'हा पाहा ऑर्डर्ली.' वॉर्डर म्हणाला.

'हाऊ आर यू, पपी?'

'मी आजारी आहे: मला रुग्णालयात न्या.'

'मी तसा प्रयत्न करीन, पण पूर्वीचे तुमचे तिथले पराक्रम गाजल्यामुळे मला ते कठीणच दिसतंय. जोन्सचीही तीच गत.' त्यानं माझे पाय हळुवारपणे चोळले आणि मलम लावलं. जवळच वॉर्डर उभा असल्यामुळे आम्हाला काहीच बोलता येत नव्हतं, पण त्याच्या डोळ्यातले भाव पाहून मला गहिवरून आलं.

'छे, काहीच करता येण्यासारखं नाही.' दुसऱ्या दिवशी पुन्हा पाय चोळताना तो म्हणाला, 'मी तुला मोठ्या खोलीत पाठवण्याची व्यवस्था करू का? रात्रीच्या वेळी तुझ्या पायात बेड्या ठोकतात का?'

'होय.'

'मग मोठ्या खोलीत जाणंच इष्ट आहे. अजून काही दिवस तुझ्या पायात बेड्या ठोकणारच, पण निदान तुला एकटं तरी राहावं लागणार नाही. सध्या एकटा असल्यामुळे तुझी भयानक अवस्था झाली असेल.'

'बरोबर.'

खरंच, या क्षणी एकटेपणाचा त्रास पूर्वीपेक्षा जास्त जाणवत होता. सध्या माझी मानसिक स्थिती अशी बनली होती की, भूतकाळ आणि वर्तमानात प्रत्यक्ष संचार करताना मला डोळे मिटण्याचीही आवश्यकता पडत नव्हती. आणि चालता येत नसल्यामुळे माझी कोठडी पूर्वीपेक्षाही त्रासदायक वाटत होती.

ओह, मी पुन्हा एकदा या नरकात येऊन पडलो होतो. इथूनच किती थोड्या दिवसांत आम्ही समुद्रातून पळालो: स्वातंत्र्यासाठी, नवा माणूस बनण्याच्या ईर्षेनं आणि सूड घेण्याच्या हेतूनं सुद्धा. तिघांचा मला समाचार घ्यायचा होता—पोलेन, पोलीस आणि सरकारी वकील प्रेडल: त्यांना तसंच सोडून देता कामा नये.

पुन्हा मागचेच सूडाचे विचार आणि योजना डोक्यात येऊ लागल्या. पण त्यामुळे माझं मनही खूप हलकं हलकं झालं. सरकारी वकिलासाठी सावकाशीनं कार्यक्रम ठरवावा. त्याच्या जिभेचे तुकडे तुकडे करायचे, एवढं तर पक्कं झालंच होतं. आता तपशीलाचा प्रश्न उरला होता. ती व्यभिचारी जीभ; तिचे छोटे छोटे तुकडे करावेत.

पहिली गोष्ट म्हणजे पाय सुधारले पाहिजेत. लवकरात लवकर नीट चालता यायला पाहिजे. माझ्या चौकशीला अद्याप तीन महिने बाकी होते. तेवढ्या अवधीत काय वाटेल ते करता येणं शक्य होतं. एक महिना पुन्हा चालता येण्यासाठी, एक महिना गोष्टी जुळवून आणण्यासाठी आणि नंतर—रामराम मंडळी. चालले ब्रिटिश हॉन्डरसच्या दिशेनं. यावेळी कोणाचेही हात माझ्यापर्यंत पोचू शकणार नाहीत.

काल, आम्ही परत आल्यापासून तीन दिवसांनंतर, मला मोठ्या खोलीत हलवण्यात आलं. तिथे चाळीसजण होते. सर्वजण कोर्टमार्शल होण्याची वाट बघत होते. त्यांचे गुन्हे होते चोरी, मनुष्यवध, खून, खुनाचा प्रयत्न करणं, पळ काढायचा प्रयत्न करणं. माझ्यासारखे पुन्हा पकडले गेलेले कैदी किंवा माणसाचं मांस खाण्याचं गंभीर कृत्य



करणारेही त्यात होते. दोन लांबलचक लाकडी बिछान्यांवर आम्ही वीस–वीसजण आडवे पडत असू. एकाच लोखंडी सळईला आमचे पाय बांधून टाकत. संध्याकाळी सहा वाजता प्रत्येकाचा डावा पाय साखळीनं सळईला अडकवीत. दिवसभर आम्हाला बसून गप्पागोष्टी करायला, हिंडायला किंवा बुद्धिबळासारखे खेळ खेळायला परवानगी होती. हा वेळ बघता बघता निघून जायचा. प्रत्येकजण घोळक्या–घोळक्यानं मला भेटायला यायचा, माझी सुटकेची कथा ऐकायचा. मी गोआजिरा वस्ती आणि लाली–झोरायमाबद्दल सांगितल्यावर तर सगळ्यांनी मला मूर्खातच काढलं. त्यांना माझ्या कृतीचं नवल वाटलं. तिथे मी माझ्या इच्छेचा स्वामी असताना ही काय मला अवदसा आठवली ?

'कोणत्या कारणासाठी तू तिथून बाहेर पडलास, मित्रा ?' माझी कहाणी लक्षपूर्वक ऐकणाऱ्या एका पॅरिसमधल्या कैद्यानं विचारलं. 'ट्राम्स् ? लिफ्ट ? सिनेमा ? विजेची रोषणाई ? का विद्युत्–खुर्च्या पाहण्यासाठी ? पॅरिसच्या प्रसिद्ध चौकातील स्नानगृहात स्नान करण्याची तुला इच्छा झाली होती का ? तुला दोन सुंदर बायकाही मिळाल्या; एकीहून दुसरी सरस. विशाल समुद्र तुला संचारासाठी लाभला होता. अर्धनग्न साधीभोळी माणसंही. कंदमुळं होती, दारू होती आणि शिकार करण्याची संधी होती; तिथे नव्हतं काय, ज्या-वाचून तुझं अडलं ? समुद्र, सूर्य आणि उबदार वाळू, तुला हवे तितके शिंपल्यातले मोती मिळत होते, जरी त्यांची खास जरूरी पडत नव्हती. त्याहून जास्त सुख तुला कुठे मिळणार होतं ? कशा-साठी ? कशासाठी तू इंडियन वस्ती सोडलीस ? मला कळू दे तरी.

'गाडीखाली जाऊ नये म्हणून धावत–पळत रस्ते ओलांडण्या-साठी ? घराचं भाडं भरण्यासाठी का शिंप्याची शिलाई देण्यासाठी? वीज आणि टेलिफोनची बिलं भागवण्यासाठी ? उपासमारीपासून वाचावण्यासाठी कोणा साहेबाची थुंकी झेलण्यासाठी तू बाहेर पडलास ? भल्या गृहस्था, मला तुझं वागणं अजीबात कळत नाही. तू स्वर्गात वावरत होतास ते आपल्या पायांनी नरकात येऊन पोचलास. ज्या जगात सगळ्या काळज्या तुझ्या पाठीशी लागणारच आहेत, शिवाय जोडीला पोलिसांचा ससेमिराही चुकणार नाही. तरी फ्रान्सहून इथे आल्यावर फार काळ तू कुजत पडला नव्हतास की तुझ्या बुद्धीला गंज चढला नव्हता. माझ्या दहा वर्षांच्या इथल्या वास्तव्यानंतरही तुझी वागणूक मला समजत नाही. इतकं असूनही मी सर्वांच्या वतीनं तुझं स्वागत करतो. तुझी पुन्हा पळून जायची तयारी आहे; तेव्हा त्यात आमचं सगळ्यांचं सहकार्य तुला जरूर जरूर मिळेलच, असं धरून चाल. काय मित्रांनो, माझं म्हणणं तुम्हाला मान्य आहे ना ? तुमची सगळ्यांची याला संमती आहे ?'

प्रत्येकानं मान्यतादर्शक मान डोलावली. मी सर्वांचे आभार मानले.

मला स्पष्ट दिसत होतं की, ती एकाहून एक धोकादायक माणसं होती. आम्ही सगळे दिवस–रात्र इतके जवळ वावरत होतो की, कोणालाही जवळ चार्जर असल्याचं छपवणं शक्यच नव्हतं. रात्री सगळ्याला सळईला जखडलं की, बिनधास्तपणे एखाद्याचा खून करणं अगदी सोपं होतं. त्यासाठी फक्त एवढंच करायचं की, अरब तुर्कीला थोडेफार पैसे चारून पायाला साखळी अर्धवट अडकवायला लावायची. मग अंधारात उठून, इच्छेनुसार कार्यभाग उरकून, गुप-चूप आपल्या जागेवर येऊन पडणे आणि स्वतःच पाय साखळीनं बंदिस्त करणे. अरबांना तोंड उघडायला जागाच नसणार !

गियानाला परत येऊन तीन आठवडे लोटले. दिवस भराभर जात होते. आधार घेऊन मला थोडं चालता येऊ लागलं. जाणवण्या-इतकी सुधारणा होत होती. गेल्या आठवड्यात, कार्यालयीन चौकशीच्या वेळी मला 'ते' तीन पहारेकरी दिसले. कोणते ? ज्यांना आम्ही रुग्णालयातून पळताना बेशुद्ध करून निःशस्त्र केलं होतं ते. मी परत आल्याचं पाहून त्यांना अत्यानंद झाला होता. योग्य वेळी सूड घेण्यासाठी ते टपले होते. कारण आम्ही पळून गेल्यावर त्यांना कडक शिक्षा भोगावी लागली होती–युरोपला जाण्यासाठी राखून ठेवलेली सहा महिन्यांची रजा रद्द करण्यात आली, पगाराशिवाय त्यांना मिळणारे भत्ते अडकवून ठेवले होते. म्हणूनच आमची भेट मित्रत्वाची झाली नाही. चौकशीच्या वेळी आम्ही त्यांच्या धमक्या अधिकाऱ्यांना एकवल्या, त्या आपल्या रेकॉर्डवर असलेल्या बऱ्या.

फटका खाणारा अरब मात्र आमच्याशी चांगला वागला. त्यावेळी त्यानं सत्य काय ते सांगून टाकलं होतं, अर्थात मॅच्युरेटनं वजावलेलं काम सोडूनच. चौकशी समितीच्या मुख्य कॅप्टननं आम्हाला होडी कशी मिळाली, हे काढून घेण्याचा खूप प्रयत्न केला. आम्ही त्याला अशक्य कोटीतल्या कथा ऐकवल्या. उदाहरणार्थ आम्ही स्वतःच लाकडी तराफे बनवले होते, इ. इ.

मला आणि जोन्सला किमान पाच वर्षे एकांतवास मिळावा म्हणून तो जास्तीत जास्त प्रयत्न करणार होता. मुख्य कारण म्हणजे वॉर्डसवर आम्ही केलेला हल्ला. मॅच्युरेटला मात्र तीनच वर्षे 'आणि तुला सगळे पॅपिलॉन (फुलपाखरू) म्हणतात ना,' तो म्हणाला, 'तर मी आता तुझे पंखच कापून टाकणार आहे–याची तू खात्री बाळग. तुला पुन्हा 'उडता' येणार नाही, ध्यानात ठेव.'

त्याचं म्हणणं खरं होतं. अजून कोर्टासमोर जायला दोन महिने अवकाश होता. एक किंवा दोन्ही विषारी बाण चार्जरमध्ये ठेवायची आपल्याला त्यावेळी बुद्धी कशी झाली नाही, याचा माझा मलाच संताप आला. ते बाण असते तर या शिक्षा–कोठडीत मी अखेरची घडक मारून पाहिली असती. सिएराच्या मालिशमुळे पायाला खूपच उतार पडला होता. त्याच्या भेटीमुळे मला हुषारी वाटायची. आयुष्यात चांगला मित्र मिळण्याचं मोल काही वेगळंच !

माझ्या एक गोष्ट लक्षात आली होती की, आमच्या दीर्घकाळच्या सुटकेमुळे सर्व गुन्हेगारांमध्ये आम्हाला 'मानाचं' स्थान प्राप्त झालं होतं. अगदी नकळत. आम्ही त्यांच्यात सुरक्षित होतो. जवळच्या




पैशांसाठी आमचा तरी खून होण्याची शक्यता नव्हती. तसा कोणी प्रयत्न केला तर उलट त्यालाच ठार होण्याची भीती होती. आमच्या साहसी पलायनामुळे एकूण एक लोकांना आमचा प्रचंड आदर वाटत होता, याला एकही अपवाद नव्हता. त्यातून पहारेकऱ्यांना ठोकल्यामुळे आम्ही खरे मर्द ठरलो होतो. सुरक्षिततेची भावना खूपच सुखावह असते.

थोडं अधिक चालण्याइतके पाय सुधारले होते. सिएराशिवाय इतरही कैदी माझ्या सर्व पायाला मालिश करीत असत. फार वापर नसल्यामुळे ते आखडल्यासारखे झाले होते.

## अरब आणि मासभक्षक मुंग्या

आमच्या खोलीत कोणाशीही चकार शब्द न बोलणारे दोन वीर होते. ते एकमेकांना चिकटून असत, एकमेकांशीच फक्त बोलत; तेही दुसऱ्या कोणाला ऐकू जाणार नाही इतक्या हळू आवाजात. एक दिवस सिएरानं मला दिलेल्या अमेरिकन सिगारेट्स मी त्यांना देऊ केल्या. त्यातला एकजण बोलला, 'सिएरा तुझा मित्र आहे वाटतं ?'

'होय. फार चांगला मित्र आहे.'

'आमचे दिवस जर फिरले तर आम्ही त्याच्यामार्फत आमच्या ठेवी तुझ्याकडे रवाना करू.'

'कसल्या ठेवी ?'

'आम्ही दोघांनी ठरवून टाकलं आहे की त्यांनी जर आम्हाला गिलोटीनवर चढवलं तर आमच्या चार्जर्स तुला देऊन टाकायच्या. त्या पैशाचा तुला पुन्हा पळ काढताना उपयोग होईल.'

'तुम्हाला मृत्युदंड होईल असं का वाटतं ?'

'ते जवळजवळ निश्चित झाल्यासारखं आहे : वाचण्याची शक्यता जवळजवळ नाहीच.'

'जर हे खरं असेल तर तुम्हाला या मोठ्या कोठडीत का ठेवलं ?'

'मला वाटतं आम्ही एकटेपणी आत्महत्या करू अशी त्यांना भीती वाटत असावी.'

'हा, हा, ते शक्य आहे. पण तुम्ही असं केलंत तरी काय ?'

'आम्ही एका अरबाला मास खाणाऱ्या मुंग्यांच्या तोंडी दिलं. मी हे तुला सांगतोय् कारण दुर्दैवानं त्यांना काही पुरावे मिळाले आहेत. आम्ही पुरावा नष्ट करताना पकडले गेलो.'

'हे सगळं घडलं तरी कुठे ?'

'मृत्यूची छावणी समजल्या जाणाऱ्या 'स्पॅरून क्रीक' कॅम्पवर. सेंट लॉरेंटपासून बेचाळीस किलोमीटरवर.' ते दोघंजण माझ्या समोर येऊन बसले. मी पुन्हा त्यांना सिगारेट्स दिल्या.

'या बाबतीत आम्ही कोणाचं मत विचारलं नव्हतं,' एकजण म्हणाला, 'पण तुला आमच्याविषयी काय वाटतं हे मात्र मला विचारावंसं वाटतं.'

'तुमच्याबद्दल काहीही माहिती नसताना माझं मत मी कसं देणार ? अरबाला मुंग्यांना खायला घालण्यात तुम्ही चूक केलीत का नाही हे एकदम सांगता येणार नाही. त्यासाठी तुम्हाला अथपासून इतिपर्यंतचा इतिहास मला सांगावा लागेल.'

'मी सगळं ऐकवतो. 'किलोमीटर बेचाळीस' ही लाकूड-कामाची छावणी आहे. तिथे गुन्हेगाराला रोज सक्तीनं सत्तावीस घनफूट कठीण लाकूड कापावं लागतं. संध्याकाळी तुम्ही कापलेलं लाकूड व्यवस्थित रचून झाडीमध्ये उभं राहायला पाहिजे. अरब लोकांसह वॉर्डर्स येऊन तुमच्या कामाची तपासणी करतात. त्यानंतर त्यावर खुणा करतात. आम्ही दोघं एकत्र काम करायचे. काही काही वेळा एक घनयार्ड लाकूड नाही कापून व्हायचं. असं झालं की लगेच आमची रवानगी कोठडीत व्हायची—अन्नपाणी एकदम बंद. पुन्हा दुसऱ्या दिवशी अन्नाशिवायच आम्हाला कामाला लावायचे. गुरासारखं आम्ही मरमर राबत होतो. आदल्या दिवशीचं कमी पडलेलं काम पुरं करून पुन्हा त्या दिवशीचं करायचं. सगळ्यांना ते कुत्र्यासारखं वागवीत.

'दिवस जसजसे जात होते, तसे आम्ही अधिकाधिक अशक्त होत गेलो; पुरतं तर सोडा, थोडंदेखील काम करणं मुश्किल झालं. आमच्यावर देखरेख करण्यासाठी एक अरब नेमला होता. तो मस्त आडवा पडून आमचा वारंवार अपमान करायचा. आमची भूक जागृत करण्यासाठी मचामचा आवाज करीत खायचा. हे सतत चालू राहिलं. आम्हाला तर जीवन नकोसं झालं. सुटकेसाठी आम्ही प्रत्येकी तीन हजार फ्रॅंक्स चार्जरमध्ये बाळगून होतो. एक दिवस आम्ही ठरवलं की त्या अरबाला विकत घ्यायचं. पण त्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली. सुदैवानं आमच्यात एकच चार्जर आहे अशी त्याची कल्पना होती. रोज पन्नास फ्रॅंक्स घेऊन त्यानं आम्हाला कामात सवलत दिली. ती अशी : आदल्या दिवशी जमा झालेल्या पण खुणा न केलेल्या ढिगातून लाकूड पळवून आणायचं आणि दिवसाचं काम सोपं करायचं. त्यामुळे आमचे कष्ट खूपच वाचू लागले. याप्रमाणे त्यानं जवळजवळ दोन हजार फ्रॅंक्स लुबाडले.

'आम्ही काम व्यवस्थित करतो असं पाहून त्यांनी अरबाला काढून घेतलं. त्यानं आम्हाला भरपूर लुबाडलेलं असल्यामुळे आता तो दगा देणार नाही अशा भ्रमात होतो. आम्ही पूर्वीसारखं काम पुढे चालू ठेवलं. अरब बहुधा आमच्या मागावर असावा. एक दिवस अचानक आमच्यासमोर येऊन तो म्हणाला, 'अस्सं ! अजून तुम्ही लाकूड चोरता तर ! आणि मला पैसे न देता ? मला तुम्ही जर पाचशे फ्रॅंक्स दिले नाहीत तर विचार करावा लागेल.'

'आम्हाला वाटलं की निव्वळ धमकी असेल. आम्ही नकार दिला. दुसऱ्या दिवशी त्यानं पुन्हा सांगितलं की, 'पैसे मिळाले नाहीत तर आज रात्रीच तुम्हाला अंधारकोठडी दाखवीन.' आम्ही पुन्हा नकार दिला. दुपारी तो खरोखर पहारेकऱ्यांना घेऊन आला. पॅपिलॉन ! पुढे आमची भयानक अवस्था झाली. कपडे काढून त्यांनी आम्हाला झोडपलं. आमच्या लाकडाच्या ढिगातून चोरलेली लाकडं बाजूला काढायला लावली. दोन दिवस हाच कार्यक्रम चालला होता—खायला प्यायला काही नाही. आम्ही घेरी येऊन सतत खाली कोसळत होतो. त्यावर तो अरब फटके मारून आम्हाला उठवी. शेवटी उठणंही अशक्य झाल्यावर त्या चांडाळानं काय केलं ठाऊक आहे ? जवळच्याच झाडावर मधमाशांसारख्या प्राण्यांचं एक पोळं लटकत होतं. ती फांदी मोडून त्यानं आमच्या पाठीवर ते पोळं चिरडलं आम्ही किंचाळून नुसते उठलोच नाही तर वेड्यासारखं सैरावैरा धावत सुटलो. मधमाशीचा चावा तुला ठाऊक आहे ? त्याहीपेक्षा जोरात

चावणारे पन्नास-साठ प्राणी एकदम चावले तर काय अवस्था होईल ?

'आमच्यावर काहीही उपचार न करता ब्रेड-पाण्यावर आम्हाला दहा दिवस त्यांनी अंधारकोठडीत टाकलं. माझा तर डावा डोळाच गेला, दहा-बारा प्राणी तिथे एकदम हल्ला करून गेले होते. तिथून सुटल्यावर आम्हाला इतर कैद्यांनी मदत करायच ठरवलं. प्रत्येकजण थोडं थोडं लाकूड देई, त्यामुळे आम्हाला असं फारच थोडं लाकूड तोडावं लागे. भरपूर खाल्ल्यामुळे आमची ताकद भरून येऊ लागली. असंच एकदा जंगलात गेल्यावर मुंग्यांचं एक प्रचंड वारूळ लागलं. त्या मुंग्या एका हरणाला अक्षरशः खात होत्या. तिथेच अरबाचा सूड घेण्यासाठी या मास खाणाऱ्या मुंग्यांचा वापर करण्याची कल्पना डोक्यात चमकली.

'अरबाची देखरेख चालूच होती. एक दिवस चाहूल लागू न देता कुऱ्हाडीचा घाव घालून मी त्याला आडवं पाडलं आणि मुंग्यांच्या वारूळापाशी नेलं. त्याचे सर्व कपडे काढून टाकले. हातपाय झाडाला बांधून त्याच्या तोंडात गवत कोंबलं. आता त्याचं किंचाळणं कोणालाच ऐकू येणार नव्हतं. त्याच्या शरीरावर थोड्या जखमाही केल्या. मुंग्यांना निमंत्रण देण्यासाठी. तरीही वारूळ डिवचावं लागलंच. अर्धा तास आम्ही वाट बघत थांबलो. त्या अवधीत त्याच्या अंगावर हजारो मुंग्या चढल्या. त्यांनी आपलं काम सुरू केलं होतं. तू मास खाणाऱ्या मुंग्या बघितल्या आहेस का, पॅपिलॉन ?'

'अजून तरी नाही. फक्त मोठ्या काळ्या मुंग्या पाहिल्यात.'

'त्या रक्तासारख्या लाल पण छोट्या दिसतात. मासाचे सूक्ष्म कण घेऊन आपल्या वारूळाकडे नेतात. आम्ही जशास तसं उत्तर दिलं होतं. त्या हलकटाची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच करणं बरं ! हजारो मुंग्यांनी त्याला उभा, जिवंत खाल्ला. मरायला त्यानं दोन संपूर्ण दिवस आणि एक सकाळ घेतली. चोवीस तासात त्याचा एकही डोळा जागेवर राहिला नाही.

'सूड घेताना आम्ही दयामाया दाखवली नाही हे मान्य, पण त्यानेही आम्हाला किती छळलं हे विसरून चालणार नाही. आम्ही त्यातून वाचलो हा चमत्कारच. अर्थातच त्यांनी अरबाला खूप शोधलं. त्याच्या अदृश्य होण्याचा आमच्याशी संबंध असणार अशी शंका त्यांना आलीच.

'अरबाचे शिल्लक अवशेष पुरण्यासाठी आम्ही खड्डा खणत होतो. रोज त्याची खोली वाढवत होतो. पाप एकना एक दिवस उघडकीस येतंच. एका पहारेकऱ्यानं तो खड्डा पाहिला. तो पर्यंत अरबाचा मागमूस लागला नव्हताच. दुसऱ्या दिवशी गुपचुप आमचा पाठलाग करून त्यानं सर्व काही पाहिलं.

'त्यामुळेच आम्ही बरबाद झालो.'

'दुसऱ्याच दिवशी त्यांनी आमच्यावर झडप घातली. मुंग्यांनी अजूनही भरलेला त्याचा सांगाडा ओढत ओढत खड्ड्यापर्यंत नेत असताना आम्ही पुराव्यानिशी सापडलो. ते बाजूला लपूनच बसले होते.

'आम्ही अशी जबानी दिली की आधी ठार करून नंतर त्याला मुंग्यांपुढे टाकला. त्यावर त्यांचा विश्वास बसला नाही. अद्याप निकाल लागलेला नाही. आमचं सांगणं त्यांनी मान्य केलं तरच मान वाचण्याची शक्यता. अर्थात, आम्ही आशा सोडलेलीच आहे. म्हणूनच तुला पैसे द्यायचं दोघानी ठरवलंय.'

'तुम्ही वाचाल अशी आपण आशा करू या. मी मनापासून बोलतोय बरं का,' मी म्हणालो, 'तुम्ही मला विचारलं होतं ना की तुमचं काही चुकलं का ? त्रयस्थ या नात्यानं मी सांगतो, तुम्ही जे केलंत ते अत्यंत योग्य होतं. तुमच्या झालेल्या छळाचे मानानं ती शिक्षा सौम्यच म्हणावी लागेल. त्यांनी गिलोटिनखाली घातलंच तर शेवटच्या क्षणी तुम्ही असा असा विचार करा, 'ते माझं डोकं तोडत आहेत. हे काम तीस सेकंदाद अटोपेल, पण तो साठ तास हालहाल होऊन मरत होता. मी नक्कीच जिंकलो.' सुटकेच्या प्रयत्नात किंवा सूड घेताना एखाद्या व्यक्तीला ठार करणं यात काहीच पाप नाही. तुम्ही ती गोष्ट अजीबात मनाला लावून घेऊ नका, मित्रांनो, तुम्ही स्वस्थ आणि शांत रहा' त्या दोन गरीब प्राण्यांच्या चेहेऱ्यावर समाधान पसरलं होतं. माझ्याशी बोलताना सोडलेलं मौन पुन्हा पाळण्यासाठी ते त्यांच्या जगात निघून गेले.

[ क्रमशः ]

---

'आमचं वय आणि पुढे असलेलं उभं आयुष्य लक्षात घेता, आम्ही सुटकेचा प्रयत्न न करणं कसं शक्य आहे ? सारी हयात तुरुंगवास भोगण्याची कल्पनाच असह्य आहे. कृपया कोर्टानं याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा.'

दोन सहकाऱ्यांच्या कानात मेजर काही तरी कुजबुजला. नंतर बाक वाजवून तो म्हणाला, 'प्रतिवाद्यानो, उभे राहा. तुमच्यावरील खुनाच्या प्रयत्नाचा आरोप काढून घेण्यात येत आहे. तथापि पळून जाण्याच्या गंभीर गुन्ह्यामुळे तुम्ही दोषी ठरला आहात. त्याबद्दल तुम्हाला प्रत्येकी दोन वर्षांच्या एकांतवासाची शिक्षा देण्यात येत आहे.'

आम्ही एकदम मोठ्याने ओरडलो, 'थँक यू मेजर.'

## तुरुंगातील कोर्ट मार्शल

**पुढील अंकी**

---

मध्यंतर

# सोफा कम बेड । समांतर निर्मिती

पुष्पा भावे

एखादा नाटककार स्वतःच्या नाटकाची निर्मिती पाहून नाराज होतो, खिन्न होतो, आपल्याला जे म्हणायचे होते ते व्यक्त झाले नाही असे त्याला वाटते, तेव्हा त्याने काय करावे हा नाट्यव्यवहारातला फार अवघड प्रश्न आहे. दिग्दर्शकाचे नाट्यसंकल्पनाचे स्वातंत्र्य आणि नाटककाराचा आविष्कार यात नेमका रास्त तोल कोणता ? या प्रश्नांची चर्चा मागे याच सदरात 'एका नाटककाराच्या बंडखोरीच्या निमित्ताने' (२७ जाने. ७३) केली होती. त्या चर्चेचे स्मरण होण्याचे कारण : अच्युत वझे यांनी 'सोफा कम बेड' हे नाटक लिहिले. त्याचा सत्यदेव दुबे यांनी 'धाडसी धोंडूच्या धांदली' या नावाने प्रयोग केला. या प्रयोगाचा वृत्तांत या सदरात येऊन गेला आहे. (१ मार्च, ७५) हा दुबेकृत प्रयोग अच्युत वझे यांना पटला नाही वा त्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे अगदी थोड्याच अवधीत 'सोफा कम बेड' याच नाटकाची समांतर निर्मिती स्वतः नाटककाराने सादर केली. अच्युत वझे यांच्या या निर्णयाने नाट्यवर्तुळात माफक खळबळ माजली. वझे यांचा हा निर्णय नाट्यजगताच्या मूल्यव्यवस्थेत बसणारा नाही, असेही अनेकांना वाटते. यातला मुख्य प्रश्न काय आहे हे समजावून घेतल्यास मला वाटते, वझे यांच्या निर्णयाला न्याय देणे शक्य होईल. एखादा नाटककार दिग्दर्शकाच्या हाती आपली नाट्यसंहिता देतो त्यावेळी प्रयोगाचे सर्व हक्क स्वाधीन करतो. व्यावसायिक वर्तुळात तर प्रयोगाची अमुक संख्या होईपर्यंत अन्य कोणा दिग्दर्शकाला वा संस्थेला प्रयोगाची परवानगी मिळू शकत नाही. प्रायोगिक रंगमंचावरील अनौपचारिक वातावरणात करारमदार केले जात नाहीत. परंतु रूढी अशी आहे की, एका दिग्दर्शकाकडे—एका संस्थेकडे—असलेल्या नाटकाचे प्रयोग दुसरे कोणी करू शकत नाही. यामुळे असे होते की एखाद्या दिग्दर्शकाचे विशिष्ट नाटकाचे संकल्पन अनुकूल ठरले नाही तरी दुसरा कोणीही दिग्दर्शक त्या नाटकाचा प्रयोग करू शकत नाही. माणसाचा स्पर्श झालेल्या चिमणीच्या पिल्लांसारखी अनेक नाटके या रूढीपायी मारली जातात. व्यावसायिक नाट्यवर्तुळात विक्रीच्या व्यवहाराला इतके महत्त्व असते की, तिथे ही रूढी समजू शकते. परंतु प्रायोगिक रंगमंचावर (जर तो खऱ्या अर्थाने प्रायोगिक असेल—केवळ हौशी नसेल तर—) नाट्यसंहितेचे व त्यानिमित्ताने रंगमंचमाध्यमाचे संशोधन महत्त्वाचे असते. त्यामुळे एका संहितेचे वेगवेगळ्या दिग्दर्शकांकडून झालेले प्रयोग प्रायोगिक चळवळीला मदतच करतील. वझे यांनी स्वतः प्रयोग करताना दुबे यांना नाट्यप्रयोगाची दिलेली परवानगी नाकारलेली नाही. त्यामुळे त्यांची ही वागणूक अनैतिक नाही. या विशिष्ट प्रसंगी या घटनेलावेगळा रंग दिला जातो आहे.कारण दुबे यांनी ते नाटक 'थिएटर युनिट'तर्फे केले होते तर वझे यांनी 'उन्मेष'तर्फे केले आहे. वझे यांचा 'उन्मेष' या संस्थेशी असलेला संबंध लक्षात घेता, स्वतःच्या संस्थेकडे नाटक आणण्याचा तर त्यांचा हेतू नव्हता अशी शका घेतली जात आहे. मला वाटते की, प्रायोगिक रंगमंचावर प्रयोगनिर्मितीचा खर्च व आवक यांचे प्रमाण इतके व्यस्त आहे की, हा हेतू हास्यास्पद ठरावा. मुळात प्रायोगिक रंगमंचाकडे येणारा प्रेक्षकवर्ग इतका मर्यादित आहे—की तो दुभंगला जाऊन दोन्ही निर्मितींना आर्थिक तोटा होईल अशी शंका काढली जाते, तीही अप्रस्तुत आहे. 'सोफा कम बेड'च्या वझेकृत प्रयोगाला विरोध करणाऱ्यांचा युक्तिवाद असा आहे की 'समांतर निर्मिती'च्या तालमी समांतरपणे व्हायला हव्यात. एक प्रयोग झाल्यानंतर दुसरी निर्मिती सुरू होते ती समांतर कशी ? मला वाटते हा शब्दच्छल आहे. कारण एका निर्मितीत आपले म्हणणे पुरेसे व्यक्त होत नाही, हे असमाधान दुसऱ्या निर्मितीच्या मुळाशी आहे. किंबहुना दुबे—वझे यांचे या निरोगी निर्णयाबद्दल स्वागत केले पाहिजे.

अच्युत वझे यांनी स्वतः दिग्दर्शित केलेल्या 'सोफा कम बेड' या प्रयोगाचा विशेष म्हणजे त्याचा ताजेपणा ! या प्रयोगात ज्योमोची भूमिका विनय आपटे यांनी केली आहे. या नटाचे बळकट शरीर, भाबडा चेहरा, कुरळे केस हे दृश्यविशेष ज्योमोच्या भूमिकेला सर्वार्थाने अनुकूल होते. ज्योमोच्या भूमिकेचे अनेक अर्थ व्यक्त करण्यासाठी दुबे यांनी तीन पात्रे वापरली होती. इथे एका विनय आपटेने ते सारे अर्थ समजुतीने व सामर्थ्याने प्रकट केले. गतवर्षीच्या हौशी मेळाव्यातील 'काळकामवेग' या नाटकातही या नटाने आपल्या अभिनय-सामर्थ्याचा प्रत्यय दिला होता. यापूर्वी त्यांनी अनेक नाटकांत भूमिका केल्या होत्या, परंतु नाट्यानुभवाची समज आणि वाक्याच्या तोलाची जाणीव यात ते नेहमी कमी पडत असत. ज्योमोच्या या भूमिकेत मात्र विनय आपटे यांनी नट म्हणून स्वतःला आणि भूमिकेला न्याय दिला आहे. याही नाटकात त्यांच्या स्वगतातील उच्चारस्पष्टतेविषयी तक्रार करण्यास जागा आहे. पण त्यात दोष त्यांचा नसून संयोजकाचा आहे. ज्योमोची शारीर हालचाल व शब्द या दोन्ही अंगाने जाणारी भूमिका चार तासांच्या अवधीत दोन प्रयोगात करावयास लावणे हा शुद्ध अन्याय आहे. त्यातील व्यावहारिक सोय लक्षात घेऊनही तिथल्या तिथे दोन प्रयोग लावण्याची रीत 'उन्मेष'ने बंद करावी हे उत्तम. ज्योमोच्या रोमँटिक प्रेमकल्पनेचे प्रतीक असणाऱ्या अनामिकेच्या भूमिकेस या नाटकात विशेष स्थान आहे. या भूमिकेसाठी

नरागस, 'स्व'त्वाची जाणीव नसणारी नटी शोधणे महत्त्वाचे होते. चंदा जोगळेकर यांच्या रूपाने वझे यांना अनामिका खरोखरच मिळाली असे वाटले होते. चंदा जोगळेकर अनामिका दिसल्या हे खरे, परंतु अभिनयाची प्राथमिक जाणही त्यांना दिसली नाही. अनामिकाने एक पात्र म्हणून अवतीभवती जे चाललेले आहे त्यापासून अलिप्त असणे यातील अंतर दिग्दर्शकाला व या तरुण अभिनेत्रीला कळलेले नसावे. मीनल मेहता या गुजराथी रंगमंचावरील नामवंत अभिनेत्रीने मंदिरा या 'मॉडेल'ची भूमिका केली आहे. त्यांचे शब्दोच्चार विचारात घ्यायचे नाहीत असे ठरवले तरी 'मंदिरा'चे पात्र ही केवळ एक व्यक्ती नाही हे त्यांनी पुरेसे समजावून घेतले नसावे असे वाटले. या नाटकातील आँटीचे पात्र स्वतःकडे लक्ष वेधून घेणारेच आहे. किंबहुना नाट्यसंहिता म्हणून 'सोफा कम बेड'चा विचार करता आँटीच्या पात्राने निर्माण होणारा सामाजिक उपरोध नाट्यवस्तूला उपकारक ठरत नाही असेच वाटते. दुबेकृत प्रयोगात रेखा सबनीस यांनी ही भूमिका व्यंगशैलीत फार सुंदर सादर केली होती. त्या नाटकाचा वेगळा


बॉम्बे डाइंग

एकमेव वितरक

पराग

डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे

आज आपल्यासाठी

खास नवीन प्रकार

सुंदर डिझाईनमध्ये मॅनिला पिसेस

रु. 11-45

रु. 13-60

रु. 16-65


प्रयोग होणार हे ऐकल्यानंतर आँटी वेगळ्या पद्धतीने करणे शक्यच नाही असे म्हटले जात होते. या प्रयोगात ही भूमिका दीपा श्रीराम यांनी केली. या अभिनेत्रीने आतापर्यंत हलक्याफुलक्या भूमिका केलेल्या नाहीत. परंतु या नाट्यप्रयोगातील आँटीची भूमिका त्यांनी कौशल्याने सादर केली. व्यंगचित्रणाला येणारा तर्ककर्कश धारदारपणा त्यांच्या अभिनयाने नाहीसा झाला आणि ती भूमिका हृद्य झाली.

'उन्मेष'च्या नाट्यप्रयोगात सहसा न दिसणाऱ्या तंत्रविषयक प्राथमिक चुका 'सोफा काम बेड'च्या प्रयोगात होत्या. 'उन्मेष' या संस्थेचा अनुभव लक्षात घेता त्या खेदजनक आहेत. परंतु तांत्रिक असफाई लक्षात घेऊनही 'सोफा कम बेड'चा प्रयोग दुबेकृत धोंडूपेक्षा अर्थवाहक वाटला.

**पुनश्च थोडे सेन्सॉरविषयी :** सत्यदेव दुबेकृत प्रयोग वा अच्युत वझेकृत प्रयोग दोन्ही मुक्तपणे केले जाऊ शकत नाहीत. कारण प्रयोग परीनिरीक्षरणमंडळाने ही नाट्यसहिता मुक्त केलेली नाही. म्हणून रंगीत तालीम या स्वरूपात हे प्रयोग करावे लागत आहेत. मुळात प्रायोगिक संस्थेचे अर्थकारण ते काय? त्यात तालीम स्वरूपात नाट्यप्रयोगास तिकीट ठेवणे शक्य नाही. जी शक्ती रंगमंचमाध्यमाच्या संशोधनात खर्ची पडायची ती यामुळे केवळ संयोजनासाठी निरर्थक खर्ची पडते. माझ्या ऐकीव माहितीप्रमाणे सदानंद रेग्यांचे एक नाटक, 'उदय कला केंद्रा'ने सादर केलेले एका प्रसिद्ध इंग्रजी नाटकाचे रूपांतर अजून सेन्सॉरच्या दप्तरात अडकून पडले आहे. याशिवाय नियमावर बोट ठेवून 'आम्ही सहा महिने संहिता ठेवू शकतो' यासारखी बेमुर्वतखोर उत्तरे ऐकावी लागतात ती वेगळीच. सेन्सॉरचा प्रश्न धसास लावल्यानंतर निर्णय कोणाच्या बाजूचा लागतो हेही आता सिद्ध झालेले आहे. तरी नाट्यवर्तुळातील हा बेजबाबदार ससेमिरा थांबत नाही.

सेन्सॉर हे तसे विनोदी प्रकरण आहे. कारण नुकताच खातेपालट झाल्यानंतर जे नवे सभासद नेमण्यात आले आहेत, त्यातील एक 'सखाराम केस'मध्ये न्यायाधीशांनी अयोग्य ठरवलेले आणि दुसरे 'सखाराम प्रकरणी' एकाही सभेला उपस्थित न राहून जबाबदारी टाळणारे, हे नवे सभासद नियुक्त होणे माननीय मंत्र्यांचा सेन्सॉरविषयक दृष्टिकोण स्पष्ट करणारे अशुभसूचक मानायचे का? तसे असल्यास सेन्सॉरविरोधी चळवळ अधिक बांधीवपणे उभी करणे अत्यावश्यक आहे. □

## अर्धांगी

'नाट्यमंदार' या संस्थेच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त माधव कुलकर्णी यांच्या 'अर्धांगी' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. माधव कुलकर्णी यांनी या पूर्वीही एक नाटक लिहिले होते व त्याचा प्रयोग झाला होता. परंतु तो पाहण्याचा योग आला नव्हता. त्यांचे एक नाटक खूप दिवस 'नाट्यमंदार'कडे आहे, असे मात्र अनेक दिवस ऐकत होतो. कुलकर्णींचे 'केसरी'-मधील नाट्यविषयक लिखाण वाचून नाट्यसंहितेच्या स्वरूपाविषयी नाही, तरी किमान पातळीविषयी काही अपेक्षा होत्या. या किमान अपेक्षाही 'अर्धांगी' या नाटकाने पुऱ्या केल्या नाहीत. व्यावसायिक रंगभूमीवर जी केवळ ठाकठीक रचना असलेली नाटके येतात, तेवढेही साधण्याचे प्रयत्न नाटककाराने केलेले नाहीत.

मराठी नाट्यव्यवहारात काय वा साहित्यव्यवहारात काय, साहित्याच्या श्रेयस्करतेच्या साऱ्याच कल्पना आपण सपाट-सोप्या केल्या आहेत. त्या न्यायाने हे नाटक मनोविश्लेषणात्मक मानायचे म्हटले तरी अवघड होईल. तीन अंकी नाटकाच्या अवकाशात आपल्याला काय व किती सांगता येईल, याचा नाटककाराला अंदाज नाही, दिग्दर्शकानेही रंगावृत्ती संपादित केली असावी, असे वाटत नाही. त्यामुळे गंभीर अनुभवसूत्राची चेष्टा होण्यापलीकडे काहीच या नाटकात घडू शकत नाही. संभाषणामध्ये 'काय होतंय?' या प्रश्नाला जसे सर्दी–खोकला असे उत्तर संभवते, तसे जर नाटकात 'त्यांना न्यूनगंड आहे' असे कोणी सांगितले तर कसे वाटेल, याची वाचकांनी कल्पना करावी.

या नाटकाचा नायक विठ्ठल हा नुकता पैशाच्या अफरातफरीवरून तुरुंगात जाऊन आलेला आहे. त्याला नोकरी मिळू शकत

नाही. तो असा का झाला, याचे झटपट उत्तर नाटकाच्या प्रारंभी मिळते. या विठ्ठलची आई लग्नाशिवाय एका माणसाकडे राहते, याचा त्याच्या मनावर आघात झाला आहे. विठ्ठलची बायको साधना नोकरी करते. (मुंबईत सेक्रेटरी वा 'स्टेनो' सहसा महाराष्ट्रीय दिसत नाही, अशी तक्रार मराठी नाटकाचा प्रेक्षक तरी करणार नाही. मराठी नाटकातील सार्‍या नोकरी करणार्‍या बायका खाजगी सचिव असतात, ऑफिसमधील 'बॉस'बरोबर त्या पार्ट्यांना जातात, इ. इ.) तर पुढचे सारे चाणाक्ष वाचकांच्या लक्षात आलेच असेल. ती बॉसच्या प्रेमात पडते. नवरा घर सोडून जातो. बॉस तिच्या प्रेमाचा अपमान करतो. मग ती निराधार होते–शेवटी धंदा करू लागते. विठ्ठल तिचा खून करतो. अशी एक अत्यंत भडक संवादरूप कादंबरी फिरत्या रंगमंचावर आपण पाहतो आणि त्याला नाटक म्हणतो. सुरेश खरे यांची नाटके व शं. ना. नवरे यांची व्यावसायिक रंगभूमीवरची नाटके यांची बेरीज करून, माधव कुलकर्णी या नावाचा भाग दिल्यास 'अर्धांगी' हे उत्तर येते.

हे नाटक पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी दिग्दर्शित केले आहे. पौडवाल दांपत्याने विठ्ठल आणि साधना यांच्या भूमिका केल्या आहेत. श्रीकांत सुभेदार ही भूमिका अलीकडे रंगभूमीवर लोकप्रिय होऊ लागलेल्या मुकुंद गोखले या उमद्या नटाने केली आहे.साधनाची भूमिका करणार्‍या सुषमा पौडवाल (पूर्वाश्रमीच्या मांजरेकर) या बँकस्पर्धा व कृ. रा. सावंतांच्या निर्मितींमध्ये गाजलेल्या आहेत. परंतु 'आय. एन. टी.'च्या 'बेकेट'मध्ये वा या 'अर्धांगी' नामे नाटकात त्यांच्या रंगमंचावरील अनुभवाची जराही खूण दिसत नाही. या बाईला रंगमंचावर चार पावले नीट चालता येत नाही, साडी नेसता येत नाही, रंगमंच फिरल्यानंतर आपल्या प्रवेशाचा भूगोल लक्षात ठेवता येत नाही. दिनानाथ टाकळकरांनी अनेक भार्गव उभे केले. त्यांच्या नेहमीच्या डौलाने, परंतु त्यात टाकळकर सतत दिसत राहिले. गोखले या नटाला अनुकूल शरीरयष्टी आहे. परंतु अत्यंत कृत्रिम हावभाव व वाक्याच्या फेकीत चुकीच्या जागी श्वास घेण्याच्या सवयीमुळे ते भूमिकेला न्याय देऊ शकत नाहीत. दारव्हेकरांचे दिग्दर्शनात खास काहीच नव्हते. अंकाच्या पडद्याबरोबर कोसळणारी नायिका रामचंद्र वर्दे यांच्या थाळीफेकीइतकी जुनी झाली आहे.

या नाटकात एक झोपडपट्टीसुद्धा आहे! फिरत्या रंगमंचाच्या कृपेने! खरे तर दिग्दर्शक व निर्माता या दोघांनीही 'फिरता रंगमंच' या प्रकाराचा पुन्हा विचार करायला हवा. प्रेक्षकांनी बॅटऱ्यांची नृत्ये पाहायची, फटीत अडकलेले नट पाहायचे, पळणारी पात्रे पाहायची, चिंचोळ्या अवकाशात गुदमरणारे प्रवेश पाहायचे, मग नाटक कधी पाहायचे?

तर असे हे 'अर्धांगी' नाटक की ज्यावर गंभीरपणे लिहिणे हास्यास्पद ठरावे. हे नाटक बघताना शं. ना. नवऱ्यांचे 'सुरुंग' यापेक्षा बरे, असा एक पापी विचारही मनात आला. एकूण एप्रिल महिना काही मराठी रंगभूमीला बरा नसावा. □




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १९-४-७५ ते २५-४-७५

**बिहारला स्वास्थ्य मिळणे कठीणच**

बिहारचे नवे मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्र यांनी शपथविधीसाठी नेमका अमावास्येचा 'मुहूर्त' का व कसा निवडला, हे कळणे कठीण आहे. बिहारच्या श्रद्धाळू जनतेला ते कसे मानवणार कोण जाणे ! पण नियती जे घडवायचे ते घडवीतच असते. म्हणूनच श्री. गफूर जाऊन जरी मिश्रा आले तरी बिहारमध्ये स्वास्थ्य, शांतता व सुव्यवस्था स्थापन होण्याचा योग सध्या तरी दिसत नाही. त्यांची एकमुखी निवड व मंत्रिमंडळाची निवड अभंग राहण्याची शक्यता फारच कमी आहे. श्री. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीस कलाटणी मिळण्याची शक्यता असून चळवळीची हवा थोडी कमी होईल. मेष राशीतील रवी या ग्रहाचे राश्यांतर भारताच्या अंतर्गत सुखस्वास्थ्याला त्रासदायक ठरणार आहे. श्री. मोरारजीभाई देसाईंच्या उपोषणाने गुजराथबद्दलच्या निर्णयात ताबडतोब बदल घडण्याची शक्यता नाही. महाराष्ट्र मंत्रिमंडळात बदल, वाढ होण्याच्या हालचाली जोरदार सुरू होतील.

**मेष : कोणत्याही कामात यश**

अंतरिक्षातील रवी ह्या अफाट शक्तीच्या ग्रहाचे तुम्हाला भरपूर पाठबळ असताना तुम्हाला अपयशाची भीती बाळगण्याचे काय कारण ? शिवाय मंगळाचे कुंभ राशीत प्रस्थान ही एकप्रकारे आर्थिक समृद्धीची नांदीच होय. यावेळी खरोखर तुमचे ग्रहमान असे आहे की, ज्या ज्या योजना मनात ठरवाल त्या त्या यश घेऊनच उठतील. चालू धंदा एकदम प्रगतीचा वेग घेईल की, तुम्हीसुद्धा आश्चर्यचकित होऊन जाल. खतांच्या व शेतीमालाच्या व्यापाराला मोठे घाऊक क्षेत्र गवसणार असून, काही अद्वितीय असे घडून जाईल. व्यापारी क्षेत्रात तुमचे वजन मोठ्या प्रमाणात वाढेल. नोकरीत वढती-प्रमोशनचा यावेळी जबरदस्त योग आहे. सोमवार, शुक्रवार हे दोन वार यावेळी तुम्हास अनुकूल आहेत. विवाहाचा बेत लांबणीवर टाका. महिलांना उद्योगक्षेत्रात स्वतःचे कर्तृत्व गाजवायला चांगली संधी मिळू शकेल. शुभांक २-३-५.

**वृषभ : नफा आणि फायदा**

गेल्या आठवड्यात रवी-बुध युती तुमच्या लाभस्थानी आल्यापासूनच तुमच्या सगळ्या परिस्थितीत आमूलाग्र बदल झालेला तुम्हाला जाणवत असेलच. तुमच्यापैकी जे कुणी नाटक, चित्रपट व संगीत क्षेत्रात धंदा करीत असतील ते यावेळी भरपूर कमावणार आहेत. सोमवारचा सिंह चंद्र आणि शुक्रवारचा तूळ चंद्र खूपच काही मिळवून देणार आहेत. लेखकांना नव्या क्षेत्रात संधी मिळेल. सरकारी आश्रय मिळेल. व्यापारीबंधूंना नवे वायदे या दिवशी फायद्याचे ठरतील. नोकरीत मनोरथ पूर्ण होतील. विद्यार्थ्यांना परीक्षेत काठावर यश मिळेल. महिलांना व्यापारी क्षेत्रात मोठा भाव चढेल. संधी मिळेल. शुभांक ३-७-८.

**मिथुन : बेकारांना शुभवार्ता**

नोकरी नाही, धंदा नाही, म्हणून गेले काही दिवस तुम्ही त्रासला आहात. पण मित्रांनो, मला लिहायला आनंद वाटतो, या आठवड्यात तुम्हाला नोकरी-व्यवसाय निश्चित मिळून तुमचे मन प्रसन्न होणार आहे. रवी-गुरू युती होऊन गेली असून ती तुमच्या फायद्याचीच ठरली आहे. आता रवी अकरावा झाला असून दि. २१ चा चंद्र तुम्हाला नोकरी मिळवून देणार आहे. चालू नोकरीतील त्रास व कामाचा ताण कमी होऊन वरिष्ठांना तुमचा विश्वास वाटू लागेल. वकील, आयकर अधिकारी, न्यायाधीश, मॅजिस्ट्रेट इत्यादी वरिष्ठ अधिकारी यावेळी सरकारी कृपेचे मानकरी ठरतील. बुधवारी लागलेल्या रिझल्टात विद्यार्थी पास होतील. महिलांना लेखनात प्रसिद्धी व पैसा मिळेल. शुभांक ४-५-१०.

**कर्क : व्यापारवृद्धी**

तुमच्या राशीत चंद्र असताना आठवड्याची सुरुवात होत आहे ही एक चांगली घटना होय. कागद व्यापारी, कापड व्यापारी, पावडरचे उद्योजक व त्यातील नोकर यांना हा आठवडा फारच अनुकूल आहे. नवा उद्योग सुरू करायला हरकत नाही. प्रामुख्याने गुरुवारचा कन्या चंद्र नव्या उद्योगात प्रगतीची नवी क्षेत्रे दृष्टिपथात आणील. तुम्हाला अजून साडेसाती आहे व शनी बारावा आहे. त्यामुळे नोकरीत दक्षतेने वागावे. रेव्हिन्यू खाते, बांधकाम खाते व पोलीसखाते यातील नोकरांनी अधिक दक्ष राहावे. ज्यांच्याबद्दल वरिष्ठांच्या अगर मालकांच्या मनात संशय असेल त्यांनी फार सावध राहावे. महिलांना नोकरीत बदली स्वीकारावी लागेल. त्यांनी कुरकुरू नये. शुभांक ६-७-११.

**सिंह : राजकीय स्वप्नपूर्ती**

रवी सातवा व सोमवारी चंद्र पहिला या दोन ग्रहांच्या हाती या आठवड्यात तुमच्या जीवनाची सारी सूत्रे आहेत. चंद्ररवीचा हा प्रतियोग तुम्हाला राजकारणात नवे तेज व नवे सामर्थ्य प्राप्त करून देईल. तुम्हाला नेतृत्व व लोकप्रियता मिळेल. तुम्ही जर एखाद्या वरिष्ठ जागेवर असाल तर तुमच्या नावाचा उदोउदो होणार आहे. या वेळी शनिवारी व रविवारी नवे पाऊल उचलू नका. करार करू नका. पैसे उसने देऊ नका. नोकरीत काळजी घ्या. बुधवारनंतर मात्र उत्तम आहे. ज्यांच्या नोकरीत अनिश्चितता असेल त्यांची नोकरी कायम होईल. वकीली उत्तम चालेल, व्यापारात नफा व यश मिळेल. प्रवासात कामे होतील. विद्यार्थ्यांना परीक्षेत यश मिळेल. महिलांना चांगली नोकरी मिळेल. शुभांक ४-७-१०

**कन्या : विवाहाचा प्रश्न सुटेल**

रवी व गुरू सातवे आहेत. बुधवारी चंद्रही राशीत येत आहे. त्यामुळे या आठवड्यात अनेकांचे विवाह सहजतेने पार पडतील. या राशीच्या मातापित्यांच्या डोक्यावरील भार यामुळे उतरेल. तरुणतरुणींना प्रेमात यश येईल. पण शनिवार ते सोमवार मात्र यात फसगत होण्याची शक्यता आहे. ज्यांच्या संसारात अडचणी निर्माण झाल्या आहेत, नवरा-बायकोत भांडणे आहेत, त्यांना या आठवड्यापासून अनुकूल कलाटणी मिळेल. नोकरीत कामाचे चीज होईल. कल्पकतेला वाव मिळेल. वरिष्ठांची मर्जी राहील. काहींना वरिष्ठपद मिळेल. मात्र शत्रुस्थानी मंगळ आहे. तो डोके तापवत राहाणार आहे. पोटात बिघाड निर्माण करीत राहाणार आहे, त्याची काळजी

घ्यावी. चालू स्वतंत्र व्यवसाय ठीक चालेल. व्यापाराला उत्तेजन मिळेल. नव्या उत्साहाने व्यापार चालू करा. मुलींना कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. महिलांच्या गुणांचे नोकरीत चीज होईल. शुभांक ५–६–९.

**तूळ : उद्योगात प्रगती**

आज आठवडा सुरू होत आहे तो कर्क राशीत चंद्र असताना, ही फारच शुभदायक घटना आहे. याचा परिणाम तुमच्या उद्योग-व्यवसावर निश्चितपणे होईल. तुमच्या चालू उद्योगातील सर्वप्रकारच्या अडचणी एका स्त्रीच्या साहाय्याने मिटतील. त्यात काही नवीन योजना कल्पनांना तुम्हाला वाव द्यायचा असेल तर आर्थिक व तांत्रिक मदत मिळू शकेल. एखादा नवा उद्योग सुरू करायलाही अनुकूल ग्रहमान आहे. भारी किमतीच्या कापडाचा व्यापार, कंगन, सौंदर्य प्रसाधने असे काही तरी सुरू करा. नोकरीत उत्साह राहील. कलावंत व आकाशवाणी-वरील कलावंत यांना सोयी-सवलती मिळतील महिलांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात संधी मिळेल. चार पैसे मिळतील. शुभांक ५–९–१०

**वृश्चिक : प्रमोशन**

मीन राशीत रवीसारखा एक प्रबल ग्रह आहे व तेथेच गुरू स्वगृही आहे. तुम्हाला आणखी काय हवे ? नोकरी हा तुमचा आवडता उद्योग. हात हा आठवडा मोठी प्रगतीची परिस्थिती निर्माण करणार आहे. पोलीस-खाते, महसूल खाते, शेती खाते, रासायनिक उद्योग यात काम करणारे अधिकारी यांना बढती मिळून अधिकार मिळणार आहे. विरान पदवीधर, शेती पदवीधर यांना या आठवड्यात उत्तम नोकरी अगर स्वतंत्र व्यवसाय मिळणार आहे. सोमवारी परदेश-प्रयाण होईल. मंगळवार ते गुरुवार महत्त्वाची कामे, गाठीभेटी होतील. तरुण-तरुणी प्रेमात पडतील. महिलांच्या नव्या योजनांना नोकरीच्या क्षेत्रात प्राधान्य मिळेल. शुभांक ७–८–११.

**धनू : महत्त्वाच्या कामात यश**

अनेक ठिकाणी व तुमच्या अनेक संबंधात जे गैरसमज असतील ते या आठवड्यात दूर होणार आहेत. कर्क राशीच्या चंद्रावर आज होणारी आठवड्याची सुरुवात तुम्हाला जागा, स्थावर, बक्षीस वगैरे मिळवून देईल. पाण्यावरचा वा पाण्याच्या कडेचा अपेक्षित प्रवास या आठवड्यात होईल. मंगळवारी व्यापारविषयक व स्वतंत्र उद्योगाचे असे काम होईल. नोकरीतील महत्त्वाची रेंगाळलेली कामे या आठवड्यात बुधवारी वा गुरुवारी पार पडतील. वरिष्ठांची खास मर्जी राहील. गुरू चौथा आहे तो जागेचा प्रश्न सोडवील. मनःस्वास्थ्य मात्र मिळणे कठीणच आहे. मन उगाच साशंक राहील. महिलांच्या बाबतीत सोयीसवलती मिळतील. नव्या वस्तू मिळतील. शुभांक ६–७–१२.

**मकर : नव्या कल्पनेला प्रोत्साहन**

चौथा रवी उच्चीचा आहेच. पण तिसरा गुरू सारे काही करायला तयार आहे. तुम्ही मोकळ्या मनाने काम करा. यश तुमच्या हातात पडेल. या आठवड्यात सोमवार व मंगळवार आर्थिक प्रगती होईल. उद्योग असेल तर बँकेकडून कर्ज मिळेल. अनपेक्षित धनलाभदेखील यावेळी होईल. प्रयत्न करून देखील अजून जागा मिळाली नसेल तर ती या आठवड्यात मिळेल. बंगला बांधला असेल तर या आठवड्यात त्यात तुम्ही राहू शकाल. राजकारणात तुमची सरशी होईल. विरोधकांवर मात करू शकाल. नोकरी कायम होईल. ले-ऑफ मिळालेले नोकर या आठवड्यात पुन्हा नोकरीवर घेतले जातील. प्रेमात मात्र यश कमी आहे. महिलांना प्रवासात सुख व आनंद वाटेल. शुभांक ३–४–७

**कुंभ : आशेचा प्रकाश दिसेल**

एक चमत्कारिक कोंडीत तुम्ही सापडला आहात. कळते पण बोलता येत नाही असे काही तरी सतत घडत आहे. पण लिहायला समाधान वाटते की, तुमच्याभोवती असलेला सारा अंधार पार नष्ट होऊन या आठवड्यात तुम्हाला झगझगीत प्रकाश दिसेल. रविवार व सोमवारचा चंद्र तुम्हाला एखादी महत्त्वाची स्त्री कोंडीतून बाहेर पडायला मदत करील. नोकरीत तर तिच्या साहाय्याने वरिष्ठ दर्जाजी बढती मिळेल. सध्या मंगळ तुम्हाला साथ देत आहे. तुम्ही कोणाचीच पर्वा करू नका. रासायनिक उद्योगात तुम्हाला संशोधनाची संधी मिळू शकेल. आर्थिक स्थिती प्रगतीची राहील. मुले परीक्षेत पास होतील. महिलांना कुटुंबात व राजकारणात नेतृत्व मिळेल. शुभांक ५–६–१२.

**मीन : सावधगिरीने पावले टाका**

दुसरा रवी कौटुंबिक संबंधात प्रगतीची परिस्थिती निर्माण करील. पण मुले वा भाऊबंद हट्टी बनून तुम्हाला खूपच दम आणण्याचा प्रयत्न करतील. मुलांच्या बाबतीत जास्त त्रास होईल. प्रामुख्याने प्रतिष्ठेला धक्का लागेल की काय अशी भीती सारखी वाटत राहील. पण राशीतील गुरू तुम्हाला सांभाळून नेईल. त्याचे मोठे सहकार्य आहे. विवाहाची वये उलटून गेलेल्या अनेकांच्या डोक्यावर या वेळी अक्षता पडणार आहेत. सोमवारी नोकरीचा इंटरव्ह्यू यश मिळवून देईल. व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश पडेल. मंगळवार व बुधवार तब्येतीला जपा. खर्च जरा जपून करा. ज्यांच्याकडे पैशाचे प्रत्यक्ष काम आहे त्यांनी जास्त काळजी घ्यावी. फसवणूक होण्याची शक्यता. महिलांना सार्वजनिक कार्यात मान मिळेल. उद्योगात प्रगतीची पावले पडतील. शुभांक ५–६–११. □

# बिहार

पृष्ठ १६ वरून

परिस्थितीत काहीच फरक पडलेला नाही. जयप्रकाश यांच्या आंदोलनाबाबत मिश्र यांचे धोरण गफूर यांच्यापेक्षा निराळे नाही किंबहुना याबाबतीत त्यांना धोरणस्वातंत्र्य नाहीच. पंतप्रधानांचेच धोरण त्यांना अनुसरावे लागणार आहे. तात्पुरते दबलेले गट काही दिवसांनी पुनः डोके वर काढतील. बिहारमधील गटबाजी नष्ट होत नाही तोपर्यंत तेथील अस्थिरता संपणार नाही. गटबाजी नष्ट झालेली नाही, हे शपथ-विधीच्या वेळीच दिसून आले. समारंभास केदार पांडे, दरोगाप्रसाद राय, सीताराम केसरी, रामलखनसिंग यादव उपस्थित नव्हते. गफूर व पांडे गटास फार थोडे प्रतिनिधित्व मिळाल्याने ते नाराज आहेत.

बिहारच्या राजकारणात जातीचा केवढा प्रभाव आहे, हेही नव्या मंत्रिमंडळाच्या बनावावरून दिसून आले. मंत्रिमंडळात २ ब्राह्मण, २ मुस्लिम, २ आदिवासी ३ हरिजन, १ यादव, १ रजपूत, १ कुर्मी, १ केवरी आणि इतर मंत्री मागास जातीचे आहेत. सर्व जाती–जमातींचे समाधान करण्याची अवघड कसरत मुख्यमंत्री मिश्र यांना करावी लागली. □

ऐतिहासिक सत्याशी इमान राखून तयार केलेला क्रांतिकारी युद्धपट

# बॅटल ऑफ अल्जियर्स

शरद महाबळ

युद्धाच्या गोष्ठी नेहमीच चटकदार असतात, असं आपण म्हणत आलो आहे. पण एखादं युद्ध किती परिणामकारक–किती प्रक्षोभक पद्धतीने चित्रित करता येतं याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे गिलो पॉंटेकार्व्हो यांचा 'बॅटल ऑफ अल्जियर्स' हा युद्धपट. आपण युद्धानंतर क्रांती आणणारे युद्धपट खूप पाहातो, पण हा युद्धपट हीच एक क्रांती आहे–जिवन्त ! चटका लावणारी ! बॅटल ऑफ अल्जियर्स ही सत्यकथा आहे, फ्रेंचांच्या वसाहतवादाच्या जोखडाखालून मुक्त होण्यासाठी झुंजणाऱ्या अल्जेरियन्सची. भारताप्रमाणेच कित्येक पिढ्या पारतंत्र्याची कडू फळं मिळाल्यानंतर अल्जीरियन जनतेनं १९५२ ते १९६२ या दरम्यान 'एफ एल एन' राष्ट्रीय मुक्ती आघाडीच्या नेतृत्वाखाली जो उठाव केला, त्याचं वर्णन अत्यंत डोळस कॅमेऱ्यानं हा चित्रपट करतो.

अल्जीरियन क्रांतीवरील या चित्रपटानं युद्धपटांच्या जगातच क्रांती केली–एवढ्या धिटाईनं सत्य टिपणारे हे चित्र १९७१ सालपर्यंत फ्रान्समध्ये दाखवले गेले नाही–अल्जीयर्सच्या त्या युद्धभूमी बनलेल्या 'कस्बा' भागातून अल्जीरियन लोकांच्या सहकार्याने बनवलेल्या या काळ्या-पांढऱ्या चित्रपटातून ८०,००० डॉलर्स तरी निघणार का ? म्हणून खुद्द याच चित्रपटाचे निर्माते नाके मुरडत होते ! (अर्थात तेवढे पैसे या चित्रपटानं इटलीत जी प्रचंड गर्दी खेचली, त्यात सहा दिवसांत भरून निघाले, हा भाग वेगळा !! ) अल्जीरियन युद्धाच्या आठवणी ताज्या असलेल्या फ्रेंच निवृत्त सैनिकांनी पॅरिसमध्ये हा चित्रपट दाखवू पाहाणाऱ्या थिएटर मालकांना सहकुटुंब ठार मारण्याच्या धमक्या दिल्या–फ्रान्सच्या अन्तर्भागातही या चित्रपटासाठी थिएटर्सची मोडतोड झाली, तीन थिएटर्समध्ये हातबॉंब फुटले, आणि पडद्यावर शेणमारा करण्यात आला ! अखेर लुई मॅले (हो, तेच भारताचे टीव्हीवरील प्रदर्शन–फेम) यांनी मध्यस्थी केली आणि ७१ नंतर अलीकडे फ्रेंच लोकांनी या आपल्याच करतूतींबद्दलची कडू गोळी गिळली. उदारमतवादी ब्रिटिशांनी सुद्धा या चित्रपटाला मान्यता दिली, कधी ? १९६५ सालच्या या चित्रपटाला 'अदर सिनेमा किंग्ज क्रॉस' हा सर्वोत्कृष्ट परकीय चित्रपटासाठीचा बहुमान मिळाला, तो १९७१ साली !! व्हेनिसमध्ये १९६५ मध्येच सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे 'गोल्डन लायन' मिळाल्यावर तब्बल सहा वर्षांनी ! आज देखील अमेरिकेत ब्लॅक पॅंथरसारखी क्रांतीशी निकटचा संबंध राखणाऱ्या गटांमध्ये क्रांती कशी घडते, याचा वस्तुपाठ म्हणून हा चित्रपट दाखवला जातो ! कुठल्याही चित्रपटाच्या वास्तववादाला, यथातथ्यतेला याहून अधिक भरघोस पावती कुठून मिळणार ? मला तरी बॅटल ऑफ अल्जियर्सचे हे श्रेय त्या चित्रपटाच्या सगळ्या महोत्सवी करंडका–पदकांपेक्षा अधिक जिवन्त, अधिक महत्त्वाचे वाटते !

आहे काय असं या चित्रपटामध्ये ? मला वाटते, आधुनिक काळामधील एखाद्या राजकीय उठावाचे एवढ्या उघड्या डोळ्यांनी जणू डॉक्युमेंटरीसारखे चित्रण कुणीच करू धजलेले नाही.

हा तर अल्जीरियन जनतेचा राष्ट्रीय संघर्ष होता. आम्हाला राष्ट्र म्हणून जगू देणार की नाही असा सवाल घेऊन जेव्हा हजारो माणसं एखाद्या राजवटीविरुद्ध मरणाच्या तयारीनं उभी ठाकतात, तेव्हा राष्ट्रवादी क्रांतीचा इतिहास घडत असतो, मग ती राजवट वसाहतवादी परक्यांची असो की सत्तान्ध स्वकीयांची, मोकळेपणाने आपलेसे मानणारा युद्धस्य कथा रम्या : असं सहजगत्या म्हणतो आपण, पण एखादा कल्पक दिग्दर्शक, एखादा युद्धचित्रपट. पॉंटेकार्व्हो एखादाच ! एरवी जयप्रकाशजींची 'चलो दिल्ली' चुकून एखाद्या अजाण छायाचित्रकाराने टिपली, तर ती न्यूजरील्स 'इंडियन न्यूज' मधून साक्षेपानं वगळली जाण्याचाच अनुभव अधिक !

ऐतिहासिक सत्याशी राखलेले इमान ही 'बॅटल'ची मोठीच जमेची बाजू–सतत दोन वर्षे या विषयावर दिग्दर्शक तयारी करीत होते. फ्रॅंको सोलिनास हे लेखक अक्षरश: शेकडो अल्जीरियन लोकांना भेटत होते, त्यांच्या प्रतिक्रिया अजमावत होते. आणि हे लोक हेच या चित्रपटातील तारे–तारका! फ्रेंच रंगभूमीवर काम करणारा ज्यॉं मार्टिन हा एकमेव नट ( कर्नल मॅथ्यू ) सोडला, तर या चित्रपटातील बहुसंख्य माणसे फिल्मी कॅमेऱ्यासमोर प्रथमच येत होती. मनाशी योजलेल्या कथेमध्ये बसेल असा चेहरा धुंडत फिरायचे, आणि तो मिळाला की कितीही साधा, ओबडधोबड असला तरी बेधडक वापरायचा ही या चित्रपटाची 'स्टार सिस्टीम !' डेट्स् मिळाल्या नाहीत, साहेबांचा आज मूड नाही–ही कटकटच नाही पायजे.

अगदी चित्रपटाचा नायक–क्रांतिकारक अली हा एक गरीब शेतकरी होता-अल्जिअर्सपासून तीस मैलांवर राहणाऱ्या खऱ्या अलीशी या 'ब्राहिम'चा चेहरा मिळताजुळता होता, म्हणून आणि त्याच्या चेहऱ्यावरील, डोळ्यातील विद्रोहाच्या भावनेसाठी त्याला दिग्दर्शकांनी उचलले नाहीतरी नायक अली हा असाच भटकणारा, छोटे–मोठे गुन्हे करून पोट भरणारा पण तुरुंगातील फाशीच्या कैद्यांच्या 'अल्जेरिया झिंदाबाद'च्या मरतानाच्या किंकाळ्या ऐकून क्रांतीची ठिणगी उरी घेणारा असा

दाखवला आहे–त्यामुळे हा नवखा तरुण त्या भूमिकेत अगदी योग्य बसतो. ( गंमत अशी की ' बॅटल 'च्या शूटिंगमधून किंवा एकंदरीत फिल्म लाईनमधून आपल्या शेती-कामासाठी औजारे घेता यावीत, एवढीच ' हिरो 'ची या चंदेरी दुनियेकडून अपेक्षा होती ! ! )

चित्रपटाचे सगळे शूटिंग तर अल्जियरमधील त्या छोटया ' कसब्यात 'च झाले आहे. प्रामुख्याने हाताने चालवण्याच्या कॅमेऱ्याने. आणि अगदी क्रांतिकारक अलीच्या फ्रेंचांनी जमीनदोस्त केलेल्या घरापर्यंत सगळ्या घटना जिथे घडल्या तिथे जाऊन चित्रित केल्या आहेत. त्यामुळे निव्वळ ' इटालियन–अल्जीरियन संयुक्त उत्पादन ' राहिला नाही तर ' कसब्याच्या ' उण्यापुऱ्या लाख जनतेलाच दिग्दर्शकाने यात सहभागी करून घेतले, हा खऱ्या अर्थानं अल्जीरियन लोकांचा चित्रपट बनवला.

हा चित्रपट फ्रेंच–अल्जीरियन भाषात बनवला गेला. नॅशनल फिल्म अर्काइव्हजतर्फे पुण्यात नुकत्याच झालेल्या इटालियन चित्रपट महोत्सवामध्ये जी फिल्म दाखवण्यात आली, तिचे संवाद इटालियनमध्ये डब् केलेले होते–तर्जुमा वाचून व कॉमेंटरी ऐकून चित्रपट लागला. तरी या चित्रपटाची ताकद एवढी जबरदस्त की संवाद न समजताही त्यातला क्रांतीचा सारा जोष बरोबर प्रेक्षकांपर्यंत पोचावा. किंबहुना पाँटेकार्व्हो शक्य होईल तेवढे कॅमेऱ्यानेच बोलतो–पार्श्वसंगीताच्या आर्त किंवा कर्कश सुरातून सारं काही सांगतो. उदाहरणार्थ तुरुंगाच्या गजांआडून वधस्तंभाकडे ( गिलोटिन ) नेला जाणारा राजकीय कैदी, आणि माना वळवून, खिडक्यांवर चढून त्याच्याकडे एकटक बघणारे इतर कैदी. त्यांच्या मनात जागी होणारी उठावाची, प्रक्षोभाची भावना कुणीच बोलून दाखवत नाही–चित्रपटभर घटना सांगणारा सूत्रधार देखील स्तब्ध असतो; पण तुरुंगाच्या उंच भिंतींना टकरून परत येणाऱ्या ' व्हिव्हा अल्जेरिया ' या शेवटच्या घोषणा सगळं सांगून जातात.

गिलो पाँटेकॉर्व्हो या तरुण दिग्दर्शकांचे वैशिष्टयच हे की त्याला काहीतरी सांगायचं असतं, म्हणून तो चित्रपट काढतो. चित्रपट या माध्यमावर आपलं प्रभुत्व आहे, तेव्हा निव्वळ रंजन करणारे गुळगुळीत चित्रपट काढावेत, हा त्याचा पिंड नाही. मूळ शिक्षण रसायनशास्त्राचे, हौस म्हणून संगीत शिकला तरी त्याच्यावर खरा पगडा आहे चित्रपट–माध्यमाचा. वयाच्या २५ व्या वर्षी रोझालिनी या प्रसिद्ध इटालियन दिग्दर्शकाचा ' पैसा ' हा चित्रपट पाहून स्वारीने १६ एम्. एम्. चा कॅमेरा पैदा केला, फिल्मस् काढायला सुरुवात केली. इटालीत वास्तववादी चित्रांची लाट ऐन भरात असताना हा दिग्दर्शक कोरडा कसा राहावा ? स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीसाठीच्या झगडयावर त्याने एक चित्र काढले. सिसिलियन खाणकामगारांच्या आयुष्याने त्याला भुलवले, मग त्याने ' ब्रेड अँड सल्फर ' हे मोठं कल्पक नाव असलेला चित्रपट काढला. ' द लाँग ब्लू रोड ' या त्याच्या चित्रपटाला १९५९ साली कार्लोव्ही व्हॅरी येथे सर्वोत्तम दिग्दर्शनाचे पदक मिळाले. ' कापो ' आणि ' क्विमेडा ! ' (= बर्न = जाळा ! ) ही त्याची इतर गाजलेली चित्रे.

पिसा येथे मध्यमवर्गीय ज्यू कुटुंबात जन्मलेला हा बुद्धिवान कलावंत. दुसऱ्या महायुद्धामध्ये तो फॅसिस्टांविरुद्धच्या तिसऱ्या पलटणीत लढला. युद्धानंतर तो कम्युनिस्ट झाला, पण रशियाने हंगेरियन क्रांतीची गळचेपी केली तेव्हा त्याने पक्ष सोडला. डावीकडे कल असूनही स्वतंत्र विचार करणारे जे अनेक विचारवंत आहेत, त्यात पाँटेकार्व्होचा समावेश होतो. त्याचे चित्रपट कुठल्या तरी राजकीय संदेशासाठी असतात, यात संशय नाही. विशेषत: मावळता वसाहतवाद व नव्या आकांक्षांचा राष्ट्रवाद यामध्ये त्याला विशेष रस आहे. बॅटल ऑफ अल्जीयर्स आणि क्विमेडा या चित्रपटात त्याने वसाहतवादामुळे उदयोन्मुख किंवा नवी जन्माला येऊ घातलेली राष्ट्रे कशी कुचंबतात, दडपली जातात, हाच विषय हाताळला आहे.

उगवत्या राष्ट्रवादाबद्दल हिरीरीने लिहिणारा, कुणाची भीडमुर्वत न ठेवणारा पाँटेकॉर्व्हो एकांगी, पक्षपाती मात्र नाही. एखाद्या लोकसमूहाच्या उठावात हिंसाचार अटळ असेल, तर तो हिंसाचार सत्याचा एक पैलू म्हणून दाखवायला तो मागे पुढे पाहत नाही–पण हिंसाचाराला तो ' ग्लोरिफाय 'देखील करत नाही. सत्तारूढ फ्रेंच काय किंवा चळवळे अल्जीरियन्स हे दोघेही त्याच्या लेखी माणसाला गुलाम म्हणून दडपणाऱ्या, माणूस म्हणून जगू न देणाऱ्या राजकीय–सामाजिक परिस्थितीचे




वळी आहेत. त्यामुळेच तो सतत चरणारे, धडाधड गोळ्या घालणारे, संगिनी टोचून लोकांना छळणारे फ्रेंच सैनिक जसे दाखवतो, तसेच तेच सैनिक एका पकडलेल्या चळवळ्याला छळून त्याच्याकडून माहिती काढून घेतल्यानंतर त्याला चुचकारताना, खाऊपिऊ घालताना, सिगरेट देताना 'बॅटल' मध्ये दिसतात.

फ्रेंचांच्या हिंसाचाराचेच निव्वळ चित्रण करायचे व चळवळ्यांच्या सगळ्या कृत्यांना चांगले म्हणायचे, अशी पाँटेकार्व्होची पद्धत नाही. त्यामुळे अल्जीरियन लोकांनी एका पाठोपाठ एक बाँबस्फोट करून फ्रेंचांची तीन अद्ययावत हॉटेल्स, बारलाऊन वगैरे उद्ध्वस्त केलेली दाखवतो, मुक्त नाचण्या–हसण्यात आणलेला व्यत्ययही दाखवतो आणि शेवटी भोवताली जे चालले आहे, त्याची दादही नसलेली छोटी छोकरी शांतपणे आईस्क्रीम खाताना दाखवतो–हिंसाचारावर पाँटेकार्व्हो आघक नाही किंवा राणा भीमदेव पद्धतीच्या आरोळ्याही ठोकत नाही. फ्रेंचांच्या आलिशान वस्त्या आणि त्या तुलनेने अल्जेरियन लोकांचा कोंदट, गल्ल्याबोळांनी भरलेला 'कसबा' जसा तो दाखवतो, त्याचप्रमाणे अल्जीरियन चळवळ्यांच्या उत्पाताला कंटाळून, रेसकोर्सवर सिगारेट विकणाऱ्या काळ्या अल्जेरियन पोराला इतर फ्रेंच मारायला धावतात, तेव्हा त्याला वाचवणारा फ्रेंचमनही दाखवतो.

त्यामुळेच बॅटल ऑफ ॲल्जियर्स जरी क्रांतीचे पाठ्यपुस्तक मानले गेले तरी मूळ दिग्दर्शकाचा हेतू इतिहासकाराचा होता. अल्जीरियन लोकांनी हा चित्रपट पाहिल्यानतर 'Too soft towards the French' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली, ही गोष्ट बोलकी ठरेल.

'अल्जियर्स 'ची शैली डॉक्युमेंटरी पद्धतीची असली तरी ती कंठाळी, एकसुरी नाही. संवादांचा कमीत कमी वापर, उत्कंठा कायम राखणारी प्रसंगांची गुंफण, आणि अचूक वेळी मागून सूत्रधाराने मोजके स्पष्टीकरण हे या शैलीचे विशेष मानावे लागतील.

चित्रपटाची सुरुवात अल्जियर्सचा उठाव फ्रेंच सैनिक कर्नल मॅथ्यूच्या नेतृत्वाखाली चिरडून टाकण्यात जवळजवळ यशस्वी झाले आहेत, या ठिकाणी, संघर्षाच्या क्लायमॅक्सपाशी होते. आता अखेरचे भूमिगतांचे ठाणे फ्रेंचांना माहीत झाले, त्यामुळे शेवट फार दूर उरला नाही, अशा तणावात प्रेक्षक चित्र पाहतो. कुठल्याही क्षणी बाँबस्फोट होऊन आपले लपण्याचे ठिकाण जमीनदोस्त होणार या तयारीने बसलेल्या चार क्रांतिकारकांचे दर्शन आपल्याला होते–यात स्वातंत्र्यसंग्रामासाठी बुरखा झुगारून पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या स्त्रियाही आहेत, तेरा-चौदा वर्षांचा पोरगेला लढवय्याही आहे. यातून अल्जीरियन संघर्ष किती खोलवर रुजला होता ते दिसते.

या क्लायमॅक्सनंतर आपण पुन्हा अल्जीरियन लढाईच्या सुरुवातीकडे–एफ्. एल्. एन. च्या स्थापनेकडे जातो–जुगार खेळून वेळ काढणाऱ्या अलीला तुरुंगात जावे लागते, तो नाट्यमय प्रसंग दिसतो. शिरच्छेद केला जाण्याच्या क्षणापर्यंत 'अल्जीरिया झिंदाबाद 'चा पुकार दिसतो.

तुरुंगातून एका वेगळ्याच स्फूर्तीने भारून आलेला अली अमली पदार्थ विकून लोकांना गुंगवणाऱ्या आपल्या जुन्या सहकाऱ्यांवर गोळ्यांचा वर्षाव करतो. दारू व इतर अमली पदार्थ संपूर्णपणे सोडून अल्जीरियन निर्धाराने लढ्यास ठाकतात.

अल्जीरियन संघर्ष म्हणजे नुसतीच गोळ्यांची आतषबाजी नव्हती–सामाजिक पुनरुत्थान होते, हे दाखवण्यासाठी पाँटेकार्व्हो युद्धाच्या छायेत घडलेले एका क्रांतिकारक जोडप्याचे लग्न दाखवतो. आता अल्जीरियन स्त्रिया बुरखा वापरत नाहीत. बुरखा वापरायचा झालाच तर तो गनिमाला मारणारे पिस्तूल लपवण्यासाठी–क्वचित पुरुषांनीसुद्धा !

फ्रेंचांची जास्ती कुमक येऊन शहरात काटेरी तारांची तटबंदी होते–तरीही फ्रेंच अधिकाऱ्यांना गोळ्या घालणे व्यवस्थित चालू राहते–फ्रेंचांच्या श्रीमंत शहरात तीन हातगोळे ओळीने फुटतात. हे हल्ले दाखवताना प्रत्यक्ष तारीख-वेळ सांगितल्यामुळे सगळ्या वर्णनाला अतिशय अधिकृतपणा येतो.

फ्रेंच सैनिकही गावकऱ्यांची राहती घरे उद्ध्वस्त करतात. अल्जीरियनांचा संप निष्ठुरपणे चिरडला जातो. अल्जीरियन प्रश्नाची भरपूर चर्चा करून नेहमीप्रमाणे यूनो काहीच निर्णय घेत नाही.

अल्जीरियन कोंडी अधिकच आवळली जाते. एकामागून एक क्रांतिकारक लढत लढत उडवले जातात, अगर फ्रेंचांच्या तावडीत सापडतात, छळले जातात–मारले जातात. शेवटी राहतो अली–तोही चित्रपट सुरू होताना दाखवल्याप्रमाणे ज्या इमारतीत दडलेला असतो ती इमारत उद्ध्वस्त होऊन गाडला जातो.

उपसंहार आपल्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा. मारे सशस्त्र क्रांतिकारक निपटून काढूनमुद्धा सामान्य माणसे, स्त्रिया, मुले गोळीबाराला न भिता उग्र निदर्शने करतात–पोलिसांच्या लाठ्यांना न जुमानता एक अल्जीरियन बाई निशाण फडफडावत पोलिसांनाच वेडावते, पुनःपुन्हा त्यांच्या अंगावर चालून जाते. या निशाणापाठोपाठ हजारो निशाणे उभी राहतात, आणि अखेर २ जुलै १९६२ रोजी घोषणा होते–अल्जीरियन राष्ट्र या नव्या अर्भकाचा जन्म होतो–खरं तर अल्जीरियन लढाईच्या वीरांची ही गोष्ट विराणीमध्ये संपते, राष्ट्रीय मुक्तिआघाडीचा बीमोड होतो तेथे संपते. अल्जीरियन स्वातंत्र्याची घोषणा. ही केवळ दिग्दर्शकाने घातलेली तळटीप आहे.

सशस्त्र उठावाने अल्जियर्सचे प्रश्न सुटले का ? राष्ट्र म्हणून जगायला अल्जीरियन्सना ही चळवळ कितपत उपयोगी पडली ? स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेल्या उत्कट धडपडीची लाट ओसरताच पुन्हा पूर्वीचीच सामाजिक रूढींची (उदाहरणार्थ–स्त्रियांनी बुरखा वापरणे सुरू करणे) चौकट लोकांच्या माथी आली नाही काय ? असे प्रश्न जरूर उपस्थित करता येतील. क्रांतीचा उद्घोष करणारांजवळ या प्रश्नांची उत्तरे नाहीत, हेही खरे.

राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होऊनही अद्याप राष्ट्र न बनलेली नवोदित राष्ट्रे कितीतरी आहेत. खुद्द भारत अजून राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेतून जातोच आहे–स्वातंत्र्याचे नवजात अर्भक अजून पंचवीस वर्षे ओलांडूनही अशक्त, किरकिरेच आहे.

पण म्हणून काही राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यासाठी केलेल्या सशस्त्र-निःशस्त्र संघर्षाची किंमत कमी होत नाही. सशस्त्र क्रांतीचे मोहरे पडल्यानंतरही जर विद्रोहाची आग जागी असेल तर बदल अटळ असतो, हे अल्जियर्सने आपल्याला दाखवलेच. सशस्त्र क्रांतीच्या नेत्यांमधूनच सामाजिक बदलासाठी पुन्हा जीवाची बाजी लावणारे लोकनायक मिळाले, तर लोकांच्या इच्छेचा अंतिम विजय ठरलेला आहे, हीच ग्वाही 'बॅटल ऑफ अल्जियर्स ' आपल्याला देत नाही का ? □

[ या लेखासाठी 'बॅटल ऑफ अल्जियर्स ' संबंधित पुस्तके–इतर साहित्य, मुख्य म्हणजे दुर्मिळ छायाचित्रे नॅशनल फिल्म अर्काइव्हचे श्री. पी. के. नायर व त्यांचे सहकारी यांच्या सौजन्याने मिळू शकली.
'तिसऱ्या जगा 'तील चित्रपटावरील एक अधिकारी समीक्षक श्री. लाइल पिअरसन यांचेही साहाय्य मोलाचे ठरले. ]

□

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

## आश्चर्य !

पंधरा वर्षानंतरही प्रसिद्धीच्या झोतात राहणारी नर्गिस

अजूनही तब्बल दोन-तीन आठवडे हाऊस फुल्ल जाणारा मदर इंडिया

' वुईमेन्स लिब ' बद्दल चित्रसृष्टीत कुणाला बोलायचा हक्क असेल, तर तो नर्गिसचा. स्वतःला ' लिबरेटेड ' समजणारा झीनत अमान, अंबिका जोहर इत्यादी इत्यादी जणींचा एक गट चित्रसृष्टीत आहे. पण मनमुक्त बेछूटपणे वागणं यापलीकडे त्यांच्या ' लिबरेशन 'ची उडी जाऊच शकत नाही. कलाकार म्हणून स्वतःचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्रकट करणं, आपला ठसा जनमानसावर ठेवून जाणं, हे यांना साधत नाही. अगदी चिल्लरशिल्लर भूमिका मिळवायला देखील यांना नटांच्या मेहरबानीचं छत्र लागतं. एखादी जया भादुरी वा एखादी हेमामालिनी नायिकाप्रधान भूमिका मिळवू शकते. बाकी बहुतेकजणी नायकांच्या सावल्या आणि शोभेच्या बाहुल्या बनण्यात पाच-सात वर्षं घालवतात आणि उगवल्या तशा मावळून जातात.
आणि नर्गिस मात्र पडद्याकडे पाठ फिरवून पंधरा वर्षं झाली तरी प्रसिद्धीच्या प्रकाशात राहते. अद्यापही हृषिकेश मुखर्जी तिला, ती म्हणेल तेव्हा उत्कृष्ट भूमिका द्यायची तयारी दाखवतात. दक्षिणेकडचे धनाढ्य निर्माते कोरा चेक तिला ' ऑफर ' करतात, शेवटची एकच भूमिका तिनं करावी, अशा मनधरण्या करतात पण आपला चित्रसंन्यास कठोरपणे पाळणारी नर्गिस हे या अजब नगरीतलं एक खरंखुरं आश्चर्य आहे. नवी पिढी तिला सुनील दत्तची बायको म्हणून ओळखते; पण जिद्दीनं आपलं स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या सुनील दत्तला अद्यापही नर्गिसचा नवरा म्हणूनच ओळख देणारी एक पिढीही आहे आणि ती अर्थात नर्गिसचा जमाना पाहिलेली पिढी आहे.
देदीप्यमान यश आणि गगनचुंबी लोकप्रियता मिळवणारे कलाकार प्रत्येक पिढीत, मोजके का होईना, पण पाहायला मिळतातच. लोकप्रियतेचा इतिहास निर्माण करणाऱ्यांमध्ये सैगलचं नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. दिलीपकुमार, राज कपूर आणि यांचं नाव तर मुद्दाम सांगण्याचं कारण नाही; पण या श्रेयनामावलीतून राजेश खन्नालाही वगळून चालणार नाही. स्त्री-कलाकारांच्या वाट्याला हे भाग्य त्या मानानं फारच कमी आलं. ज्यांचा अभिनय पुढच्या पिढ्यांमध्ये आदर्श मानला गेला, ज्यांनी फक्त चहाते मिळवले नाहीत, तर निष्ठावान भक्त मिळवले, अशा कलाकारांच्या श्रेणीत अभिनेत्रींमध्ये फक्त नर्गिस आणि मीनाकुमारी यांचंच नाव घेता येईल. गुणी वहिदा रहमानला जाणकारांची प्रशंसा अमाप लाभली; स्वतःचा खास असा एक चहातावर्ग तिनं मिळवला, पण पहिल्या क्रमांकाचं स्थान मिळाल्यावर चार-पाच वर्षांच्या अवधीतच तिची कारकीर्दही दुर्दैवानं संपुष्टात आली. राजमान्यता आणि लोकमान्यता-दोन्ही मिळवायची योग्यता असलेली नव्या पिढीतली एकमेव स्त्री-कलाकार म्हणजे जया भादुरी. पण आज ना धड संसार, ना धड करीयर अशा विचित्र वाटेवर ती उभी आहे.
ऐन बहरात असताना लोकमान्यता आणि राजमान्यता लाभण्याचं भाग्य नर्गिसला लाभलं. एवढंच नव्हे, तर योग्य वेळी आणि सन्मानानं, समाधानानं निवृत्त होण्याची दुर्मिळ दैवी मेहेरबानी तिच्या वाट्याला आली. (नूतनला ' मंगेतर 'मध्ये किंवा मीनाकुमारीला ' जवाब 'मध्ये पाहण्यासारखं दुर्भाग्य दुसरं नसेल.) केवळ लोकप्रिय अभिनेत्री डोळ्यासमोर ठेवून गेल्या पंचवीस वर्षांमध्ये दोनच चित्रपट तयार झाले असतील-एक : ' मदर इंडिया ' आणि दुसरा ' पाकीजा. '
योगायोग पाहा, ' मदर इंडिया 'नंतर नर्गिस स्वखुशीनं निवृत्त झाली. ' पाकीजा ' मीनाकुमारीच्या आयुष्यातलं शेवटचं आणि मानाचं पान ठरलं.
पडद्यामागे नर्गिस आणि मीनाकुमारी यांचं नातं स्नेहाचं राहिलं. पडद्यावर मात्र हे नातं कट्टर प्रतिस्पर्ध्याचं होतं. ' मदर इंडिया ' आणि ' शारदा ' एकाच साली प्रदर्शित झाले आणि ' फिल्मफेअर ' नेमकं कुणाला बहाल करावं, असा पेच परीक्षक मंडळींच्या पुढे उभा राहिला. दोन्हींपैकी सरस भूमिका कोणती, यावर वाचक आणि प्रेक्षक मंडळींची चांगलीच खडाजंगी झाली. हिंदी असो, इंग्रजी असो की मराठी , ज्या त्या फिल्मी मासिकाला त्या वेळी हा एकच विषय चर्चेला पुरला. ज्येष्ठ समीक्षक श्री. र. गो. सरदेसाई यांनी त्या वेळी दिलेलं नमुनेदार उत्तर स्मरणात राहिलं आहे-केवळ माझ्या बाजूचं आहे म्हणून नव्हे; समतोल आहे म्हणून. त्यांनी म्हटलं होतं : ' निःसंशय या दोन सुरेख व्यक्तिरेखा आहेत आणि तितक्याच तोलामोलानं अभिनीत झाल्या

आहेत. त्यातूनही काकणभर सरसपणाचे गुण द्यायचे झाले तर ते मीनाकुमारीच्या ' शारदा 'ला द्यावे लागतील. नर्गिसच्या अभिनयसामर्थ्याला उठाव देणारी हरेक गोष्ट ' मदर इंडिया 'त आहे–प्रथमपासून अखेरपर्यंत सहानुभूती कायम ठेवणारी व्यक्तिरेखा, अकृत्रिम हृदयस्पर्शी कथा, सिद्धहस्त दिग्दर्शक, रंगीत छायाचित्रण. याउलट ' मदर इंडिया 'च्या तुलनेनं ' शारदा 'चा सेट्‌प् दुय्यम दर्जाचा आहे, त्याचा दिग्दर्शक नामवंत आहे, पण मेहबूबच्या तोडीचा नाही; कथा साचेबंद आणि कृत्रिम आहे. ' शारदा 'कडे सहानुभूतीचा ओघ एकदा तरी खंडित होतो (अजाणतेपणाने का होईना, ती प्रियकराचा विश्वासघात करते). एक मीनाकुमारीचा अप्रतिम अभिनय सोडता 'शारदा ' खास मद्रासी सिनेमा आहे... '

असो. काही असो, प्रचंड बहुमतानं ' फिल्मफेअर 'ची विजयमाला नर्गिसच्या गळ्यात पडली. समीक्षकांनी खास पारितोषिक देऊन मीनाकुमारीच्या ' शारदे 'चा गौरव केला. तशा दोघींनीही अनेक तऱ्हेच्या भूमिका केल्या, पण दोघींनाही नाव मिळालं ते करुण, गंभीर भूमिकांमुळे. या भूमिकांचे अपेक्षित परिणाम साधण्याचे दोघींचे मार्ग मात्र भिन्न होते. मीनाकुमारीचा मार्ग हृदयाचा मार्ग होता. प्रत्येक दुःखान्त भूमिकेबरोबर ती कणकण जळून मरण पत्करायची. नर्गिस बुद्धीवर अधिक अवलंबून आहे, धीरोदात्तपणे प्रसंगाला तोंड देते आहे असं वाटतं. तुलना या नेहेमीच घृणास्पद असतात, वादग्रस्त असतात. व्यक्तिशः मला मीनाकुमारी प्रिय आहे, म्हणून नर्गिसचं अभिनयनैपुण्य कमी लेखण्याचा कोतेपणा करण्याचं मला काहीच कारण दिसत नाही.

नर्गिसचे फारसे चित्रपट मला पाहायला मिळालेले नाहीत. पण मला वाटतं, ' मदर इंडिया ' हा एकच चित्रपटदेखील तिच्या स्वाभाविक अभिनयगुणांची कल्पना यायला पुरेसा आहे. याच चित्रपटानं तिला कार्लो व्ही व्हेरीच्या दर्जेदार चित्रपटमहोत्सवात अभिनयाचं ' ग्रँड प्रिक्स ' मिळवून दिलं, ते उगीच नव्हे. भारतीय अभिनेत्रींपुरतंच नव्हे, चित्रपटातल्या प्रत्येक अंगावर वर्चस्व गाजवून भूमिका सजवू पाहाणाऱ्या सर्वेसर्वा नटांपुरतंही कार्लो व्ही व्हेरीचं ' ग्रँड प्रिक्स ' ही अप्राप्य आणि म्हणून हेव्यानं बघितली जाणारी चीज आहे. ' परदेसी ' या पहिल्या भारतीय–रशियन सहकारपटात तिला काम मिळावं ही केवळ ' आर. के. फिल्म्स 'शी असलेली तिच्या दीर्घ सहचर्याची पुण्याई नव्हे. तिच्या अभिनय गुणांची ती रास्त पावती आहे. ' परदेसी ', ' अनहोनी ' ( डबल रोल ), ' हलचल ', ' जोगन ' आणि ज्यासाठी तिनं ' उर्वशी ' पारितोषिक आणि एकमुखी प्रशंसा मिळवली तो ' रात और दिन '–हे तिचे सर्वोत्कृष्ट चित्रपट मानले जातात, आणि त्यांपैकी एकही पाहाण्याचा योग येऊ नये ना ? पण ' अंदाज ' तर पाहायला मिळाला. पोशाखानंच नव्हे, तर आचारविचारानं आधुनिक असलेली, पण त्या आधुनिकतेपायीच भावनिक तणावामध्ये सापडलेली ती तरुणी नर्गिसच्या व्यक्तिमत्त्वाला चपखल बसणारी होती, अभिनयगुणांना पूर्ण वाव देणारी होती. मला आठवणारा तिचा शेवटचा चित्रपट ' लाजवंती '. खास कौटुंबिक वळणाचा चित्रपट. सुस्वभावी, सोशिक पत्नी... गैरसमजानं पतीनं तिला घराबाहेर काढणं ...आणि अर्थात अखेरीस देवी म्हणून मानानं घरात आणणं ! ' शारदा 'ला ज्या कसोट्या लावल्या त्याच कसोटीनं ' लाजवंती 'मधली नर्गिसची भूमिका सरस मानावी लागेल. तकलादू कथा आणि सरधोपट दिग्दर्शन यांच्यावर मात करून लक्षात राहाणारा अभिनयाविष्कार नर्गिसनं या सिनेमात दिला आहे.

नर्गिसच्या जीवन कहाणीत मेहबूब खान यांच्याबरोबरच राज कपूरचं नाव ठळक अक्षरात लिहिलेलं आढळतं. नर्गिसला चित्रांगणात आणून सोडण्याचं आणि दक्षतेनं तिच्यातली अभिनेत्री जोपासण्याचं काम मेहबूब खान यांनी केली. ( ' मदर इंडिया ' त्यांचाच. ) ' आर. के. फिल्मस ' आणि राज कपूर यांच्या सहवासात नर्गिसच्या व्यक्तिमत्त्वाला नवे धुमारे फुटले. राज कपूरच्या ' आग ' या पहिल्या चित्रपटापासून सुरू झालेला हा सहप्रवास ' जागते रहो ' या चित्रपटाशी थांबला. शिवाय ' आर. के. फिलमस ' बाहेरचे नर्गिस–राज कपूर जोडीचे सिनेमे लोकप्रिय ठरतच होते. ' चोरी चोरी सारखा चित्रपट अद्यापही मॅटिनीला पंचवीस पंचवीस आठवडे जातो म्हणजे पाहा.) आकस्मिकपणे राजकपूर–नर्गिस जोडी फुटली. दोघेही आता संपणार असा अंदाज अनेकांनी केला. पण त्यांना राज कपूरची जिद्द ठाऊक नव्हती. त्यांना नर्गिसचं खंबीर मनोधैर्य ठाऊक नव्हतं. तिनं जाहीरपणं टिपं गाळली नाहीत; प्रेस कॉन्फरन्सेस घेऊन मनातलं गरळ ओकलं नाही. काही काळ तिनं संपूर्ण अज्ञातवास पत्करला, आणि काही घडलंच नाही अशा थाटात तिनं आपला चित्रसंसार पुन्हा सुरू केला. अभिनय, कीर्ती–दोन्ही ठिकाणच्या आपल्या समृद्धीत तिनं ' मदर इंडिया ' करवी उदंड भर घातली.

नर्गिस आणि मीनाकुमारी यांच्या मनोवृत्तीतला फरक इथे स्पष्ट होईल, आणि एकच परिणाम साधण्याच्या त्यांच्या आविष्कारपद्धती भिन्न का होत्या, याचाही



खुलासा इथे मिळेल. आयुष्यातले चढउतार दोघींच्याही वाट्याला आले. पण नर्गिस प्रत्येक प्रसंगातून सावरली, एवढंच नव्हे, तर ताठ मानेनं उभी राहिली. मीनाकुमारीनं या उतारांचं अमूल्य रूपान्तर आपल्या अभिनयात केलं, पण खासगी आयुष्याची तिची वाट जीवघेणी निसरडी ठरली. नर्गिसच्या जन्मजात गुणांना तिच्या सधन घराण्याचा आधार मिळाला, उत्तम शिक्षणाची जोड मिळाली. ती आत्मविश्वासाचं चित्र बनली; बुद्धिमत्तेचा उपयोग आयुष्यात करू शकली. तर आर्थिक आणि भावनिक ओढाताणींमध्ये वाढलेली मीनाकुमारी अधिकाधिक हळवी बनत गेली. लौकिकार्थी न लाभलेल्या शिक्षणाची उणीव तिनं स्वतःच्या वाचनवेडानं भरून काढली. पण संकोचाच्या शिंपल्यातून आत्मविश्वासानं बाहेर यायला, स्टेजवर उभं राहायला मीनाकुमारीला आयुष्याचे पंचवीस पावसाळे वळचणीला काढावे लागले.
मीनाकुमारी आणि नर्गिस यांच्यात ' शारदा ' नि ' मदर इंडिया 'च्या संदर्भात लिहिताना र. गो. सरदेसायांनी आणखी एक मार्मिक विधान केलं आहे. ते म्हणतात, ' राज कपूरबरोबरच्या आपल्या पहिल्याच चित्रपटात मीनाकुमारीनं त्याला मागं बसवलं आहे. त्याच्या बरोबर चौदा चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या नर्गिसला...' —हे साधलं नाही असं त्यांना म्हणायचं नाहीये. मला बरोबर संदर्भ आठवत नसल्यानं मी ते वाक्य सोडून दिलं आहे, इतकंच. या चौदा चित्रपटांमध्ये नर्गिसची अवस्था काय झाली असेल ? राज कपूरच्या वरचढ होण्याचं तिनं स्वतः होऊन कटाक्षानं टाळलं हे उघड आहे. (जशी जया आज अमिताभबरोबर काम करताना, आपण त्याच्या वरचढ होणार नाही याची डोळ्यात तेल घालून काळजी घेते.)
म्हणूनच अनेकांना भीती वाटत होती की, राज-नर्गिस हे साहचर्य संपलं, आता नर्गिसही संपेल. नर्गिस त्या असह्य परिस्थितीतून पुन्हा उभी राहिली. सुनील दत्तशी तिनं लग्न केल्यावरही अनेकांना चिंता लागून राहिली. बायको वरचढ आणि नवरा नवशिका नट; हा संसार टिकणार कसा ? नर्गिसनं योग्य वेळी आणि खुबीनं निवृत्ती स्वीकारली. सुनील दत्त मोठा बनण्यात आता तिची प्रतिष्ठा होती. त्याच्या स्वाभिमानाला जराही धक्का न लागू देता, त्याच्या आणि ' अजंता आर्ट्स 'च्या जडणघडणीत तिनं पडद्यामागं राहून वाटा उचलला.
या काळात तिनं ' यादे 'ची कथा लिहिली. ' अजंता आर्टस 'चा कारभार सांभाळला. आणि आज सुनीलसह तीन अपत्यांना सांभाळीत नर्गिस अनेक सामाजिक कमिट्यांचं माननीय सदस्यत्व भूषवते. आहे. आघाडीवर अनेकदा जाऊन फौजी भाईंसाठी ' अजंता आर्टस ग्रुप 'चे मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करते. ' इप्पा' चं तात्पुरतं अध्यक्षपद सांभाळते. आठवड्याकाठी पाचदहा उद्घाटन, डझनावारी मुहूर्त आणि शेपन्नास मीटिंग्ज या जबाबदाऱ्या सांभाळते. आंतरराष्ट्रीय चित्रमहोत्सवांमध्ये परीक्षक म्हणून मिरवून येते. वेळप्रसंगी स्टेजवर जाऊन आत्मविश्वासानं माईक हातात घेते. ' बॉबी ' डफ्फड चित्रपट आहे किंवा ' जमीर 'इतका भुक्कड चित्रपट उभ्या आयुष्यात पाहिला नाही असं ठणकावून सांगते, आणि तरी चित्रसृष्टी तिच्याविरुद्ध ब्रही काढत नाही. वेळप्रसंगी नव्या नटांना चार शब्द सुनवायला ती कमी करीत नाही. पण त्याही गप्प बसतात. कारण नर्गिससारखी सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याची स्वप्नं त्या पाहतात, त्यासाठी नेहमी पांढरी साडीदेखील नेसतात. हळूचकन एखादी सांगायचा प्रयत्न करते, ' पण माहीत आहे का, याच नर्गिसला एकदा बेफाम गाडी हाकण्याबद्दल शिक्षा झाली होती ?', पण याच नर्गिसच्या हातून उद्या आपल्या सिनेमाचा मुहूर्त आहे, किंवा हिचीच शिफारस आपल्याला सुनील दत्तबरोबर एखादी भूमिका मिळवून देईल, हे वेळीच लक्षात येऊन ती जीभ चावून गप्प बसते.
नर्गिसच्या सगळ्या कमी-अधिकासह चित्रसृष्टी आजही तिला आपली मानते. सरकार-दरबारी चित्रव्यवसायाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळीत आजही नर्गिसला अग्रभागी स्थान दिलं जातं. तिचं स्वतंत्र कर्तृत्व आजही मान्य केलं जातं. मी तिला ' लिबरेटेड ' समजते ते म्हणूनच. ◻

## मदर इंडिया

सिनेमांचं देखील पुस्तकांसारखंच असतं. काही पुस्तकं वाचायची आणि विसरून जायची असतात. काही वाचून रवंथ करायची असतात. सिनेमांना हा न्याय लागू केला तर ' मदर इंडिया ' आपापल्या पसंतीनुसार शेवटच्या दोन्हींपैकी एका वर्गात बसणारा ठरेल निश्चित.
प्रकाशनाआधी खळबळ उडवणाऱ्या ज्या ' मदर इंडिया 'चा आजही चित्रसृष्टीवर पगडा आहे. हल्ली हमखास लोकप्रिय ठरणाऱ्या डॉक्युमेंटरींचा पाया ' मदर इंडिया 'नं (आणि ' गंगाजमना 'नं देखील) घातला. सध्या तुफान यश मिळवणाऱ्या ' दीवार 'च्या शेवटावर ' मदर इंडिया 'ची छाप आहेच. या सिनेमातल्या डाकूच्या भूमिकेनं सुनील दत्तला हिंदी चित्रसृष्टीत जम बसवून दिला. इतकेच काय, पण मध्यंतरी जेव्हा जबर अपयशाचा तडाखा त्याला बसला, त्यातून सावरायला देखील ' हीरा 'मधली डाकूची भूमिकाच त्याच्या कामी आली. नर्गिसला ' कार्लो व्ही व्हेरी 'चं ' ग्रँड प्रिक्स ' आणि भारत-सरकारची पद्मश्री मिळवून द्यायचं श्रेय ' मदर इंडिया 'लाच आहे. राजकुमार आणि राजेंद्रकुमार यांनाही ' मदर इंडिया 'नंतर भरभराटीचे दिवस आले.
आजही हा सिनेमा जिथे कुठे लागतो तिथे हाऊस-फुल्ल गर्दी ओढून आणतो. ज्याचा या कथेशी भावनिक दृष्ट्या तो पांढरपेशा प्रेक्षक हा सिनेमा आवडीनं बघतो. या सिनेमातले कलाकार ज्यांच्याशी फारसे परिचित नाहीत असा नव्या पिढीचा प्रेक्षक देखील या सिनेमात रंगून जातो. पुण्याच्या ' राहुल 'मध्ये तब्बल दोन आठवडे त्यानं नव्या

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

सिनेमासारखी गर्दी खेचली.
काय रहस्य आहे या एव्हरग्रीन सिनेमाच्या लोकप्रियतेचं ? भारतीय शेतकऱ्याची कहाणी सांगायला बसलेला हा काही पहिला चित्रपट नव्हे. याआधी बिमय रॉय यांच्या ' दो बिघा जमीन 'ने ही कामगिरी यशस्वी पार पाडली होती. याच्यानंतर आलेल्या कृष्ण चोप्रांच्या ' हीरामोती 'मधे किसान जीवनाचं यथार्थ चित्रण झालं होतं, आणि ' गोदान ' हा देखील काही वाईट चित्रपट नव्हता. पण ' मदर इंडिया 'चं यश त्यांना लाभलं नाही. अशी काय खास बात आहे ' मदर इंडिया 'त ? तोच तो पिळला जाणारा शेतकरी आणि त्याचं कुटुंब...मोडलेल्या छत्रीचे पैसे देखील धान्यातून सव्याज वसूल करणारा सावकार...सारं काही तेच तर आहे. मग ?
' मदर इंडिया 'चं आकर्षण त्याच्या कथेपेक्षा त्याच्या हाताळणीत आहे. हिंदी सिनेमातच शोभावे असे अनेक प्रसंग याही कथेत आहेत, पण कथेच्या ओघात ते असे बेमालूम गुंफले आहेत, की त्यांचं हे ढोबळपण लपून जातं. राधाच्या सासूचं मरण किंवा तिच्या असहायतेचा फायदा घ्यायला टपलेल्या सावकाराचा संधी साधूपणा, असले सांकेतिक प्रसंगसुद्धा ' मदर इंडिया 'त सहजी खपून जातात.
' मदर इंडिया 'ची कथा ही एकट्या राधाची धीरोदात्त कहाणी नाही, परिस्थितीपायी लाचार बनण्याची पाळी आलेल्या तिच्या स्वाभिमानी पतीची ती कहाणी आहे. परिस्थितीमुळेच कुमार्गाला लागलेल्या तिच्या मुलाची–बिरजूची–ती कहाणी आहे हे तीन पैलू एकत्र करून, हास्य, प्रणय, शृंगार, कारुण्य आणि रौद्र या रसांचं रसायन मेहबूब यांनी कुशलतेनं साधलं आहे. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे आणि कुशल गुंफणीमुळे जवळ जवळ चार तासांची लांबी कंटाळवाणी वाटत नाही.
' मदर इंडिया ' पाहताना एक गोष्ट प्रकर्षानं जाणवते. या सिनेमाचं टीम स्पिरिट. प्रत्येक कलाकार आणि तंत्रज्ञ आपापल्या कामात अगदी रंगून गेला आहे असं वाटतं. ज्या ' औरत 'ची पुनरावृत्ती म्हणजे ' मदर इंडिया ', तो ' औरत ' पाहण्याचा योग मध्यंतरी आला. कथानक दृष्ट्या एकच बदल मेहबूबनी ' मदर इंडिया 'त केला. ' औरत 'मधे संकटपरंपरा अवर्षणामुळे सुरू होते, तर ' मदर इंडिया ' मधे अतिवर्षावामुळे. ' मदर इंडिया ' सिनेमास्कोपमधे आणि रंगीत काढायचा, असं ठरवल्यावर मेहबूबनी हा बदल केला असावा. या नव्या तंत्रामधे दुष्काळापेक्षा अतिवर्षणाचे परिणाम अधिक चांगले मांडता येईल, असं त्यांना वाटलं. ' मदर इंडिया'च्या वेळी ' औरत 'च्या मानानं मेहबूबनी थोडी तडजोड पत्करली आहे; त्या नेमक्या नीटसपणाऐवजी मसालेदार पसरटपणा हाताळणीत स्वीकारला आहे. पण त्यांच्या या युक्त्या सफल झाल्या आहेत.
' औरत 'पेक्षा ' मदर इंडिया ' प्रेक्षणीय आहे निश्चित.
आणि त्याचं कारण आहे ' मदर इंडिया 'त दिसून येणारी संघभावना. त्यांच्या संगीतात नवरस आहे, कान आणि अंतःकरण या दोन्हींना एकाच वेळी सुखवण्याचं सामर्थ्य आहे, एक चैतन्य आहे. संगीतातच का, या सिनेमाच्या प्रत्येक अंगातच असं चैतन्य जाणवतं. प्रत्येकजण आपलं काम चांगलं करायचंच, अशा भावनेनं भारून गेला आहे, असं वाटायला लावणारं चैतन्य. बाकीच्या किसान–पटांवर ' मदर इंडिया ' नेमकी इथे मात करतो.
' मदर इंडिया 'वरचा नर्गिसचा हक्क कुणीच अमान्य करणार नाही. तिच्या मानानं कमी वाव असूनही, असहाय, पंगू शेतकऱ्याच्या भूमिकेत राजकुमार प्रभाव पाडून जातो.
' स्टारडम 'चा नशा चढण्यापूर्वीचा राजकुमारमधला कलाकार काय ताकदीचा होता याची चुणूक ' मदर इंडिया 'मधल्या छोट्याशा भूमिकेतसुद्धा राजकुमार दाखवून जातो. कन्हैय्यालाल हा असाच गुणी कलाकार. लंपट, स्वार्थी सावकाराची भूमिका इतकी यथातथ्य कोण करणार ?
' औरत 'मधला याकूबचा बिरजू आठवता मात्र सुनील दत्त फिका वाटतो. बाह्यतः त्याची तगडी प्रकृती, रगेल चेहरा बिरजूला फार साजून जातात; खेळकर प्रसंगही तो छान उभे करतो. पण नाट्यपूर्ण प्रसंगात केवळ भेदक नजर आणि धारदार वाणी यांचा उपयोग करून, जराही अतिरेक न करता बिरजूचा उसळता, बंडखोर स्वभाव याकुबनं सजीव केला आहे. याच भूमिकेत एरवी विश्वसनीय वाटणारा सुनील दत्त ' मदर इंडिया 'तल्या नाट्यपूर्ण क्षणी मात्र आवाजात कृत्रिम जरब आणतो, हे जाणवल्याविना राहत नाही. □


---

## विदूषक

शोकात्मिक भूमिकासाठी अफाट कीर्ती मिळविणारी नर्गिस शालेय जीवनात मात्र 'एक नंबरची विदूषक' म्हणून ओळखली जायची. दिवसभर चालणाऱ्या तिच्या खोड्यामुळे ही मुलगी मन लावून दुसरं काही करू शकेल यावर तिच्या शिक्षकांचा विश्वास नव्हता. त्यामुळे शाळेत असेपर्यंत नर्गिसला कधीही नाटकात काम करण्याची संधी मिळाली नाही. हिला मध्येच काहीतरी गंमत करायची लहर येईल आणि ही नाटकातल्या कामाचं रंगरूप बदलून टाकील, अशी भीती मास्तर उघड उघड बोलून दाखवायचे.



सुनिलदत्त



राजेंद्रकुमार



राजकुमार

# मदर इंडिया



नरगिस



# आगामी




न धरी शस्त्र करी मी .....
माझ्यासारख्या चॉकलेट हीरोला
त्याचा काय उपयोग ?
त्यापेक्षा तूच संभाळ ना ही बंदुक !

'राजकला'च्या
'कामयाब' मध्ये
देवआनंद आणि रेखा.

'हात्तिच्या ! त्यात काय एवढं ?
हा असा नेम धरायचा ! ......



# 'प्रतिज्ञा'



'नीले गगनके तले....'
घोड्याच्या
साक्षीनं ?
धर्मेंद्र - हेमामालिनीचा
हा प्रणय
'विक्रमजीत फिल्म्स'च्या
'प्रतिज्ञा'साठी



— आणि तिकडून एकदम ही अवस्था !
दाढीवाला धर्मेंद्र आणि हिन्दी सिनेमातली
आईच्या भूमिकेची ठेकेदार
लीला मिश्रा.


MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PI'C-68

# ' हिमालय से उँचा '

'जंजीर' ने सर्वतोमुखी झालेले निर्माते दिग्दर्शक प्रकाश मेहरा यांनी आता प्रकाश मेहरा कम्बाईन या आपल्या नव्या संस्थेचा आरंभ केला आहे. या संस्थेचा पहिलाच आगामी चित्रपट पूरा झाला असून तो प्रकाशनाच्या मार्गावर आहे. 'हिमालय से उँचा' या टायटलमध्येच अतिशयोक्ति आहे. परंतु दिग्दर्शकानी त्यात तसाच काही मालमसाला भरलेला आहे. या चित्रपटाचे एकच वैशिष्ट्य म्हणजे प्रसिध्द भारतीय शास्त्रज्ञ स्वर्गीय विक्रम साराभाई यांची कन्या 'मल्लिका' ही संपन्न आणि नावलौकिक असलेल्या घराण्यातील मुलगी. विदेशात तिचे शिक्षण झाले आहे. 'एक मुठ्ठी-चावल' या चित्रपटात तिला पहिल्यांदा नायिका म्हणून घेण्यात आले. विक्रम साराभाई हयात असताना त्यांची एका बंगालीबाबू दिग्दर्शकाशी चांगली जानपहचान होती. तेव्हापासूनच मल्लिकाने सिनेमात काम करावे अशी त्यांची इच्छा.

परंतु कै. विक्रमभाई त्या विरूध्द होते. शेवटी तिची आई प्रसिध्द नर्तकी मृणालिनी साराभाई यांनी त्या बंगालीबाबूंना परवानगी दिली. व मल्लिकाचा चित्रपट प्रवेश झाला. सध्या मल्लिका चार चित्रपटात काम करीत आहे. ही प्रशिक्षित तरुणी मात्र फिल्मीढंगाची नाही. तिचा थाट वेगळाच आहे. तिच्या अभिनयाचा 'हिमालय से उँचा' हा प्रकाशित होणारा शुभारंभी चित्रपट. सोबत सुनीलदत्त, रणजीत, नंदिता ठाकुर आहेत.

— दिलीप रुद्राक्ष



'हिमालय से उँचा' मध्ये सुनीलदत्त-मल्लिका साराभाई